IRBK-0100668

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ६६८

IRBK-0100668

अ० ७ · ६६८

# संगीत
# आमचे दोस्त नाटक

लेखक व प्रकाशक
**रामचंद्र प्रल्हाद जांबळे,**
२७८६ गंगावेश कोल्हापूर

कलहसाम्राज्य, संसारसंन्यास, उज्ज्वलस्वाभिमान
वगैरे नाटकांचे कर्ते

**आवृत्ति पहिली.**

**सन १९२५.**

मुद्रकः—महादेव नारायण दिक्षित, व्यंकटेश्वर प्रेस ब्रँच कोल्हापूर
व विष्णु विठ्ठल मंत्री, ज्ञानसागर प्रेस कोल्हापूर.

(भाषांतराचे वगैरे हक्क कर्त्यानें राखून ठेविले आहेत

**किंमत १ रुपया.**

IRBK-0100668

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. क्र. ६६८
ता. दि.
दि. ७।।२८

# प्रस्तावना.

नं 3.2.50

ईशप्रसाद, गुरुमुख, अभ्यास आणि वाचनाचा व्यासंग ह्यां साधनांनींच वाङ्मयशास्त्राच्या आखाड्यांत कोणालाहि प्रथम उतरण्याचें धैर्य प्राप्त होतें. वाङ्मयांतील लेखनकलेचे गुरु अलिकडच्या समाजाच्या परिस्थितीमुळें सहज उपलब्ध होत नाहींत आणि त्यांच्या सहवासाचा किंवा शिकवणुकीचा लाभ फक्त त्यांच्या बहुमोल ग्रंथांच्या द्वारेंच होत असल्यामुळें कोणास कोणाचा शिष्य ह्मणावें हें जनतेला समजणें कठीणच पडतें. तरी पण नाट्यशास्त्रविभूषण के० राम गणेश गडकरी यानीं रंगभूमीची सेवा करण्यांत जी अतुल्य कामगिरी प्रत्यक्ष करून दाखविली व नाट्याभिरुचीला जें नवें वळण लावून दिलें त्याबद्दल अभिमानपूर्वक प्रशंसापर उद्गार काढतांना व ज्याच्या नाट्यकृतींच्या प्रेरणेनें प्रस्तुत ग्रंथकारास वाङ्मयाचें कांहीं कार्य करावेंसें वाटलें त्या थोर आत्म्याच्या स्मृतीचा उल्लेख करतांना आनंद वाटणें साहजिक आहे. रत्नासारखें रत्न मिळत नाहीं, प्रतिभासंपन्न कवीसारखा कवि निपजत नाहीं, किंवा नितांत शृंगारादि अभिनयांनीं युक्त व गायनकलेचा मुकुटमणी असा एकदां दिवंगत झालेला नटहि जगाच्या रंगभूमीवर पुन्हां दिसत नाहीं, ह्मणून जगाचें रहाटगाडगें थोडेंच स्थिर राहणार! खऱ्या प्रतिभेचें रत्न मिळालें नाहीं तरी अलंकारोत्सुक प्राणीमात्र नकली रत्नाला तरी कांहीं काळ जवळ करतो, ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन व प्रत्येक व्यक्तिमात्राचें वाङ्मयकौशल्य कांहीं विशिष्ट स्वरूपाचें असूं शकेल ही भावना दृढ ठेवून वाङ्मयाच्या क्षेत्रांत अवतीर्ण झालेल्या कोणत्याहि नव्या बालकाकडे जनतेनें प्रेमळ व कुतुहलपूर्ण दृष्टीनेंच पाहणें इष्ट आहे.

प्रस्तुत नाटकांत जगांत ज्यांना आह्मी दोस्त असें समजतो व ज्यांच्या हातीं प्रसंगानुसार आह्मी आपली मान मोठ्या विश्वासानें देऊन मोकळे होतों त्यांपैकीं कांहीं लोक वेळीं ती छाटून काढण्यालासुद्धां मागेंपुढें न पाहण्याइतके कसे उलट्या काळजाचे असतात हें दर्शविलें आहे. त्याचप्रमाणें आमच्या राष्ट्राची साहजिक भोळसर व धर्मनिष्ठ वृत्ति कित्येक वेळां समाजांत आह्मांलाच कशी

हानिकारक होते हेंहि ह्या नाटकांत दिसून येईल. तसेंच आमच्या आर्यकुमारिकांचें शील कोणत्याहि विकट कसाला लावलें तरी तें भ्रष्ट होत नाहीं हें प्रस्तुत नाटकांतील मालिनीच्या हृदयस्पर्शी चरित्रावरून कळून येण्यासारखें आहे. हें नाटक लिहिण्याचा हा प्रथमच प्रयत्न असल्यानें प्रेमळ वाचक लेखनकलेंतील कोणत्याहि दोषाबद्दल सहृदयतेनें कर्त्यास क्षमा करतील अशी पूर्ण आशा आहे.

नाटक रंगभूमीवर सत्वर आणण्याच्या कार्यांत आनंदविलास संगीत नाटक मंडळीचे उत्साही चालक श्री० ग० वि० वीरकर व श्री० हरिभाऊ आपटे यांनीं जे परिश्रम घेतले त्यांबद्दल त्यांचे आह्मी अत्यंत आभारी आहों. त्याचप्रमाणें श्रीयुत गोविंदराव देवस्थळी यांनीं पदांना गोड चाली देऊन पद्यरचनेंत परिश्रमपूर्वक साहाय्य केल्याबद्दल व सदरहू नाटक कंपनींतील चतुर नट श्री० वासुनाना गोडबोले यांनीं नाटक बसवितांना, श्री० वामनराव वीरकर, श्री० गंगारामबुवा आदिकरून सर्व नटांनीं रंगभूमीवर काम करतांना जो उत्साह व जी कर्तव्यदक्षता दाखविली त्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणें अत्यंत जरूर आहे. शेवटीं श्री० एन्. व्ही. वीरकर फोटोग्राफर, मुंबई यांचे पुस्तकांतील फोटो काढण्याच्या व ब्लॉक सुबक करून देण्याच्या कामगिरीबद्दल, व्यंकटेश्वर प्रेसचे मॅनेजर श्री० दीक्षित यांच्या तत्पर छपाईच्या कामाबद्दल, व ज्ञानसागर प्रेसचे मालक श्री० मंत्री यांच्या चित्रांच्या व इतर सुंदर छपाईबद्दल आभार मानून ज्या आमच्या सहृदय मित्रवर्गानें पुस्तक छापण्याच्या कार्याला द्रव्यद्वारें अमूल्य साहाय्य केलें त्यांचें अभीष्ट चिंतून ही प्रस्तावना पुरी करतों.

कोल्हापूर,<br>वर्षप्रतिपदा<br>ता० २५।३।१९२५.

रा. प्र. जांबळे.

# अर्पण-पत्रिका.

जिनें अत्यंत प्रतिकूल अशा दैवाच्या परिस्थितींत
पतिनिधनासारख्या घोर आपत्तीला धैर्यानें तोंड
देऊन करवीर-निवासिनी श्रीजगदंबेच्या कृपा-
छत्राखालीं आपल्या उभयतां अल्पवयी
बालकांच्या विद्या संपादनाच्या कार्यांत
नितांत श्रम केले, त्या वृद्ध, सहृदय,
व ओजस्वी वृत्तीच्या लक्ष्मी मातेला
हें पुस्तक मी प्रणाम करून
नम्रपणें अर्पण करितों.

रा. प्र. जांबळे.

Dnyan-Sagar Press, Kolhapur.

श्रीनृसिंह प्रसन्न.

# संगीत आमचे दोस्त नाटक.

## अंक १ ला, प्रवेश १ ला.

( वसंतोत्सवाकरितां जमलेल्या मुली. )

### नमन.

[ पद १ लें. ]

**मुलीः**—सुखदा सदां ॥ सुरवर सकल, सुचरित गात
नमि त्या पदा ॥ ध्रु० ॥
सुविमल धाम सुखवित भुवन ॥
भवभयहरण करि जें तदा ॥ १ ॥
सुरनत सतत सुमनें रचित ॥
करि अरि हनन हरि आपदा ॥ २ ॥
सुगुणें ललित सुवचें रसित ॥
जलपरि वितरि धनसंपदा ॥ ३ ॥

**पहिली मुलगीः**—( दुसरीस ) अग! आज मालिनी आणि पद्मिनी दोघीही अजून ह्या वसंतोत्सवाला आल्या नाहींत!

**दु० मुलगीः**—दोघी पडल्या श्रीमंतांच्या मुली! श्रीमंतांना वेळेवर उत्सव प्रसंगाला हजर राहण्यांत एक प्रकारचा कमीपणाच वाटत असतो!

**ति० मुलगी:**—मालिनीनं कांहीं आतां श्रीमंतीच्या भ्रमांत नको राहायाला! श्रीमंतीचा सूर्य आतांशा तिला मावळलेला दिसत असेल.

**चौ० मुलगी:**—अग! श्रीमंती गेली ह्मणून श्रीमंतीची संवय थोडीच जाणार! (मालिनी बाजूला प्रवेश करिते.)

**मालिनी:**—(बाजूला) ऐकलं हं! तुमचं सारं बोलणं मी ऐकलं!! शान्तशीलांच्या त्या तसबिरीसाठीं पद्मिनीबरोबर भांडण्यांत मी वसंतोत्सव थोडा विसरलें होतें खरी! (पुढें होते.)

**प० मुलगी:**—(मालिनीस पाहून) अग, ही आली मालिनी! (मालिनीस) कितीग उशीर हा? आणि पद्मिनी कां नाहीं आझून आली?

**मालिनी:**—अग, तिला बोलावण्यासाठींच मी गेलें होतें, पण आह्मां दोघींनाही बोलतां बोलतां वेळेची आठवणच राहिली नाहीं! मला आठवण होतांच मी निघालें आणि पद्मिनीलाही चल ह्मटलं, पण तिला नवा शालू काढायला, नट्टा फट्टा करायला वेळ लागेलसा दिसल्यावरून मी एकटीच तडफेनें पुढें आलें. येईल ती इतक्यांत.

**दु० मुलगी:**—तुला उशीरां कां होईना, वसंतोत्सवाची आठवण झाली, पण त्या श्रीमंताच्या मुलीला मुळीं आठवण नसेल!

(पद्मिनी बाजूला प्रवेश करते)

**पद्मिनी:**—(बाजूला) जरा उशीर झाला पण ह्या मुलींना कांहीं तो पतकरला नाहीं. आतां ह्या बोलतील तें बोलून घेतलं पाहिजे. (पुढें होते.)

**प० मुलगी:**—(पद्मिनीस) यावं! यावं!! पद्मिनीताई!

**दु० मुलगी:**—केव्हांशी निघाला होतात हो?

**ति० मुलगी:**—मऊ गादीवरून लवकर हलवेना कां हो?

**चौ० मुलगी:**—श्रीमंती पाऊल लवकर उचलेना कां हो?

**पां० मुलगी:**—सुंदर शालू लवकर सांपडेना कांहो?

**स० मुलगी:**—गोड झोंप संपेना कांहो?

**पद्मिनी:**—बोला, बोलायचं तितकं बोलून घ्या! झाला खरा मला उशीर

(शान्तशील आणि कलाधर बाजूला प्रवेश करतात)

**शान्तशील:**—(कलाधरास बाजूला) पाहिलास, हा जगन्नियंत्याच्या सुंदर सृष्टीच्या बागेंतला मनोहर देखावा? (कलाधर पाहतो) पहा, नीट पहा!

**प० मुलगी:**—(पद्मिनीस) पद्मिनी, नाहीं तुला आह्मी बोलत आतां. चल ये. ह्या पहा, फुलांच्या माळा तयार आहेत. ह्या देवाला वाहून एक गाणे हाणायचें हं! (सर्व मुली फुलांच्या माळा हातांत घेऊं लागतात)

**कलाधर:**—(शान्तशीलास बाजूला) शान्तशील! अरे, खरोखरच ही अपूर्व शोभा आणि हा सुंदर देखावा चित्रांत खुलवून देण्यासारख्या गोष्टि आहेत!

**शान्तशील:**—(कलाधरास) पण तूं घेतलास ना हा देखावा चांगला पाहून? (शान्तशील मालिनीकडे पाहतो, मालिनीची दृष्टी शान्तशीलाकडे वळते)

**कलाधर:**—(शान्तशीलास) होय; याचं चित्र लवकरच तुला पाहा-याला मिळेल.

**शान्तशील:**—तें लवकर तयार कर, बरं पण, आह्मांला तूं तुमच्या घरची आणि आमच्या घरची मंडळी एकत्र बसवून आणि फोटो घेऊन तो केव्हां तयार करून देणार?

**कलाधर:**—शान्तशील, अरे हो! मला एकदां तसा फोटो घ्यायचा आहे खरा! कारण स्नेहभावानें वागत असलेलीं तुमचीं आमचीं हीं जुनीं घराणीं एकत्र बसलेलीं पाहण्यांत एक विशेष मौज येईल; पण तुझे वडील ह्या गोष्टीला कबूल होतील कीं नाहीं ही शंकाच आहे; कारण, तुह्मा आह्मांत आतां सांपत्तिक दृष्टीनें अंतर पडत चाललें आहे.

**शान्तशील:**—वेडा आहेस तूं! कसलें रे अंतर? मला नाहीं तसं मुळींच वाटत. बाबांच्या विचारांशीं मला काय करायचं आहे? स्नेह संबंधांत श्रीमंती आणि गरिबी ह्या भेदांचें कारण काय आहे तें मला समजत नाहीं.

**कलाधरः**—तुला जर तसें वाटत असेल तर मी तसा फोटो लवकरच घेईन. बरं, जी गोष्ट पहायासाठीं तूं मला इकडे घेऊन आलास, ती पाहिली, आतां जाऊं या.

**शान्तशीलः**—चला तर चला. कारण ह्या मुलींना आह्मी येथें दिसलों तर ह्यांचा उत्सवभंग होईल.

(शान्तशील व कलाधर जातात व मुली फुलांच्या माळा घेऊन उभ्या राहतात.

**प० मुलगीः**—हं, मालिनी, कर सुरवात तें सांबाचं पद ह्मणायला.

**मालिनीसह सर्व मुलीः**—

[पद २ रें.]

सानंद करुं गायन । शंकरपद तें नमून ॥
सुम माला त्या अर्पुन । विनति करूं भावें ॥ध्रु०॥
प्रियकर जो स्वमनिं वसत । सखिजनास मिळो कांत ।
चिर चिरसुख पावोनि । संसृति पद लाभोनि । स्नेह
असो परि अखंड । हेंचि दान द्यावें ॥ १ ॥

(देव दर्शन घेऊन मुली जातात.)

## प्रवेश २ रा.

[**स्थळ**—रस्ता. सदानंद व वंचक (गडबड्या) प्रविष्ट]

**सदानंदः**—थोडक्यांत सांग बुवा तुझी ती जन्मकथा!

**वंचक**:—ऐका; भटजींनीं सांगितलं, हें मूल मूळनक्षत्रावर जन्मलं! मातेला फार वाईट! मग आमच्या वडिलांना धीर कुठला राहतो! त्यांनीं चालविली शान्ति होम करायची तयारी! पैसा गांठीं नव्हता, कर्ज काढलं!

बारशाची जंगी तयारी केली! उत्सवाचा दिवस ठरला! आणि तो दिवस येतांच सकाळीं मोठी धांदल सुरू झाली. होम झाल्यावर ब्राह्मणांकरितां पानें मांडलीं. ब्राह्मण पानांवर बसून तोंडांत पहिला घांस घालणार इतक्यांत आमच्या मातोश्रींनीं आपला शेवटचा श्वास सोडला! मग काय! सारीच गडबड उडाली! भोजनाची वाट पहात बसलेल्या ब्राह्मणांना स्मशानाची वाट धरावी लागली! बाबांचे पुत्रप्राप्तीचे आनंदाश्रु पत्नीविरहाच्या दुःखांत मिसळून गेले! इकडे आमच्या जीवितयात्रेचा आरंभ तर तिकडे मातोश्रींच्या स्मशानयात्रेचा समारंभ! काय मौज पहा! बारशाची तयारी बाराव्याला उपयोगी पडण्याचा योग! एक शुभ आणि एक अशुभ असा बघा मोठा घोंटाळा आह्मीं जन्माला येतांच उडाला!

**सदानंद:**—(हांसून) हं! हा योग तर कांहीं विलक्षणच दिसतो! पण वंचका, मला वाटतं तुझ्यासारख्या स्वच्छंदी माणसाला ही घरच्या म्हातारीची कटकट जन्मकाळींच नाहींशी झाली, हें एकापरी बरं झालं असं वाटत असेल! पण, कायरे, ही जन्मकाळची हकीगत तुला बरी अगदीं तंतोतंत सांगतां यते?

**वंचक:**—अहो, आमच्या बाळपणाच्या पराक्रमाबरोबर बाबा नेहमीं तिचा स्फोट करीत असत, आणि लोकांना ती सांगत बसत! पण पुढें ऐका; मातोश्री जाऊन तीन महिने होतात न होतात तोंच बाबांची नोकरी गेली!

**सदानंद:**—वाहवा! एकंदरींत आपल्या जन्मानं घरांत पुष्कळच शुभ गोष्टी होऊं लागल्या ह्मणावयाच्या!

**वंचक:**—पण, मला स्वतःला कांहीं त्यांपासून बाधा झाली नाहीं ना? आमचे वडील इतक्या देवभोळेपणानें वागून जर संकटांत पडावयाचे ते पडले, तर ह्या जगांत मोठ्या साधुपणानं वागण्यांत फायदा काय असा विचार मला लहानपणापासूनच येऊं लागला! शाळेंत बाबांनीं मला जुल-मानं घातलं ह्मणून गेलों, तेथें चार अक्षरें शिकण्याऐवजीं तंटे बखेडे माजवूं

लागलों, ह्मणून त्यांनीं कांहीं दिवस माझी शाळा बंद केली! पण, मलाच माझ्या जुन्या दोस्तांची घरांत आठवण होऊन चैन पडेना, ह्मणून पुन्हा शाळेचा रस्ता मी सुधारला. एकदां एका मनुष्यानें शिताफीनें चोरी करून चांगली धनदौलत मिळवली, असली एक गोष्ट माझ्या वाचण्यांत आली, आणि तेव्हांपासून माझे सर्व विचार बदलले! सच्चेपणानं वागून कांहीं द्रव्य मिळत नाहीं, हा एकच सिद्धांत मनाशीं ठरवून जो शाळेबाहेर पडलो, तो पडलों!

**सदानंदः**—बस! मला अशा विचारांचा आणि तत्वांचाच दोस्त पाहिज होता. सच्चेपणानं वागून द्रव्य मिळत नाहीं, हेंच खरं.

( वंचकाच्या हातावर टाळी मारतो. )

**वंचकः**—मग, जमलं तर तुमचं आमचं! ( सदानंदाला टाळी देतो )

**सदानंदः**—तत्व तर जमलंच!

**वंचकः**—आणि दोस्तीही पण जमली. ( टाळी )

**सदानंदः**— होय, दोस्तीही जमली. ( टाळी )

**वंचकः**—मग, बोला तुह्मांला मी आतां काय मदत करूं, आणि सांगा, तुह्मी आह्मी मिळून आतां धंदा कोणता करावयाचा.

**सदानंदः**—धंदा! माझा धंदा तुला जरा विचित्र वाटेल बुवा!

**वंचकः**—अहो, पण सांगाल कीं नाहीं कोणता तो.

**सदानंदः**—हें पहा, सर्व धंद्यांत उत्तम–बिन भांडवलाचा–असा मी एक धंदा काढला आहे.

**वंचकः**—उत्तम आणि बिन भांडवलाचा!

**सदानंदः**—होय.

**वंचकः**--कोणता हो असा तो?

**सदानंदः**--अरे, दोस्तीचा धंदा.

**वंचकः**—दोस्तीचा धंदा! ( साश्चर्य ) काय बुवा, हा एक नवाच शोध दिसतो!

सदानंदः—अरे एक. ह्या दोस्तीच्या धंद्यानं तुमचं आमचं दारिद्र्य जाईलच; पण जगाचा अनुभव ह्याहून निराळा आहे. कोणीं ह्या धंद्यानं राज्यें घेतलीं आहेत; कोणी सम्राट् बनले आहेत; कोणी कोट्याधीश झाले आहेत! ह्या धंद्याचं पहिलं तत्व ह्मणजे आह्मी आपल्या स्वतःकरिता कांहींच करित नाहीं असें लोकांना दाखविलें पाहिजे. सदां तोंडानें एक मंत्र सुरू ठेवायचा! बाबांनो, आह्मी तुमच्या सुखसोयीसाठीं सर्व कांहीं करितों आहों! तुह्मांला तुमचा संसार नीट करतां येत नाहीं, आह्मी तुमचा संसार थाटतों! तुह्मांला तुमचं हित कळत नाहीं, आह्मी तुमच्या हितासाठीं झटतों! तुह्मांला घर बांधतां येत नाहीं, आह्मी तुमचं घर बांधून देतों! तुह्मांला व्यापार करतां येत नाहीं, आह्मी तुमचा व्यापार करतों!

वंचक—कांहो सगळ्या जगाच्या उलाढाली करण्याचा मक्ता घेण्याचाच हा धंदा दिसतो!

सदानंदः—अरे, तसं केल्याशिवाय आमचं कोटकल्याण कसं व्हायचं? आणखी पहा, ह्या साऱ्या उलाढाली करतांना मोठमोठे चमत्कार ह्या जगाला करून दाखविले पाहिजेत! नवेनवे शास्त्रांतले शोध काढले पाहिजेत! पंख लावून उडायचं; धूर काढून पळायचं; मेलेलीं माणसें जिवंत करायचीं; असल्या कांहीं अजब गोष्टी करून आपण देवलोकांतूनच ह्या मृत्युलोकावर उपकार करायला आलों आहोंत, असं दाखविलें पाहिजे! तसंच—

वंचकः—(मध्येंच) अहो, असल्या प्रकाराला लोक भुताटकी ह्मणतील–भुताटकी!

सदानंदः—छे! कोणीं तसं ह्मणणार नाहीं.

वंचकः—बरं पण, ही दोस्ती कशी साधायची?

सदानंदः—दोस्ती ह्मणजे एक आपला धंदाच समजायचा, हें तर तुला सांगितलंच आहे. हा धंदा बेतानें, सावकाश, करावा लागतो. आपलं हित साधायचं झालं तर आपण दुसऱ्याच्या हितासाठीं फार झटतों आहों

असं दाखवलं पाहिजे! कुणाला आनंद झाला तर आपण पोट धरून हंसाव, दुःख झालं ह्मणजे गळा काढून रडावं, कीं तो माणूस दोस्त झालाच! ही दोस्ती साधायची कांहीं पर्वणी असते. आमच्या ह्या सुशीलरावाचा वडील मुलगा जेव्हां मेला, तेव्हां तो मोठ्यानं आक्रोश करूं लागला. मी होतोंच जवळ. मीही रडूं लागलों! तो खर्जांत रडला, तर मी मध्यमाचा सूर काढून रडलों! सुशीलरावाला तर माझ्या सारखा जिव्हाळ्याचा स्नेही कोणीच नाहीं, असा त्यावेळीं भास झाला; आणि मग ह्या ताऱ्याचा तेव्हांपासून माझ्यावर मोठा विश्वास बसला! अशी ही दोस्तीची पर्वणी मी साधली!

वंचकः—कांहो, पण तुह्मी अगदीं मनापासून रडलात कां तेव्हां?

सदानंदः—अरे, त्याला तें माझं रडणं मनापासून आहे असं वाटलं ना? झालं काम! मेल्या माणसाजवळ बसून जे आप्तइष्ट किंवा मित्र रडतात, त्यांना खरें रडें कितपत येत असतें? आणायच्य झालं, डोळे चोळून, गंगाजमना बाहेर!

वंचकः—सदानंद! नको बुवा, तुमची दोस्ती मला! तुह्मी कांहीं दोस्तांसाठीं खरे रडणारे दिसत नाहींं! समजा, तुमच्यासाठीं मी कुठें गोत्यांत आलों, किंवा माझ्यावर तोहमत आली, तर तुह्मी कांहीं रडणार नाहीं. पण, कांहो समजा; मी मेलोंच! मग तरी रडाल कीं नाहीं? आणि रडलात, तर खोटें रडाल कां खरें?

सदानंदः—पण, मी ह्मणतों, तूं ह्या रडण्याच्या प्रसंगाची वाट कशाला पाहतोस! असा प्रसंग येऊं नये, आणि आलाच तर तुझ्यासाठीं मी रडेन–मरेन सुद्धां!

वंचकः—अहो कोण कुणाकरतां मरतो आहे! मला माझ्यासाठीं रडणारा एखादा माणूस पाहिजे. खरा रडणारा हां! कसं मग? तें कबूल असलें, तर ही दोस्ती जमली.

सदानंदः—कबूल!

**वंचक** :—काय कबूल ! मी कैदेंत गेलों, तर तुह्मी कैदेंत जायाचें, मी मेलों तर तुह्मी—

**सदानंदः**—( मध्येंच ) मी-मरायचें ?

**वंचक** :—छे, छे ! मरायचें नाहीं—रडायचें ! कसें पण—अगदीं मोठ्यानं, छाती ब-बडवून, जो-जोरानं; उगीच नाहींहो, अगदीं बायकां-सारखं रडलं पाहिजे !

**सदानंदः**—बायकांसारखं ! बरं बुवा, कबूल !

**वंचक** :—दाखवा पाहूं, तसं एकदां रडून आतां !

**सदानंदः**—बरं ! तूं मेल्याची बातमी अगोदर मला सांग पाहूं !

**वंचकः**—( जरा बाहेर जाऊन येऊन ) ऐका, अहो सदानंद ! तुमचा दोस्त वंचक नुक्ताच मेला !

**सदानंदः**—( हंबरडा फोडून ) काय ह्मणतां ! माझा वंचक मेला ! माझा जिवाचा तो कलीजा मेला ! अग आई आई—अग बाई बाई ! आतां मी काय करूं ?

**वंचक** :—( दरडावून ) अहो ! हा वंचक जिवंत आहे ना उभा इथें ? रडतां काय उगीच ?

**सदानंदः**—( साश्चर्य ) काय ? वंचक जिवंत आहे ? अहाहा ! मला काय आनंद होतो आहे ह्मणून सांगूं ! अहाहा—हाहा !

**वंचक** :—( सदानंदाच्याच स्वरांत ) अहाहा—हाहा !

**सदानंदः**—हेंच पहा, दोस्तीच्या धंद्याचें पहिलें तत्व, जगांत असेंच वागलें पाहिजे ! हंसणाऱ्या बरोबर हंसायचं, रडणाऱ्या बरोबर रडायचं ! असं करून दोस्ती जमवून पैसा कमवायाचा. मी माझ्या धंद्याची पेढी तूर्त सुशीलरावांच्या घरांत स्थापली आहे ! आहे पसंत तुला ?

**वंचक :**—पसंत ! अगदीं पसंत ! ! अहो सदानंद, ह्या सुशील-रावाच्या घरांत तुम्हांला पैसा तर मिळेलच, पण जरा खटपट केलीत तर मालिनीसारखं सुंदर पांखरूंसुद्धां तुमच्या तावडींत येईल. कशी आहे पोरगी ! पोरगी पर पोरगी ! ! अशी सुंदर पोर लाखांत नाहीं सांपडा-यची–लाखांत ! चांगली काढलीत ही तोड, कनक आणि कांता एक-दमच मिळायची ! ठीक !

**सदानंदः**—पण मला नाहीं वाटत, ती अगदीं सहज रितीनें आपल्या तावडींत येईलसें !

**वंचक :**—मग, मी तरी काय ह्मणतों ! अहो खटपट केलीच पाहिजे. द्रव्य निर्जीव असतें, तें उपटण्याला प्रयास पडत नाहींत; पण ह्या सजीव सुवर्णाच्या पुतळ्या पटकावतांना फार यातायात पडते ! पहा बुवा हं !

**सदानंदः**—तो विचार माझा मी पाहतों. वंचका, तूं आतां जा. ह्या भोळ्या सुशिलरावाला कसा मोहांत घालायचा तें मी ठरविलं आहे. थोड्या वेळानें मला भेट, ह्मणजे आणखी कांहीं गोष्टी मी तुला सांगेन. आपली ही दोस्ती तर आतां जमली !

**वंचक :**—हो. जमली, खास जमली ! आणि दोस्तीचा करारनामाही ठरला ! ( जातो व पुनः परत येतो ) पण, कांहो, तुह्मी माझ्या बरोबर सुद्धां दोस्तीचा धंदाच करणार आहां काय ?

**सदानंदः**—अरे छेः ! हा आपला दोस्तीचा धंदा नसून ही धंद्याची दोस्ती आहे.

**वंचक :**—मग ठीक आहे तर ! ( जातो ).

**सदानंदः**—( स्वगत ) फसणारा फसतो, पण फसवणाऱ्याला मोठा अट्टहास करावा लागतो ! हा सुशीलराव भोळा तर खराच, पण ह्या भोळ्याला खुळा करायला मला तीन वर्षें लागलीं. ह्याचा वडील मुलगा मरावा, आणि माझ्या दोस्तीच्या धंद्याचा डाव सुरू व्हावा, असाच योग होता. मुलाच्या मृत्यूनें तो उदास झाल्यानें वेदांत विषयाचा नाद त्याला

लावून देणें मला सोपें झालें. आतां त्याला ह्या विषयांत पुरा वेडा करण्यासाठीं विलासला पत्र पाठवून नुकताच आणला आहे. ठीक! धंद्याची घडी तर बरी बसत चालली आहे; पण थोडेसें विघ्नही त्यांत उत्पन्न होईलसें वाटतें. हा म्हातारा जरी भोळसर आहे, तरी त्याचा मुलगा कलाधर मात्र तसा खास नाहीं. बापाची वृत्ति मुलांत नाहीं. पण कलाधर घरीं असतो कितीसा काळ! तो आतां शिक्षणाकरितां जाईलच मुंबईला! ह्या सुशीलरावाचें बरेंचसे द्रव्य आतांपर्यंत हातीं लागलेलेंच आहे; त्यांतच जर कां त्याची कन्या मालिनी मला प्राप्त होईल तर माझ्या धंद्याचा डाव सर्वस्वी साधेल. (जातो).

---

# प्रवेश २ रा.

[ **स्थळः**—बाग. मालिनी विचार करीत आहे. ]

**मालिनीः**—[ स्वगत ] आमच्या दादांबरोबर मघां शांतशील येथें आले होते. त्यांना मीच तेवढं पाहिलं आणि मला तेच तेवढे दिसले! आजच्या त्यांच्या पहाण्यांत मला कांहीं नवीन दिसलं! कांहीं दिसलं, कां मला तसं वाटलं! निर्जीव वस्तु जशी दिसते तशीच ती वाटते; पण सजीव वस्तूंत दृश्यरूप निराळे, आणि तिचा अंतरंग निराळा, अशी स्थिति असते! शान्तशील हंसले, मीही हंसलें! ते हंसले म्हणून मी कां हंसावं बरं? ( साशंक ) एकाच हंसण्यांत निरनिराळ्या भावनांचें अस्तित्व असतें. ते मला वेडी म्हणून हंसले, कां मूर्ख म्हणून हंसले, कां अनुरागानं हंसले? शान्तशील! नेहमीं माझ्या बरोबर बोलतां, हंसतां, पण आजच्याच आपल्या हंसण्यानं माझ्या हृदयांत असे कां बरें विचार यावे? आजच मला असं कां बरं वाटावं?

[पद ३ रें.]

मोहिलें मज मन्मथें, हृदयासि आजचि नाकळे ॥ ध्रु० ॥
हांसुनी जरि पाहिलें, कां संशयीं मन लोटलें ॥
अनुराग कीं संतापले मन बावरें जणुं जाहलें ॥ १ ॥
चमकतां नार्भि चंचला, मनिं चातकें जल चिंतिलें ॥
परि केवला ती कल्पना, मुळिं त्या न तें सहजी मिळे ॥ २ ॥

( सदानंद बाजूला प्रविष्ट )

**सदानंद:**—( बाजूला ) वनश्रीच्या ह्या प्रतिभेला असाच जाऊन गाढ आलिंगन देऊं कां ? कोणी नाहीं येथें आतां ! ह्या निसर्ग रमणीय उद्यानांत, ही एकटी आहे ! पण पाहूं या, ह्या तिच्या मुखचंद्रावर कोणत्या कला दृग्गोचर होतात ! ( पुढें पाहून ) हंसते आहे ! खुलते आहे ! अशा ह्या रंगांतच पुढें होण्यांत मौज आहे; पण, नको ! जरा थांबावं आणखीं थोडा वेळ !

**मालिनी:**—( स्वगत ) ते हंसले, पण मी कां हंसावें बरें ? त्यांचें शील, त्यांचे सद्गुण, त्यांचें औदार्य, हीं मला हंसवीत आहेत ! मी कशाची हंसणार ? पण, मला त्यांचे ते सद्गुण घेऊन काय करायचे आहेत ! असतील, ते सद्गुणी असतील; शांत असतील; उदार असतील ! त्यांच्या गुणांचा मला काय उपयोग होणार ? ते श्रीमंत आहेत ना ! ( खिन्न होते )

**सदानंद:**—( बाजूला ) अरे, अरे ! उमललेल्या कळीला अग्नीचा स्पर्श होऊन ती हारपळूं लागली ! हिचा चेहरा खिन्न दिसूं लागला. ( पुढें होऊन उघड ) मालिनी ! कुमारिकांनीं सर्वस्वी निराश होण्यासारखें कांहीं आतांचें जग नाहीं ! तुला खिन्न पाहून धीर द्यावासा मला वाटत आहे. ( हात पुढें करतो ).

**मालिनी:**—( संतापून ) सदानंद! मनाच्या ह्या बेफाम वृत्तीला आवरून धरा. माझ्या बाबांचे आपण स्नेही ह्मणवतां ना ? दूर व्हा ! हा पापी हस्तस्पर्श—

**सदानंद:**—( मध्येंच ) काय, पापी हस्तस्पर्श ! मालिनी, कोणा पुण्यवंताचं चिंतन तूं आतां करीत होतीस? आणि, अमक्याचा हस्तस्पर्श पापी, आणि तमक्याचा पुण्यवान् ह्याचें अनुमान तुला कसें करतां येतें ?

**मालिनी:**—इच्छेविरुद्ध केलेला कोणताही प्रकार पापीच होय. पितृ भावनेच्या शुद्ध दृष्टींत कामवासनेच्या निखाऱ्याचें रखरखीत तेज मिसळ-ल्यानं पवित्र कुमारिकांच्या हृदयाला असह्य चटके बसूं लागतात !

**सदानंद:**—धीर द्यावयाकरितां पुढें केलेल्या हाताबद्दल अशी पाप शंका उत्पन्न होईल, असें मला वाटलें सुद्धां नाहीं ! मालिनी—

**मालिनी:**—( मध्येंच ) नका, सदानंद ! असा रंग पालटूं नका ! धीर द्यावयाकरितां पुढें केलेल्या–पितृप्रेमानें उत्सुक असलेल्या हातांतलें, आणि कामवासनेच्या वेगानें थरथर कांपत असलेल्या हातांतलें अंतर मला समजतें बरें ! सदानंद ! वाटेल त्या पुरुषाला हात द्यायला तयार होणाऱ्या कुमारिका ह्या आर्यावर्तात नाहींत !

**सदानंद:**—मालिनी, तुझ्या बापाच्या संसारसाम्राज्याचीं सूत्रें माझ्या हातांत येत चाललीं आहेत. मी सांगेन तें तो करितो आहे. मुख्य राजाच जिथें परावलंबी झाला तिथें मांडलिकांच्या स्वातंत्र्याला कोण विचारतो? तुझा वर निवडण्याचं तुला स्वातंत्र्य राहिलं नाहीं हें लक्ष्यांत ठेव. हृद-याच्या ठोक्यांवर हाताची नाडी चालते ह्याणि ताणाऱ्या मुख्य चक्राच्या गतीनें घड्याळाचे कांटे फिरत असतात. होय ! तूं समजतेस त्याच भावा-र्थानें मी हात पुढें केला. पुढं काय आहे तुझें ह्मणणें ? आज नाहीं केव्हां तरी तुझ्या ह्या कोमल देहावर मी मालकी गाजवण्याला कमी करणार नाहीं हे लक्ष्यांत ठेव. ( जातो. )

**मालिनीः**—( स्वगत ) देवा! ज्या प्रेममय विचारांनीं आजच माझ्या हृदयांत प्रवेश केला, त्यांच्या अशा चिंधड्या एका क्षणांतच होऊं लागाव्या असा कसलारे हा योगायोग! कां तुझ्याच घरचा असा विलक्षण न्याय, कीं जिथें बीजोत्पत्ति तिथेंच अग्नीचें वास्तव्य! जिथें सज्जन तिथेंच दुर्जन! जिथें अमृत तिथेंच विष! आतां, हा सदानंद काय काय गोष्टी करील याचा मला भरंवसा वाटत नाहीं. बाबांना कांहीं सांगायला जावं तर ते उलटे माझ्यावरच रागावतील. पाप्याचं पाप बोलून दाखवणं ह्मणजे सुद्धां पापच होय; चोराची चोरी शोधून काढणाराच एखाद्या वेळीं चोर ठरतो! एकंदरींत, हा प्रकार कांहीं बरा झाला नाहीं! ह्या क्षणिक प्रकारामुळं माझ्या जन्माचे काय काय खेळ होणार तें कांहीं कळत नाहीं. कारण,

[ पद ४ थें. ]

करिल खास घात अधम धमकावुनि हा ॥ ध्रु० ॥
पाप करणि जरि प्रकाशीं ॥ आणिन तरि कार्य नाशी ॥
खट नट शठ हा ॥ १ ॥

( जाते )

---

# प्रवेश ४ था.

[**स्थळः**—सुशीलरावांचें घर; पात्रें:—सुशीलराव, इंदुमती, कलाधर, सदानंद, विलास, वडवड्या, वंचक [ गडबड्या ] भगवा पोषाख केलेला. ]

**सुशीलरावः**—( विलासाकडे बोट करून सदानंदास ) आपण ह्यांच्या आगमनाचा हा योग जुळवून आणलात, हें मोठें मी भाग्यच समजतों!

**सदानंदः**—अहो, यांत विशेष तें मी काय केलं? मला यांचा सहवास घडण्याचा योगही असाच एका स्नेह्याकडून आला. सुशीलराव, सत्संगतीचे फायदे असेच मिळत असतात!

**विलासः**—( सुशीलरावांस ) हे सदानंद खरोखरच योग्य गृहस्थ आमणाला लाभले आहेत. यांनीं आपली ख्याति फार वर्णिली! उदात्त स्वभाव, पवित्र आचरण, दानशूरता हे गुण फारच थोड्या माणसांत आढळून येतात. अशा साधु पुरुषांच्या घरीं आगमन करण्यांतच मला आनंद वाटतो, आणि ह्मणूनच या सदानंदांनीं मला इकडे चला ह्मणतांच मी आलों!

**सदानंदः**—सुशीलराव, पाहिलंत! साधूंना सज्जनांचा सहवास किती प्रिय वाटत असतो तें?

**विलासः**—सत्संग! सत्संग!! सत्संगापरतीं जगांत मूल्यवान असं कांहींच नाहीं! [ सुशीलरावांस ] आपण सदानंदांशीं अकृत्रिम स्नेह केला, भल्या माणसाची गांठ पडली, ह्मणून हे योग जुळून आले!

**सदानंदः**—[ सुशीलरावांस ] सुशीलराव, आपण काय वाटेल तें ह्मणा, खऱ्या साधूंचं लक्षण फार निराळं असतं. अहंकारवृत्ति त्यांच्यांत कसली ती नसते. पहा, हे किती निरिच्छ, निरहंकारी आहेत ते!

**कलाधरः**--[ बाजूला ] हा त्याची स्तुति करतो, तो ह्याची करतो, आणि दोन्हींची बेरीज करून बाबांना त्या स्तुतीच्या आंकड्यानें गुणून काढावयाचाच बेत्यांनीं सपाटा चालविला आहे. दोघेहीं पक्के भोंदू! पण पाहूंया तरी आणखी काय चालतें तें!

**विलासः**—आह्मांला जगांतल्या कोणत्या गोष्टीची जरूर राहिली आहे! अहंकार वृत्ति ती कशाला! आणि वासना तरी कशाला! सज्जन दिसला ह्मणजे वृत्ति शांत राहते! तोच आनंद, तेंच ध्यान! हे सदानंद व्यवहारांत वागतात, पण यांची चित्तशुद्धि नितांत आहे!

**कलाधरः**—( बाजूला ) कृतांताला सुद्धां दाद देणार नाहीं, इतकी ती काळीकुट्ट मात्र खास आहे ! काय पांक्त भाषा बोलतो आहे ? चित्त-शुद्धि ह्मणे नितांत आहे !

**सुशीलरावः**—हो, ही गोष्ट मला मान्य आहे. चित्तशुद्धीशिवाय परमात्म्याचें ध्यान करणं शक्यच नाहीं.

**सदानंदः**—कशाची चित्तशुद्धि ! आपलं आमचं हें घराणं वाडवडि-लांपासूनच अशा विरक्तवृत्तीचं आहे झालं ! अशा पूज्य-पवित्र-महा-त्म्यांच्या संगतीचा लाभ झाला ह्मणजे चित्तशुद्धि आपोआपच होत असते !

**कलाधरः**—( उघड ) होय. हें मात्र अगदीं खरं ! गंगेच्या शुद्ध उदकांत डुंबणारे बेडूक लवकर ब्रह्मपद गांठतात ! सत्संगतीचा महिमा कांहीं और आहे खरा !

**सदानंदः**—( बाजूला ) पहा, हा कार्टा कसा छद्मी भाषण करूं लागला आहे ! ( उघड कलाधरास ) कलाधर, ही उपमा जरा टोंचणारी अशी योजलीत आपण.

**सुशीलरावः**—जाउं दे कीं हो. तो आहे तरुण, आणि सुधारक पथाचा ! सदानंद, आपण नका त्याच्या बोलण्याचा विषाद मानूं.

**विलासः**—( स्वगत ) हा तरुण मनुष्य माझी सुद्धां फजिती करायला कमी करणार नाहीं !

**सुशीलरावः**—( सदानंदास ) पण कांहो सदानंद, अशा ह्या बाल-वयांत विरक्ति उत्पन्न होऊन हा आश्रम ह्यांनीं स्वीकारला ही मला तर मोठी आश्चर्याची गोष्ट वाटते !

**सदानंदः**—आश्चर्य ! खरोखर आश्चर्य !! संसारांत उपाधींचा त्रास वाटून सन्यास घेणारे पुष्कळ निघतील, पण स्वार्थत्यास करून गजान्त लक्ष्मीला धिक्कारणारे आणि जगाचा उद्धार करायला सज्ज झालेले महात्मे विरळा सांपडतात ! प्राणीमात्रांवर उपकार करण्याकरितांच त्यांचा अवतार असतो, आणि भूत, भविष्य, वर्तमान, सर्व कांहीं त्यांना समजत असतें !



**कलाधर :**—समर्थासारख्या महात्म्यांची लंगोटी धुवायला सुद्धां त्याला कोणी ठेवणार नाहीं।

Dnyan-Sagar Press, Kolhapur.

[ अंक १, प्रवेश ४ ]

**सुशीलराव:**—होय कां? मग, आमच्या राष्ट्रकार्याला सुद्धां यांचा चांगला उपयोग होईल असं मला वाटतं! पण, कांहो, यांचा पंथ कोणता, यांचे गुरु कोण, वगैरे कांहीं आपणांला कळलें आहे काय?

**सदानंद:**—( स्वगत ) असल्या वेदाण्या शिष्याला कुठल्या गुराची जोड घालून द्यावी? सुचलं! ( उघड ) ह्यांना गुरुमुख ह्मणजे ह्यांच्या मावशींचें. त्या लहानपणीं यांच्या करवीं गीतेचं पठण करवीत असत. ह्यांचा पंथ असा कांहीं ठरीव नाहीं. आपले हे स्वयंभूच आहेत समजाना!

**सुशीलराव:**—( एकदम ) काय स्वयंभू? मग तर उत्तमच गोष्ट ती.

**सदानंद:**—अहो, मोठमोठ्या राजकारणाच्या गोष्टींत सुद्धां ह्यांचा सल्ला कोणी घेईल तर आपल्या देशाला स्वराज्य हां, हां, ह्मणतां मिळेल!

**विलास:**—( स्वगत ) अरे बापरे! केवढी अगडबंब जबाबदारी ह्यानें माझ्यावर टाकली ही?

**सुशीलराव:**—हो. तसं तरी कां होणार नाहीं? समर्थांनीं काय केलें?

**कलाधर:**—( स्वगत ) समर्थांसारख्या महात्म्यांची लंगोटी धुवायला-सुद्धां ह्याला कोणीं ठेवणार नाहीं! हा सदानंद खास ह्याची व्याज स्तुति करतो आहे. ( उघड ) बाबा, स्वराज्य मिळवून देण्याची जबाबदारी घ्यायला हे समर्थ दिसतात खरे!

**सदानंद:**—( सुशीलरावास ) बरं, सुशीलराव, भूत, भविष्य कांहीं ह्यांना विचारायचं असेल तर विचारा.

**सुशीलराव:**—ते जाणत असतील सारें; निराळें विचारायाचें कारणच नाहीं. ( विलासास ) महाराज, सांगा, माझा कर्मविस्तार थांबणार तरी केव्हां?

**विलास:**—सुशीलराव, पुत्रशोकाच्या कर्मापासून आपण आतां अलिप्त व्हा. कन्येचा विवाह होण्याचा योग अगदीं जवळ आला आहे. मृता-बद्दल शोक करूं नका. पुढचीं कर्मं शुद्धपणानें आचरा; संकटें येणार नाहींत.

**सुशीलराव**:—( स्वगत ) खरोखरच चमत्कार आहे ! आहे खरें अन्तर्ज्ञान येथें. ( उघड ) बरोबर सांगितलंत !

**कलाधर**:—( स्वगत ) कपाळ सांगितलं ! मी सुद्धां असं सांगितलं असतं. ह्याची आतां थोडी फजिती आपण करूं या. ( उघड ) बाबा, भूत किंवा भविष्य आतांच्या काळांत सांगायला फारसें कठीण नसतें ! काय असल्या भाषणावर तावडतोब विश्वास ठेवतां आहां आपण ? मला तर, हें भविष्य कथन ह्मणजे एक चेटूक आहेसें वाटतें !

**बडबड्या**:—( बाजूला ) खाशी ! बहार उडविली !

**विलास**:—( एकदम उठून ) हा अपमान असह्य आहे ! सदानंद, असा अपमान करण्याकरितां मला येथवर आणलेंत ?

**सुशीलराव**:—नाहीं महाराज, तो जरा अजाण आहे. आपण त्याबद्दल विषाद मानूं नये ! त्याच्याबद्दल मी आपली माफी मागतों.

**विलास**:—माफीचं कारण नाहीं ! ( संतापानें ) सुशीलराव, आह्मी येथें आलों तीच चूक केली. ( सदानंदास ) सदानंद, चला,

अत्र संतापकारणमभवत् शान्तिः कदापि न वसेत् !

**सुशीलराव**:—अहो, शापूं नका, कोपूं नका ! ( विलास व सदानंद जातात ) [ कलाधरास ] काय केलेंस कलाधर, हें ? मी जाऊन त्यांचें सांत्वन करितों !

**बडबड्या**:—( उठून ) बाबासाहेब, मी आलों बरोबर. ( सुशीलराव व बडबड्या जातात )

**वंचक**:—( स्वगत ) आपले सांथीदार गेले; आपण तरी कशाला रहा इथें ? ह्या बुवाबरोबर आपणही आज बुवा बनलों होतों ! हो ! जसा प्रसंग येईल तशी पगडी फिरविलीच पाहिजे. ( जातो ).

**इन्दुमती**:—( कलाधरास ) काय केलंस हें ? त्या महात्म्याचा असा अपमान कशाला केलास ?

**कलाधरः**—दादा गेल्यापासून तुह्मीं उभयतांही वेड्यासारखीं करूं लागला आहां! पुत्रशोक कां कोणाला होत नाहीं? पण, असल्या दांभीक जोगड्यांच्या सहवासानं किंवा भविष्यकथनानं कां दादा परत येणार आहे, कां ईशप्राप्ती होणार आहे? कांहीं नाहीं तरी दहा पंधरा हजारांचा चुराडा त्याबांनीं ह्या साधूंच्या नादांत केला असेल! आमची गृहलक्ष्मी पार वाट चालूं लागली! आधीं बुद्धि जाते, मग लक्ष्मी जाते! बुद्धि जातांच मनुष्य मवाळ बनतों, आणि तो एकदां मवाळ झाला, ह्मणजे कुटुंबाचें काय, राष्ट्राचें काय, पुरें वाटोळें होऊन जातें! मालिनी आतां उपवर झाली आहे, तिच्याबद्दल योग्य विचार करायचा सोडून तुह्मी आपला भलताच हा क्रम सुरू केला आहे.

[पद ५ वें.]

गृहीं निज बाला उपवर असत ॥ ध्रु० ॥
भोंदु सेवितां उदास बसतां ॥ ध्यानीं न घेतां, निशिदिनिं
ती तळमळत ॥ १ ॥

**इंदुमतीः**—अरे बाळ, साधूंना धन दिलं असतां किंवा त्यांची सेवा केली असतां ही आमची सर्व चिंता नाहींशी होणारी आहे. ( मालिनी येते )

**मालिनीः**—कलाधर, कां असा संतापला आहेस?

**कलाधरः**—मालिनी, आतांच त्या सदानंदाबरोबर कोणी भगवीं धारण केलेला साधु आला होता, आणि बाबा त्याच्या भविष्य कथनाबद्दल त्याची भलती तारीफ करूं लागले; ती गोष्ट मला आवडली नाहीं, आणि मग मला जें वाटलें तें मी उघड बोललों!

**मालिनीः**—काय? सदानंदाबरोबर साधु! आई, दादाचं बोलणं अगदीं रास्त दिसतें आहे.

( सुशीलराव व सदानंद येतात )

**सुशीलराव**:—( सदानंदास ) सदानंद, माझा पुरा विश्वास त्या महात्म्यावर बसला. बोला, त्यांच्या मठाच्या जीर्णोद्धाराला काय रकम देऊं ?

**सदानंद**:—सुशीलराव, अशी गडबड नका करूं! तुह्मी आपले पैसे खर्च कराल, पण लोकापवाद आह्मांसारख्या आपल्या स्नेही मंडळींवर येईल!

**सुशीलराव**:—तें कांहीं नाहीं. मी माझ्या हातानें पैसा मिळविला, मी तो खर्च करण्याला स्वतंत्र आहे!

**कलाधर**:—( स्वगत ) आपणाला कांहीं हा प्रकार पाहवत नाहीं!
( जातो )

**सदानंद**:—सुशीलराव, असे आपले पैसे खर्च झाल्यावर मालिनीच्या लग्नाच्या वेळीं पंचाइत येईल!

**सुशीलराव**:—ती नको काळजी! मालिनीच्या विवाहाकरितां ठवलेल्या रकमेच्या पेटीला मी केव्हांही हात लावणार नाहीं. तुह्मी लक्ष्मीपालाकडे जा, आणि मी आतां कंठा देतों, तो त्यांजकडे ठेवून एक हजाराची रकम आणून ती त्या स्वामींना देऊन टाका. चला, तुह्मांला कंठा देतों आणि मालिनींची पेटीही दाखवितों. ( सुशीलराव व सदानंद जातात, व इंदुमतीही जाते )

**सदानंद**:—( परत येऊन ) ( मालिनीस ) पाहिलास, तुझ्या बापाचा माझ्यावरचा विश्वास! पण आतां मी जास्त बोलत नाहीं. तुला विचाराला पुरी सवड देतों. ( जातो. )

**मालिनी**:—( सचिंत स्वगत ) हा [illegible] प्रकार बरें असावा? बाबांनीं तर घरची सारी ठेव ह्या दुष्टाला दाखवण्याचा आतां संकल्प केला! ( विचार करते. शान्तशील बाजूला प्रवेश करतो )

**शान्तशील**:—( बाजूला ) अहाहा! काय हें हिचें सौंदर्य!

[पद ६ वें.]

मालिनी चन्द्रवदन ॥ भृंगासि जणुं नालिनी ॥ भासे सुरस
थान ॥ ध्रु० ॥
मनिं देइ थारा ॥ कवण्या विचारा ॥ मुख सतत जें छान,
होत अजि कां म्लान ॥ १ ॥

( पुढें होऊन ) मालिनी, आज तूं विचारांत कसल्या पडली आहेस ?

**मालिनी:**—शान्तशील, माझ्या ह्या कौमार्याचा ठेवा सुरक्षित कसा राहील ह्याबद्दल आज मला मोठी काळजी वाटूं लागली आहे !

**शान्तशील:**—त्यांत काळजीचं कारण काय? आणि आतांच कसं तें उत्पन्न झालं ?

**मालिनी:**—शान्तशील, ह्या कौमार्याचा पवित्र ठेवा बाजारचा मेवा होऊं लागला तर नको कां काळजी करायला? पवित्र वस्तूला पवित्र वस्तूच्याच सहवास प्रिय वाटतो ! वैजयंती माळा विष्णूलाच कवटाळतात ! गंगोत्रीचा प्रवाह शुद्ध सागराच्याच पोटांत ठाव घेतो ! तसंच शुद्धाचरणी कुमारिकेला शुद्ध व पवित्र स्थानाचा आश्रय मिळण्याची उत्कंठा असणार; त्यांत जर कुणी आड येईल तर नाहीं कां काळजी उत्पन्न होणार ?

**शान्तशील:**—मालिनी, तुझा कोणीं अपमान किंवा कौमार्यभंग करण्याचा प्रयत्न केला काय? सांग मला, अशी संदिग्ध नको बोलूं.

**मालिनी:**—काय सांगूं:—

[पद ७ वें.]

छलाया बालिकेला, अदय सजला ॥ पापि पातला ॥
धरायाला कराला, अधम धजला ॥ पापि पातला ॥ ध्रु० ॥
बघुनि एकलीला, वदे कुटिल बोला ॥ बला दावी,
भया दावी कीं ॥ हृदया ताप जाहला ॥ १ ॥

त्या सदानंदानं आज आपलं कृष्ण हृदय खुलं करून दाखविण्याचा यत्न केला, पण तो त्याचा डाव साधला नाहीं, ह्मणून माझ्यावर तो क्रुद्ध होऊन गेला आहे! शान्तशील, तो चांडाळ माझ्या कौमार्यावर कुठार उगारून बसला आहे; मला कोणाचा आतां आधार आहे बरें?

**शान्तशीलः**—मालिनी, बोल त्याचा सूड कसा घेऊं तो! तुह्मा सर्वांवरील मित्रप्रेमानें कोणाही तुमच्या शत्रूचा सूड घेणं माझं कर्तव्य होऊन बसलं आहे!

**मालिनीः**—(नम्रतेनें) सूड! सूड कशाला घेतां आपण? तसं करायचं कांहीं कारण नाहीं. सूडाखेरीज अन्य उपाय आपल्या हातीं नाहींत काय?

**शान्तशीलः**—मालिनी, आजवर तूं अविवाहित राहिलीस हेंच तुझें दुर्भाग्य होय. मला वाटतें, सुशीलरावांनीं तुझा विवाह एखाद्या सन्माननीय गृहस्थाबरोबर आतां लवकर करून टाकावा, ह्मणजे कोणावरच सूड घ्यायचें कारण राहणार नाहीं.

**मालिनीः**—शान्तशील, समजलं! आपलं हें तोल संभाळून बोलणं समजलं!

**शान्तशीलः**—मालिनी, कां बरं? चालतांना जर तोल सांभाळला नाहीं तर जसं उपडं पडावं लागेल, तसं बोलतांनाही तोंड संभाळलं नाहीं, तर, तोंडघशीं पडावें लागेल! मालिनी, रागावूं नको. तूं पवित्र कर्म आचर; पावित्र्यानं रहा; ह्मणजे ईश्वर त्याचं सार्थक्य करील. तुला एकच सांगतो कीं, तुझ्या बाबांना तुझ्या विवाहाबद्दल जितकी काळजी आहे, त्याहून ती मला अधिक आहे.

**मालिनीः**—परभारें ही कटकट मिटावी अशीच ना काळजी? मग बरा आहे आपला हा मार्ग! कोणी अतिथी घरला आला कीं, त्याला अन्नछत्राचा रस्ता दाखवावा; कोणी तृषार्त आला तर त्याच्या डोळ्यांत बोट घालावं आणि मग तें त्याच्या डोळ्यांचेंच पाणी त्याला प्यायला द्यावं असाच ना हा क्रम?

**शान्तशील:**—तो क्रम कसा कां असेना, पण तुला एक गोष्ट सांगतों कीं, मला तुझं भविष्य कळलं आहे! लवकरच तुझा आतां विवाह होण्याचा योग आहे! [ इंदुमती आंतून हांक मारते ]

**इन्दुमती:**—मालिनी, अग मालिनी!

**मालिनी:**—अगबाई, मला आई बोलावीत आहेसें वाटतें! शान्तशील, माझं भविष्य आपण सांगायचं नसून ते रेखाटायचं आहे बरं!

**शान्तशील:**—ठीक! ( हांसतो; मालिनी हंसत जाते, तिच्याकडे पहात स्वगत ) ही काय बोलली त्याचा भावार्थ मला केव्हांच कळला! आज बागेंत हिनें माझ्याकडे व मी हिच्याकडे ज्या दृष्टीनें पाहिलें तेव्हांच आह्मा उभयतांच सुंदर भविष्य ईश्वरानें रेखाटलें आहे. पण, ह्या कार्याला आमचे बाबा आडवे येणार हें मला माहीत आहे. अलीकडे सुशीलरावांच्या स्थितींत अंतर पडूं लागल्यामुळे ते त्यांचा धिक्कार करूं लागले आहेत. हेच बाबा, सुशीलराव अधिकार पदावर होते, तेव्हां त्यांच्या घराचे उंबरटे झिजवीत असत. ठीक आहे, बाबा! करा, सुशीलरावांच्या ह्या नीतिमान घराण्याचा तुह्मी वाटेल तितका धिक्कार करा; पण, मी मात्र ह्या गरीब माणसांचाच केव्हांही उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीं.

[ पद ८ वें. ]

बाला सुशीला पाहवेना ॥ हो दुःख मम या मृदु मना ॥ध्रु०॥
तातें त्यजीलें हें साहवेना ॥ सुखवीन कुरु तोचि कामना ॥ १ ॥

( जातो )

# प्रवेश ५ वा.

[ **स्थळः**—रस्ता; कलाधर व बडबड्या प्रविष्ट. ]

**कलाधरः**—बडबड्या, मला तर आतां मुंबईला गेलं पाहिजे; माझी सुटी संपली. तूं माझ्या विश्वासाचा प्यारा दोस्त; ह्मणून तुला सांगतों कीं, आमच्या घरावर चांगली नजर ठेव. दादाच्या मृत्यूपासून बाबांनीं प्रपंचांतील मन अगदींच काढलं, आणि दांभीक, लबाड लोकांच्या ते नादीं लागले आहेत. आमच्या मातुश्रीही तशाच वेडावत चालल्या आहेत. विचारी मालिनी ! ( सुस्कारा टाकतो ) तिनें आतां कौमार्यावस्थतेंत किती दिवस खिचपत राहायचें ! पण, बाबांना ह्या गोष्टी अजून उमजत नाहींत. जोगड्यांना-साधूभोंदूना-जमवावें आणि पैशाची खैरात करावी ह्याशिवाय बाबा दुसऱ्या गोष्टी करीतनातसेच झाले आहेत. ( संतापून ) तो सदानंद, तो स्वामी ! आहे काय ही भानगड ? मला तर वाटतं, हा सदानंद बाबांच्या भोळसर स्वभावाचा फायदा घेऊन आमच्या घराची राखरांगोळी करून मोकळा होईल. पण, बडबड्या, आतां तूं संभाळ आमचं घर आणि आमच्या कुटुंबाची अब्रू.

**बडबड्याः**—कलाधरा, तूं निर्धास्त मनानें जा. ज्या घरचें अन्न मी आजवर खाल्लें त्याचें सर्वतोपरी रक्षण करणें माझें कर्तव्य आहे. मला तरी कां थोडें वाईट वाटतें ! पक्षिणीच्या घरट्यांत किलबिल करून हंसलीं खेळलेलीं आह्मी सर्वच पिलें ! मालिनी जशी तुझी, तशीच माझीही प्यारी बहीण ! कलाधरा, मी सुशिलरावांच्या पोटीं जरी आलों नाहीं, तरी विधिविहित योगानें मला पाठीचीं भावंडें सहज प्राप्त झालीं ! जन्मानें जरी मी दुर्दैवी, तरी कर्मानें मला मी सुदैवी समजतों ! ओसाड रानांत उगवलेलें तरूचें रोपटें सुशीलरावांनीं सहृदयतेनें आपल्या फुलारलेल्या बागेंत आणून शुद्ध उदक घालून वाढवलें ! मला अज्ञानाचा सज्ञान केला ! थोडे कां त्यांचे माझ्यावर उपकार झाले आहेत ! कलाधरा, तूं काळजी

नको करूं. तुझा बाप भोळा असला तरी नीतीनें--न्यायानें--सच्चा माणूस आहे. न्यायाधिशाच्या जागेवर होता, पण वांकड्या मार्गानें एक दिडकी मिळविण्याचा त्याला कधीं मोह झाला नाहीं. पाहतोस ना? संस्थानांतून फुकट न्यायाधिशी करायाला किती हरीचे लाल हुरळलेले असतात ते! कलाधर, तुझ्या बापाचं कर्म चांगलं आहे; आणि ज्याचं कर्म चांगलं, त्याला कालिकालाचीही भीति नसते!

**कलाधरः**—अरे, हा वेदांत झाला. पण, आतांचें जग कुठें आहे तसें? सारा लबाडीचा, फसवेगिरीचा, धंदा सुरू आहे, पहातोस ना? बडबड्या, मला नाहीं वाटत, हा सदानंद माझ्या बाबांशीं अकृत्रिम स्नेहानें वागत असेलसें! (संतापून) तसाच तो स्वामी! मला तर वाटतें तो पक्का ठग असावा! किंवा हे दोघेही एखाद्या ठगाच्या टोळीचे सांथिदार असावेत!

**बडबड्याः**—कलाधरा, तुझा संशय बरोबर असेल; पण लक्ष्यांत ठेव, मी त्या उभयतांवर चांगली पाळत ठेवून त्यांचा अंतरंग काय आहे तो पाहून घेईन.

**कलाधरः**—मला आतां पुष्कळ धीर आला; पण बडबड्या, तूंही साधाभोळा माणूस! बडबड करीत राहिलास ह्मणजे डोकीच्या टोपीची सुद्धां तुला शुद्ध रहात नसते! तुला सुद्धां कोणी कसा फसवील ह्याचा भरंवसा मला वाटत नाहीं.

**बडबड्याः**—कलाधरा, बडबड केल्याशिवाय आतांचें जग खडबडून जागें व्हायचें नाहीं. कानीं कपाळीं केलेली ओरड, आणि नीतीचा उपदेश हींच दोन मानवांच्या उत्क्रांतीचीं पोषक साधनें होत. मग ह्याला तूं बडबड ह्मण, नाहींतर वटवट ह्मण. जग सुधारायाला असंच कांहीं तरी करावं लागतं!

**कलाधरः**—कर, तुला काय वाटेल तें कर. जगाचा उद्धार किंवा सुधारणा राहूं देत. आमच्या कुटुंबाची सुधारणा कर आणि त्याची अब्रू सांभाळ, एवढंच माझं तुला सांगणं आहे.

**बडबड्या:**—कलाधरा, एरंडाला गव्हाचीं फोलें येत नाहींत, आणि कडु वृंदावनाला आम्रफलें लागणार नाहींत. दुष्कृत्याला शासन आणि सत्कृतीला उच्च स्थान हा देवाच्या घरचा न्याय आहे. तुझा बाप चांगला आहे; त्याचा नाश केव्हांही होणार नाहीं. जा, तूं अगदीं निर्भयपणे जा. घरची काळजी करूं नको.

**कलाधर:**—[ सद्गदित कंठानें ] बडबड्या, मला आतां हा सुहृत्प्रेमाचा उमाळा आवरत नाहीं! भेट मला एकदां! [ उभयतां भेटतात. ]

[ पद ९ वें. ]

वाटे खेद मनाला ॥ ध्रु० ॥ राहि गृहीं कुमारी ॥
योग्य विवाहाला ॥ १ ॥ फिरत भोंवति पहा कुटिल ते ॥
राखि सदा बाला ॥ २ ॥

बाबांना सांभाळ, आणि मालिनीच्या मनाचें सांत्वन कर; ती फार दुःखी आहे. जाऊं मी?

**बडबड्या:**—जा खुशाल जा. वरचेवर पत्र पाठवीत जा. [ कलाधर जातो; स्वगत ] मला रडें कां येतें? कलाधर माझा भाऊ नव्हे आणि सुशीलराव माझे वडील नव्हत. सहवासाचं सुख आणि वागवणुकीचा प्रेमळपणा ह्यांनींच मला हें सर्व कुटुंब आपलसं वाटूं लागलं! हा तर गेला, आणि घरची सर्व जबाबदारी ह्यानें माझ्यावर टाकली! सदानंदाचा स्नेह कृत्रिम आहे आणि तो स्वामी दांभिक असावा ह्या दोन गोष्टींबद्दल त्यानें मला बजावून वरचेवर सांगितलें असल्यामुळें अगोदर ती काय भानगड आहे हें मला पाहिलं पाहिजे. जावं असंच, आतां त्या स्वामीच्या ठिकाणाकडे आणि पाहावी काय खरी स्थिति दिसते ती! [ जातो ]

———:०:———

## प्रवेश ६ वा.

[ **स्थळः**—देऊळ; विलास संन्याशाच्या वेषांत बसला असून सभोंवार स्त्री पुरुष स्तुतिपर पद ह्मणत आहेत. ]

**स्त्रीपुरुषः**— [ पद १० वें. ]

आह्मी त्यागुनी संसार गुरूच्या चरणांते वंदूं ॥ ध्रु० ॥
भक्तिभाव ठेवुनी सदोदित ध्यानिं मूर्ति आणूं ॥
भवसागरिं जरि रुतलों तरी शिर वाहूं आनंदूं ॥ १ ॥
विरक्तिची अति रम्य भावना मनांतही बाणूं ॥
मिळविण्या मोक्षपद जें तयाप्रति गाउं दया सिंधु ॥ २ ॥

**विलासः**—( नमस्कार करणाऱ्या एका स्त्रीस ) कां ? आतां पतिराजांपासून कांहीं त्रास होत नाहींना ?

**स्त्रीः**—गुरुमहाराजांची कृपा झाल्यापासून सर्व त्रास चुकला. आपला उपदेश तिकडे चांगला पटलेला दिसतो; नाहींतर भांडणाशिवाय एक दिवस सुना जात नसे !

**विलासः**—आनंद वाटतो! ( स्त्री नमन करून जाते ) नारायण !

**एक शास्त्रीबुवाः**—( नमन करून ) आह्मी ज्याहेत्ते आतां कोणता मार्ग स्वीकृत करावा ? तीन दिन झाले, भोजन नाहीं ! ह्या जरारूपी भीषण अवस्थेंत विवाह विस्मयाचा अतिरेक झाला ! मृतपत्नीचा आग्रह, विवाह करावा ? आग्रह कां—ज्याहेत्ते नमन-केलें ! अतएव विवाह केला ! पण, पश्चात्ताप ! पश्चात्ताप ! ! अस्मादिकांवर प्रेमवर्षण किंतु कधचेंच नाहीं ! सदैव धिक्कार ! संताप ! काल अंगारा लावला पण युष्मादिकांचीच निंदा केली !

**विलासः**—आज त्यांनाच इकडे पाठवा.

**शास्त्री०:**—असें कांहीं भाषण केलें खरें! साधुदर्शन झालें पाहिजे. संगारा कशाला! दर्शनोत्सुक दिसत आहेत. करवितों, आज इकडे आगमन करवितों. शरीरबाधा, कां भूत, कां झोटिंग, ह्याचा निर्णय करावा! बहुत त्रस्त ज्याहेत्ति झालों आहे!

**विलास:**—हं! तदेव करावें! दिनद्वय आमच्या सहवासांत राहूं द्यावें, सर्व बाधा नाहींशी होईल.

**शास्त्री०:**—प्रशस्त! बहुत प्रशस्त मार्ग!! दिनद्वय कां ज्याहेत्ति रात्रंदिन सहवास झाला तर सुकर कार्यम्!

**विलास:**—नारायण! तदेव, तदेव करावें.

**शास्त्री०:**—शुभदिन भासतो. आगमन करवितों. आजच आगमन करावितों. [ जातो ] [ इतर लोक जातात ]

**विलास:**—[ स्वमत हांसून ] तिचं तारुण्य, ह्याचं वार्धक्य! तिला छळायला कामाग्नि तयार, तर ह्याला जाळायला मंत्राग्नि तयार! तिला पुत्रप्राप्तीची हौस, तर हा स्वर्गसुखासाठीं अधीर! तिला मंचकावर लोळण्याची इच्छा, तर ह्याला वैकुंठीच्या विमानांत बसण्याची उत्सुकता! तिला पंचपक्वानांची आवड, तर ह्याला पचनेंद्रियें बिघडण्याची विवंचना! जमावं तरी कसं ह्या उभयतांचं? असो; पण हे तंटे तोडणाराचा अलोट फायदा असतो. म्हातारा तिला आज अगदीं विश्वासानें इकडे पाठवील. एकंदरींत सदानंदानं हा एक धंद्याचा उत्तम मार्ग काढला खरा. मार्ग उत्तम खरा, पण त्यांत खटपट सुद्धां दांडगी आहे. त्या वंचकाकडून इथल्या प्रत्येक माणसाबद्दल अगोदर माहिती घ्यायची आणि कोणी आला कीं, त्या माहिती प्रमाणें त्याला भूतकाळच्या गोष्टी पटवून दिल्या, कीं, झालें काम. भविष्य काळच्या फलाबद्दल खात्री पटलीच! बाकी, आमचं भविष्य खरें ठरण्याचा काळ येईपर्यंत इथें राहणार आहे कोण? आतांपर्यंत तर कोठें फाजिती न होतां निभावलें! [ नूपुरांचे आवाज होतात; पुढें पाहून ] अरे, पण ह्या

कोण येत आहेत? ओ, हो! ह्यातर सुंदराजी! [ सुंदराजी येते ]

**सुंदराजी**:—[ विलासाला नमन करून ] मला नको झाला, महाराज, हा जन्म आतां! कुणा मेल्यांची किती प्रकारांनीं मर्जी संभाळूं? दररोज कांही भांडणाशिवाय दिवसच जात नाहीं. [ बडबड्या बाजूला प्रवेश करतो ] मला वाटतं टाकावा हा हलकट पेशा आतां, आणि लागावं देवध्यानाला!

**विलास**:—कां, कंटाळलात कां अशा!

**सुंदराजी**:—कंटाळलें, अगदीं कंटाळलें! नकोच हा हलकट पेशा आतां मला!

**विलास**:—छे, छे! अशा निराश होऊं नका! भगवंतांच्या गीतेंतल्या वचनाप्रमाणेंच आपण हें लोकसंग्रहाचें पवित्र कार्य करीत आहांत! नका, तें सोडूं!

**बडबड्या**:—[ बाजूला ] नायकीण आपल्या धंद्याला हलकट पेशा म्हणते, आणि गीतेचें वचन सांगून हा तें पवित्र लोकसंग्रहाचें कार्य म्हणतो आहे! खासा रोजगार!

**सुंदराजी**:—अहो पण, घरांत सारखीं भांडणें चालतात, त्याला काय करावं? तो फुलचंदशेट तर काल अगदीं बिथरून गेला होता. [ फुलचंद येतो ]

**फुलचंद**:—कशा नाहीं बिथरनार? महाराज, ही सुदंरा दोस्तीच्या कामांत हमा संगती बिमान करती! आमाला शंताप होते! आमचा पैसा खाती, उस्मान शाबाच्या दाडी बराबर झोंबाझोंब करती? हमी पोते पाह्यल! दाम देनार एक, दोस्ती दुसऱ्या बराबर?

**विलास**:—शेट जरा शांत व्हा, मी त्याला उपाय सांगतों.

[ भल्या पोटाचा उस्मान साहेब येतो ]

**उस्मान०**:—सामी म्हाराज, येतो झूटी बात है! सुंदर तो हमारी है. इसकू हम बहु धन दौलत दिया. कपडा दिया. हिरेका, सोनेका गह्यन दिया, सब् सब् दिया!

**विलास**:—हा वादग्रस्त प्रश्न आहे खरा! दोस्तीचा हक्क खरा कोणाचा हें ठरविण्याला कोणीं काय दिलें हें पाहिलें पाहिजे. काय उस्मान साहेब, सुंदराजीला आपण असं काय दिलं आहे सांगा.

**उस्मान०**:—छे हजार रुपया उस्को हम् रोख दिया! पूछो, पूछो उस्को! कपडा लत्ता, सोने, मोतीका गह्यना तो अच्छा अच्छा दिया!

**फुलचंद**:—अरे मी दहा हजार रुपया दिला। उस्मान्, तमे पै दिली न्हई! शुंदरा आमची! [ लंबोदर बुवा येतो ]

**लंबोदर**:—अरे, हा प्रेमाचा प्रश्न आहे! तुह्मीं उभयतांनीं द्रव्य देऊन प्रेमाची खरेदी केली, तर मी हरिकथामृताचे घुटके सुंदराजीला पाजून तिचा स्नेह संपादन केला! तिचें खरें प्रेम माझ्यावर आहे! स्वामी महाराज आपणच ह्याचा आतां निर्णय करा. ह्या उभयतांपेक्षां प्रेमाच्या दृष्टीनें विचार केला, तर माझा सुंदराजीवरला दोस्तीचा हक्क अधिक जारेकस आहे!

**विलास**:—सुंदराजीच्या दोस्तीच्या प्रेमाच्या हक्कांत आतां तीन वांटेकरी झाले! (शिंपी गज काठीसह येतो)

**शिंपी**:—आणि हा घ्या चवथा वांटेकरी!

**फुलचंद**:—अरे गळे कापू! तुमी कशाला पंचाईत करते? जारे तुमी!

**उस्मान**:—जावरे तुम्!

**शिंपी**:—स्वामी महाराज, सुंदराजीला उत्तम कटोरी चोळ्या शिवून देऊन तिचं प्रेम प्रथम आकर्षण करणारा मी आहे! मी तिला हें टांके मोडीचं काम करून पुष्कळ द्रव्य तर दिलंच आहे; पण माझ्या कारागिरीच्या जोरावरही तिला मी मोहून सोडलं आहे. तेव्हां हाताची कारागिरी आणि पैसा हीं दोन्ही खर्ची घातल्याचं श्रेय मलाच एकट्याला येतें, आणि ह्मणून प्रेमाच्या दोस्तींत पहिला हक्क माझा; असं मी ठासून सांगतों!

**विलास:**—दोस्तीच्या हक्कांत चौघांचा वांटा ! आतां हा प्रश्न कसा सुटावा ?

( एक पहिलवान येतो. )

**पहिलवान:**—तो मी सोडवितो. काय दिवाणे अदमी आहेत हे ? मस्तीशिवाय कां कुठं दोस्ती होत असते! औरतीला द्रव्य नको, कारागिरी नको, आणि काय नको ! जवानी, मस्ती हीं ज्याच्या अंगांत त्याच्याशींच तिची खरी दोस्ती असणार. दोस्तीचा हक्क खरा माझा !

**फुलचंद:**—( सरसावून ) अरे मस्ती करून काय कुस्ती खेळनेची बात है का ही? हो बाजूला.

**उस्मान:**—अरे हटो, बाजूसे हटो! मस्तीका क्या कारन है ?

**लंबोदर बुवा:**—अरे, ज्ञानामृतापेक्षां मस्ती कां कोणाला गोड वाटेल? हो बाजूला, हा तुझा विषय नव्हे !

**शिंपी:**—अरे, हा हातच्या कारागिरीचा प्रश्न आहे. हो बाजूला !

( पहिलवानाला सर्व मागें खेंचतात )

**विलास:**—बाबांनो, ह्या ठिकाणीं आतां कुणींच भांडूं नका. जा सारेच न्यायाधिशाकडे, आणि करून घ्या तुमच्या दोस्तीचा तंट्याचा निकाल!

**उस्मान:**—अच्छा है ! इस् पहिलवानके कोर्टमे खेचो ! ये दंगा मस्तीका बात कहते है.

**लंबोदर:**—चल रे कोर्टांत.

**फुलचंद:**—चलो भया कोरडमे!

**पहिलवान:**—ठीक आहे, चला कोर्टांत. जो बलवान तोच सुंदराजीच्या दोस्तीला लायख असाच कोर्टाचा निवाडा होणार !

**उस्मान:**—अच्छा, अच्छा, चलो, जलदी चलो, कोर्ट क्या करते देखो देखो ! [ सर्व त्याला खेंचून नेतात विलास व सुंदराजी राहतात ]

**बडबड्या:**—[ बाजूला ] स्वामीच्या पवित्र ठिकाणीं काय धुडगूस पहा हा! ह्या लबाडानें तर सर्वांना कोर्टाची वाट दाखवून नायकिणीला अखेर जवळ ठेवून घेतली!

**विलास:**—[ सुंदराजीस ] पाहिला, हा भांडणाचा प्रकार पाहिला मी आतां. सुंदराजी, जाऊं देत हे सारे कोर्टांत.

**सुंदराजी:**—अहो, ते कोर्टांत जाऊनही उपयोगाचं नाहीं! मला कोर्टाचं बोलावणं येईल!

**विलास:**—छे, ती नका काळजी करूं! मी उगीच त्यांना ह्मटलं. ते कोर्टांत कसचे मातीचे जातात! पण एवढें मात्र खरें कीं, पुन्हां माझ्याकडे मात्र एकएकटा येऊं लागेल, आणि मग प्रत्येकाची समजूत घालून, देतों त्याला तुमच्याकडे पाठवून! पण, कांहो सुंदराजी; ह्या मंडळींत कांहीं मदिराभक्त असतीलच!

**सुंदराजी:**—हो, हो, कांहीं कां सारे मेले तसेच! आणि मला सुद्धां त्यांनीं तो नाद— [ लाजते ]

**विलास:**—लाजूं नका. मी कांहीं तसा मद्यपाना विरुद्ध नाहीं!

**बडबड्या:**—[ बाजूला ] मी कांहीं तसा मद्यपाना विरुद्ध नाहीं! दुनिया कैशी झुकती है! ठीक करतो आहेस बाबा!

**विलास:**—बरें तर मग, एवढें कळल्यावर त्यांना बेतावर आणायाला मुळींच त्रास नको आहे. पण, कांहो, तुह्मांला गायाला चांगलंच येत असेल?

**सुंदराजी:**—कसलं आपलं बेताचं! आपली इच्छा ऐकायची असली तर यायचं एकदां आमच्याकडं!

**बडबड्या:**—[ बाजूला ] कळला सर्व प्रकार इथला आतां. हिनें त्याचा आश्रम पवित्र केला, आणि तो हिचें आतां घर पवित्र करणार! धितावरून भाताची परीक्षा, ही सगळी दगलबाजी आहे ह्यांत शंकाच नको.

**सुंदराजी:**—कां, बोलाना महाराज?

**विलास:**—[ विचार करून ] हो, येईन आपल्याकडे; पण आमच्या येण्याचा विशेष बोभाटा होतां कामा नये.

**सुंदराजीः**—छे, त्याची नको काळजी आपल्याला. आमच्या घरांना दोन दरवाजे असतात ते आपणाला माहीत असलेच. पण, यायचं झटलं एकदां! चुकायचं नाहीं! [ मुरका मारते, विलास हंसतो ]

**बडबड्याः**—[ बाजूला ] अरे, हें आहे काय कंलाट?

**विलासः**—मग तर अवश्य येऊं.

**सुंदराजीः**—मी येतें तर आतां! ( नमन करूं लागते. )

**विलासः**—छे, छे. नमन कशाला? आतां आपपरभाव कांहीं राहिलाच नाहीं. ( तिचें चुंबन घेऊं लागतो ती हंसत जाते )

**बडबड्याः**—( बाजूला ) हं! आपपरभाव राहिलाच नाहीं! ठीक केलंत, स्वामी महाराज! चला, झालं आपलं काम. ( जातो )

**विलासः**—( स्वगत ) संपली एकदांची ही गर्दी, आणि झालों मोकळा! आतां कांहीं कोणी लोक येणार नाहींत. सदानंद तर मोठा कुशल खरा! त्यानं आमच्या दर्शनाच्या अगदीं नियमित वेळाच ठरवून टाकल्या आहेत. ह्या नियमित वेळांत आह्मांला असें हातपाय बांधून घेऊन ह्या आसनावर तिष्ठत बसावें लागतें. जणुं काय न्यायाच्या कोर्टांत बसणारे न्यायाधीशच! बाकी न्यायाधीशाचे मार्ग निराळे, आमचे निराळे! अगदीं उलट! तो अनीति वाढूं नये ह्मणून गुन्हेगारांना शिक्षा देतो, आह्मी अनीतीचा प्रसार व्हावा ह्मणून सुंदराजी सारख्या पांखरांना जगांत स्वैर-गतीनें उडण्यासाठीं उत्तेजन देतों. तो कज्जेदलालीला आळा घालतों, आह्मी भांडणें माजवितों. तो चोरांना शिक्षा करून समाजांतून बाजूला ठेवतों, आह्मी वंचकासारख्या चोरांना जवळ बाळगतों. दोघांचे मार्ग अगदीं उलट! ( सदानंद हातांत पेटी घेऊन येतो )

**सदानंदः**—( पेटी बाजूला ठेवून ) विलास एकंदरींत बहार केलीस बुवा! सुशीलरावाच्या घरांतून उठतांना उसन्या संतापाचं अवसान आणलेंस तें फार चांगलें केलेंस! नाहींतर फजितीची वेळ होती!

**विलासः**—अरे, मी कांहीं कच्च्या गुरुचा चेला नाहीं, पण ह्या करा-मतीचें सारें श्रेय तुला आहे. मांत्रिकाच्या मंत्राला धाब्यावर बसवावयासाठीं सर्प नुसती संतापानें फणा आपटून आपलं अवसान कायम ठेवतो, किंवा नखें काढून टाकलेला जंगली वाघ नुसत्या गुरगुरण्यानं लोकांची गाळण उडवून सोडतो, तसं मला त्यावेळीं करणें भागच पडलें.

**सदानंदः**—शाबास ! अगदीं ठीक केलंस ! बरं, पण, आतां पुढें काय करायचें ?

**विलासः**—सदानंद, मला वाटतं इथें थोडा काळ घालवून पुढील संचाराला ह्मणून आपण आतां चालतें व्हावें; कारण कुठें तरी आमच्या कपटनाटकाचा धागा कुणाला सांपडला कीं, पळतां भुई पुरें होईल. कलप केलेला ह्मातारा जसा आपला एखादा पांढरा केस जगाच्या नजरेला पडूं नये ह्मणून काळजी घेतो तशींच आमचीं छिद्रें कुणाच्या निदर्शनाला येऊं नयेत ह्मणून आह्मीही जपलें पाहिजे. कां ? तुला कसें वाटतें ?

**सदानंदः**—[ विचार करून ] कांहीं हरकत नाहीं; एकाच जागीं राह-ण्यापेक्षां जवळच कुठें तरी संचाराला ह्मणून जावं, आणि तिथें कांहीं चमत्कारिक प्रयोग करून तिकडचा आपला लौकिक इथल्या लोकापर्यंत येऊन पोंचेल अशी तजवीज करावी; ह्मणजे पुन्हां इकडे उजळ माथ्यानें यायला हरकत नाहीं. ठीक आहे, तसंच करूंया. अरे पण, हा आपला वंचक अजुन बाजारांतून कसा आला नाहीं ? [वंचक दारूच्या बाटल्या घेऊन येतो.]

**वंचकः**—हा तयार आहे, आणि हा बाजारही तयार आहे !

[ बाटल्या दाखवितो ]

**सदानंदः**—आला पहा नांव घेतांच ! अरे विलास, ह्याच्या एकं-दरींत गडबडीच्या वृत्तीवरून आपण ह्याला गडबड्या असें ह्मणूंया आतांपासून !

**विलासः**—होय. ठीक आहे. पण सदानंद आंत चला. हा पहा आरडत ओरडतच आला आहे !

**वंचकः**—अहो, भितां काय असे? जो जगाला भ्याला तो जगाला मुकला! मघां मला तो सुशीलरावाच्या घरांत कोंडून ठेवलेला कोंबडा—बड-बड्या-उपदेश करीत होता, उपदेश!

**सदानंदः**—काय तुला उपदेश करीत होता आणि कशाबद्दल?

**वंचकः**—दारू सोड ह्मणत होता! शहाणा माणूस आहे कीं नाहीं? एका परी मी हें जग सोडून जायाला तयार होईन, पण दारू सोडणार नाहीं! असें, खरमरीत उत्तर दिल्यावर बसला तोंड वांकडें करून!

**सदानंदः**—आह्मांतच तसे आपण एकनिष्ठ भक्त!

**विलासः**—पण, कायरे, हा बडबड्या करीत असतो काय उद्योग?

**वंचकः**—अहो उद्योग कसला? सुशीलरावाच्या अन्नावर माजलेला एक तो पोळ आहे झालं! उपदेश, उपदेश ह्मणत ह्या जगाच्या बाजारात उगाच सैरावैरा धांवतो आहे! पण त्याची नांगी मोडण्याची युक्ति माझ्या-जवळ आहे. त्या शालिनीबरोबर तो बसतो आतांशा प्रेमाची खलबतें करीत! ह्मणून तिलाच त्याच्यापासून कशी दूर करावी ह्या खटपटींत मी आहे. थोडासा पैसा जमला कीं, जातों तिच्याकडे आणि पाहतों प्रयत्न करून!

**सदानंदः**—ठीक, ठीक. काढ एखादी फटाकडी बायको शोधून. आह्मी तुला मदत करूं.

**वंचकः**—अहो, तें तर आपलें ठरलेंच आहे. ह्या दोस्तीच्या धंद्याच्या मंथनांतून वाटेल तितकीं आणि वाटेल तसलीं रत्नें धुंडाळून काढतां येतील? मग त्या शालिनीची काय प्रतिष्ठा?

**सदानंदः**—बरें, चला आतां आंत.

**वंचकः**—अहो, आंत कशाला? अशी इथेंच आपण आतां मौज करूंया, पुढच्या दाराला मी कडी केव्हांच लावली आहे.

**सदानंदः**—बरं बुवा, तुझ्या मना सारखेंच होउं दे.

**सर्वजण:**—[ हातांत दारूचे पेले घेऊन ]

[ पद ११ वें. ]

दोस्ती झटपट ती झाली ॥ कैसि लटपट आम्ही केली ॥
मजेच्या या रंगांत रंगुनी जाऊं ॥ ध्रु० ॥
देवि मदिरा ही फार, आणि गुलजार तार ॥ मधु
मधुराही भारी गुणासि गाऊं ॥ काय दोस्तीची वात,
धन मिळते जगांत, काशि होई ही मात, खाशी
वाहवा–वा, वाहवा–वा, वाहवा–वा. ॥ १ ॥

**( पडदा पडतो )**

**[ अंक पहिला समाप्त. ]**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थळ**:—लक्ष्मीपालाचें घर. पात्रें—लक्ष्मीपाल, पद्मिनी बसलेलीं आहेत. ]

**लक्ष्मीपाल**:—पद्मिनी, आतां सुशीलरावांच्या घरीं जाणें येणें बंद करायचें बरें! तीं माणसें कांहीं बरीं नाहींत.

**पद्मिनी**:—तें कां बाबा? सुशीलरावांसारखे शुद्धाचरणी गृहस्थ, इन्दुमतीबाईसारख्या साध्वी स्त्री, आणि कलाधर, मालिनीसारखीं नीतिमान् माणसें जगांत फार विरळा दृष्टीस पडतात. नीतीच्या प्रकाशानें चमकणारीं ह्या वसुंधरेच्या पृष्ठभागावर वास्तव्य करणारीं, बाबा, तीं रत्नें आहेत, बरें रत्नें! त्यांनी काय गुन्हा केला आहे?

**लक्ष्मीपाल**:—अग, तें सारें खरें, पण तें घराणें अगदीं कंगाल बनत चाललें आहे ना?

**पद्मिनी**:—बाबा, अवर्षणामुळें बागेंत फुलें नाहींशीं झालीं, ह्मणून विष्णूची मूर्ति भ्रष्ट ठरत नाहीं!

[ पद १२ वें ]

मानिं गणितां धनासी भारी, नच हें कळे ॥ सुजनासी
मुरारी तारी तुह्मां ना कळे ॥ ध्रु० ॥
शांत असत विपदीं जरि तो ॥ धीर ना ढळे ॥ १ ॥
नका करूं कोपा वदतें ॥ योग्य वाटलें ॥ २ ॥

[ सदानंद येतो ]

**सदानंद:**—शेट, आपल्या सुशीलरावांनीं एक हजाराची रक्कम कर्जाऊ मागितली आहे, द्या बरं तेवढी!

**लक्ष्मीपाल:**—ऐवजा शिवाय इथें दिडकी मिळायची नाहीं!

**पद्मिनी:**—बाबा, सुशीलरावांनीं मागितली ह्मणतात!

**लक्ष्मीपाल:**—सुशीलराव असो., नाहींतर तिस्मारखान् असो. जिन्नस ठेवल्या शिवाय कांहीं मिळायचं नाहीं!

**पद्मिनी.**—वाः बाबा, असं काय धिक्कारतां त्यांना? सुशीलराव अगदीं प्रामाणिक गृहस्थ आहेत बरं!

**लक्ष्मीपाल:**—पोरी, तुला ह्या व्यवहाराच्या गोष्टी कळायच्या नाहींत. सुशीलराव ह्मणे! काय करायचं आहे त्याच्या नांवाला! हातांत कवडी नाहीं, घरदार नाहीं, शेतभात नाहीं! नांवावरूनच एखाद्याची महती समजायची असली तर आपल्या धनपाल शागिर्दांचा नंबर श्रीमंतींत आमच्यावर लागेल!

**सदानंद:**—अहो, वाद कां तुमचा? मी हा कंठा आणला आहे, हा ठेवून घ्या आणि मगच रक्कम द्या.

**लक्ष्मीपाल:**—[ कंठा पाहून ] आतां कसं ठीक बोललांत! [ स्वगत ] एवढाच त्याच्याकडे शिलक राहिला होता. आतां मात्र हा पुरा कफल्लक बनला! [ उघड ] आपण कोण? आपलं नांव काय? धंदा कोणता? गोत्र? प्रवर? जात? भाऊबंद? विवाहित किंवा कसं?

**सदानंद:**—[ स्वगत ] अरे बापरे! कोर्टाच्या वकीलानें साक्षीदाराला कां इतकं कधीं खेचलं नसेल! [ उघड ] मला सदानंद ह्मणतात.

**लक्ष्मीपाल:**—दिसतां खरें, सदानंदी!

**पद्मिनी:**—[ स्वगत ] सदानंदी! बाबांना लोकांची चेष्टा करायची संवयच!

**लक्ष्मीपाल:**—सदानंद, पण धंदा वगैरे?

**सदानंदः**—आमचा धंदा ठरलेला नाहीं. मी विधुर आहे. गोत्र, प्रवर भटजीला दान दिले आहेत. शेतीभाती बुडाली आहे. भाऊबंद तुरुंगात आहेत—

**लक्ष्मीपालः**—[ मध्येंच ] पुरे, पुरे, पुरे! अहो, आपण आपले एक फटिंग आहांत, असें थोडक्यांत उत्तर दिलें असतेंत तर भागलें नसतें कां? एवढं चऱ्हाट कशाला वळलंत!

**सदानंदः**- जसं प्रश्नांच चऱ्हाट, तसंच उत्तरांचही चऱ्हाट! [ स्वगत ] मला उघड फटिंग ह्मणतो काय? बचाजी, तुलाही एक दिवस फटिंग बनवीन बरं, याद राखून आहेस!

**लक्ष्मीपालः**—बरं, ही सुशिलरावांची कामगिरी आपल्याकडे बरी!

**सदानंदः**—अशीच आपली दोस्तीच्या नात्यानें.

**लक्ष्मीपालः**—तो फटिंग झाला, आणि आपण फटिंग उपजलात! दोस्ती जमायला उशीर कितीसा लागणार? कांहो, पण, सुशिलरावांना ह्या रकमेची आतांच कां जरूर लागली?

**सदानंदः**—ते, ते, गांवांत त्रिकालज्ञानी स्वामी आले आहेत ते; त्यांना त्यांच्या मठाच्या जीर्णोद्धाराला मदत ह्मणून सुशिलराव ही रक्कम देत आहेत. शेट आपणही कांहीतरी त्यांच्या कार्याला हातभर लावला, तर पुण्य घडेल!

**लक्ष्मीपालः**—हां! तवढं मात्र बोलूं नका येथें! माझा हा धंदाच मला मोठा पुण्यमार्ग होऊन बसला आहे! नडल्या अडलेल्यांना कर्ज देऊन संकटांतून सोडवणें ह्मणजे थोडी पुण्याई आहे कां?

**सदानंदः**—[ स्वगत ] तुझ्या कर्जानं कोणीही संकटांतून मुक्त न होतां अधीकच त्यांत खिचपत मात्र पडायचा! [ उघड ] हो, हो. तेंही खरं आहे! पण, काय हो शेट, आपली सावकारीची मजल आतां कुठवर आली आहे?

**लक्ष्मीपाल**:—तें तुह्मांला काय करायचें आहे? माझा व्यवहार अगदीं सरळ असतो. व्याज सरळ, हिशेब सरळ, पावती सरळ, सर्व कांहीं सरळ!

**सदानंद**:—[ स्वगत ] तूं तेवढा कमरेंत वांकला आहेस, तेवढीं एकदां मोडून तुलाही केला पाहिजे सरळ! [ उघड ] बरं मग, आपण कांहीं त्या स्वामींना देत नाहीं तर?

**लक्ष्मीपाल**:—मला असलीं ढोंगें करून परमार्थ साधायचा नाहीं! माझा धंदा तोच माझा स्वार्थ आणि परमार्थ!

**सदानंद**:—[ स्वगत ] धंदा तोच स्वार्थ आणि परमार्थ! खाशी!

[ गोरक्षणवाला येतो ]

**गोरक्षणवाला**:—शेट, गोरक्षण फंडाला मदत करा;

श्लोक.

गोमाता सविता पिताच जननी वंदा नरांनो सदां ॥
येई संकट मानवा इहजगीं धैर्या न सोडा कदां ॥
ईशाते स्तवुनि सदैव नमुनि अर्पा धनाते तदा ॥
धेनूते धन अर्पितां पळाति त्या संसारिच्या आपदा ॥ १॥

गोमाता की जय!

**लक्ष्मीपाल**:—शंख केलास, तरी इथें कांहीं मिळायचें नाहीं!

**गोरक्षणवाला**:—शेट, एक पैसा तरी टाका ह्या पेटींत.

**लक्ष्मीपाल**:—आण पाहूं, ती पेटी इकडे. [ पेटी घेऊन आंत ठेवून येतो ]

**पद्मिनी**:—बाबा, हें काय केलंत? त्याला कांही द्यायचं असेल तर द्या, त्याची पेटी कशाला ठेवून घेतलीत? [ स्वगत ] काय मेला चिकटपणा हा!

**लक्ष्मीपाल**:—तूं नको ह्या गोष्टींत मन घालूं.

**गोरक्षणवाला:**—शेट, माझी पेटी!

**सदानंद:**—(बाजूला) खासा रोजगार! पैशाकडे पैसा कसा जातो ह्याचा दृष्टांत हा त्याला दाखवून देतो आहे!

**गोरक्षणवाला:**—शेट, द्या माझी पेटी!

**लक्ष्मीपाल:**—तूं निष्कारण वटवट केलीस आणि माझा व्यवहाराचा मोलाचा वेळ घेतलास! नाहीं देत जा तुझी पेटी!

**गोरक्षणवाला:**—आतां काय करावें?

**सदानंद:**—इकडे कशाला यावें? [ दुसरा फंडवाला येतो ]

**फंडवाला:**—शेट, बालिकाश्रम फंडाचा मी सेक्रेटरी आहें. आपल्या नांवची किती रकमेची पावती करूं? आपला श्रीमंतीचा लौकिक ऐकून इकडे आलों आहे. तेव्हां—

**लक्ष्मीपाल:**—(मध्येंच) तेव्हां-मी ह्मणतों, आलात तसे चालते व्हा.

**सदानंद:**—(स्वगत) ह्याच्या श्रीमंतीच्या लौकिकाबरोबर ह्याच्या कद्रूपणाचा लौकिक ह्याला माहीत नाहींसा दिसतो.

**फंडवाला:**—पहा शेट, स्त्रीशिक्षणाच्या पवित्र कार्याला हा पैसा लागणारा आहे! नका असे तडका फडकी बोलूं!

**लक्ष्मीपाल:**—खड्डयांत पडो तुमचं स्त्रीशिक्षण! तुह्मी सर्वांनीं आज आमच्या घरावर टोळधाड घालायची असं ठरवलं आहे वाटतं! एकदां सांगितलेलं समजत नाहीं का?

(कुडबुड्या जोशी येतो)

**कुडबुड्या:**—धन्याचं द्वांद वाडल गा! आईची कुरपा होइल गा! नांव लौकिक गाजल गा! (कुडबुडें वाजवतो)

**लक्ष्मीपाल:**—अरे बुवा, बुवा, बुवा! काय ही कटकट! चला सदानंद आंत तुह्मांला रक्कम देतों. ओसरीवर बसण्याची आतां सोयच राहिली नाहीं. (दांत ओंठ खात सदानंदासह आंत जातो)

**फंडवाला**:—खाशी केलं! म्हातारा उठूनच गेला! (गोरक्षणवाल्यास) तूं काय कामाला आला होतास रे?

**गोरक्षणवाला**:—आमचं काम उत्तम झालं! इथं कांहीं मिळालं तर नाहींच, पण जवळचं माल गेलं!

**पद्मिनी**:—थांब बुवा. तुझी पेटी मी आणून देतें. (आंतून पेटी आणून) ही घे तुझी पेटी. (पेटी देत)

**फंडवाला**:—वाहवारे लक्ष्मीपाल! एकूण तुझी पेटीच घेऊन बसला होता म्हणायचा!

**गोरक्षणवाला**:—अहो, द्रव्याचा त्याला मद आला आहे मद! उतरेल तो थोडक्यांत? (गोरक्षणवाला व फंडवाला जातात)

**कुडबुड्या**:—आता न्हाय द्वोंद वाजायच! आइची कुरपा व्ही न्हाय व्हायची! कर्नाचा अवतार सावकार! (कुडबुडें वाजवीत जातो)

**पद्मिनी**:—(स्वगत) इतक्या लोकांच्या शिव्याशाप घेण्यापलीकडे बाबांनीं द्रव्य संपादून अधिक काय मिळवलं बरें? मला सुशीलरावांचं घराणं आवडतं, आणि कलाधरांच्या कलेनें तर माझं मन मोहून गेलं आहे!

[ पद १२ वें. ]

प्रिया सुकुमार तुझी मूर्ति ॥ कला तैंसीच नामी ती ॥ ध्रु० ॥
कसें रंगे तुझ्या रंगीं, चित्त माझें मला भ्रांति ॥ १ ॥
प्रेमकलिका विकासीली, सुखावीली त्वां पहा अंतीं ॥ २ ॥

पण, आतां मात्र आपण मजवर रागावला आहां! मुंबईस जातांना मला कां बरं भेटला नाहींत? मी काय असा अपराध केला बरं? पत्र नाहीं, निरोप नाहीं, ह्यावरून समजायचं तरी काय? (शान्तशील येतो) दादा, आलास कां तूं तपास करून? कलाधरांचं कांहीं पत्र मिळ?

**शान्तशील**:-नाहीं ताई, त्याचं कांहींच पत्र नाहीं. बाकी ह्या खेपेला मुंबईला जातांना तो जरा रागांतच होता. बापाच्या भोळसर स्वभावाचा फायदा घेऊन कांहीं दुष्ट लोक घरच्या संपत्तीची राखरांगोळी करीत आहेत, हें पाहून तो फार त्रासून गेला. दुसरी, त्याच्या मनाला खिन्न करणारी गोष्ट ह्मटली ह्मणजे आमच्या बाबांचें त्याच्या कुटुंबाशीं तुसडेपणाचें वर्तन! पद्मिनी, खरे जे धैर्यवान असतात ते विपत्कालात आपला स्वाभिमान मुळींच सोडीत नाहींत, इतकेंच नव्हे तर, तो स्वाभिमान त्यांच्यामध्यें नवा जोम आणि नवें चैतन्य उत्पन्न करतो. हल्लीं संपत्तीच्या मदानें आमच्या बाबांचे डोळे फिरलेले आहेत, आणि ह्या फिरलेल्या डोळ्यांचीं बुभळें सरळ करणारा असा एखादा आकस्मिक प्रसंगच उद्भवल्याशिवाय ते शुद्धीवर यायचे नाहींत. मला सांग, बाबांनीं इतका धिक्कार करण्यासारखं सुशीलरावांनीं कोणतं पाप केलं आहे? दानशूरपणामुळं ते गरीब झाले एवढंच ना?

**पद्मिनी**:—होय दादा, पण ह्यांत त्यांचा अपराध तो कसला?

**शान्तशील**:—हा अपराध तर मुळींच नव्हे, पण मी तो सद्गुण समजतों. गरीब लोकांचे गळे कापून, बंड फितुरी करून, मित्रामित्रांत कलह लावून, आपण श्रीमंत बनूं पहाणारे आणि गरिबांना दास्यत्वांत लोटणारे स्वार्थी पुरुष, सच्च्या वर्तनानं व निढळाच्या घामानं द्रव्य संपादून राहणाऱ्या गरिबांपेक्षां नादान होत! खरोखर,

[पद १४ वें.]

धिक्कार जागा धनीका सजाया ॥ छळिती हे दीना
हरुनिया ॥ ध्रु० ॥ परदाम घेती वरी दास्य देती ॥
सुख नेति यश नेति ना यांस माया ॥ १ ॥

**पद्मिनी**:—होय; हेंच खरं दादा. बाबांनीं जरी सुशीलरावांवर करडी नजर केली तरी आह्मांला तसं करणं मुळींच चांगलं नव्हे! पण कायरे,

कलावरांचा राग तुझ्यावर किंवा माझ्यावर कां व्हावा? कां बरं त्यांच पत्र आलं नाहीं?

**शान्तशील**:—कां बरं न यावं? [ विचार करतो. ]

[ लक्ष्मीपाल व सदानंद मागील बाजूनें येतात, सदानंद जातो. ]

**लक्ष्मीपाल**:—( बाजूला ) पत्र ! पत्राशिवाय आतांच्या तरुण लोकांना सुचत नाहींसच झालं आहे ! सारी खलबतं पत्रांची ! टपालखात्यानं जर काय मोठा उपकार केला असला, तर तो ह्या तरुणांना आपल्या प्रेमाच्या वावड्या पत्रांतून फिरवून सोडायच्या मोठ्या सवलतीचा होय ! पण, ह्या वावड्यांचे धागे आम्हा वृद्धांच्या हातांत आहेत हें कुठं ह्यांना कळतें आहे ?

[ बडबड्या येतो. ]

**बडबड्या**:—( लक्ष्मीपालास ) शेट, आपले चिरंजीव घरीं आहेत कां?

**लक्ष्मीपाल**:—कां बुवा ?

**बडबड्या**:—त्यांना एक पत्र द्यायचं आहे.

**लक्ष्मीपाल**:—( तिरस्कारानें ) पत्र ! ( स्वगत ) आलं आणखी दुसरं हें पत्र !

**बडबड्या**:—होय, पत्र !

**लक्ष्मीपाल**:—आण इकडे तें.

**बडबड्या**:—अहो, तें तुमच्या नांवचें नाहीं !

**लक्ष्मीपाल**:—माझ्या मुलाचं पत्र मला पाहायालारे कोणती हरकत !

**बडबड्या**:—हरकत इतकीच कीं, आपण त्या पत्राचे मालक नव्हत.

**लक्ष्मीपाल**:—पत्राचा मालक ! अरे, जें काय ह्या घरांत होतें आहे आणि होईल त्याचा मीच मालक आहे !

**बडबड्या**:—हें पत्र कांहीं आपणाला मिळायचं नाहीं !

**लक्ष्मीपाल**:—[ वेडावून ] बरं, जा आंत ! ता शान्तशील आहे तिथे । [ बडबड्या पुढें होतो ] ( स्वगत ) हा पत्र मला दाखवीत नाहीं

ह्यावरून हें पत्र त्या भिकारड्या सुशीलरावाच्या मालिनीचं असावं, आणि कांहींतरी प्रेमाच्या गमतींत आमचे चिरंजीव गुंग झाले असावेतसें दिसतें! आपण हा काय प्रकार आहे तो पहावा. [ जरा पुढें होऊन लपून उभा राहतो ]

**बडबड्या:**—[ शान्तशीलास ] शान्तशील, [ मागें पाहून ] ( स्वगत ) म्हातारा लपून राहिला आहे दाराच्या तोंडाशीं! हीं पिकलेलीं माणसें लोकांच हृद्गत समजून घ्यायासाठीं चोरासारखीं टपलेलीं असतात! तरुणांच्या प्रेमाच्या भानगडींत भोंकाड पसरून आंत डोकावल्याशिवाय कधींही राहायची नाहींत.

**शान्तशील:**—कायरे बडबड्या, मला हांक मारलीस आणि पुन्हां स्वस्थ कां उभा आहेस? मागें वळून काय पहातो आहेस?

**बडबड्या:**—मला मागें एक पिशाच्च दिसतें आहे!

**पद्मिनी.**—काय पिशाच्च! मला भीति वाटते, दादा! मी आंत जातें कशी! [ जाते ]

**बडबड्या:**—[ स्वगत ] ही तर गेली! [ मागें पाहून ] म्हातारा अझून आहे दाराशीं.

**लक्ष्मीपाल:**—[ स्वगत ] आहे काय हें गौडबंगाल! पिशाच्च कुठला हा?

**शान्तशील:**—काय, पिशाच्च?

**बडबड्या:**—अहो, होय. पिशाच्च! खास, पिशाच्चच तो! आपले आजोबा-वडिलांचे वडील-पिशाच्चरूपानें ह्या वाड्यांत सैरावैरा हिंडत आहेत, असं मला एका मांत्रिकानं सांगितलं! ते फार दरिद्री स्थितींत मेले आणि आतां आपल्या घरांत संपत्ति फार झाली; तेव्हां श्रीमंतांच्या उपभोगाची वासना प्रबळ होऊन ते पिशाच्च बनले; असंही त्यानं मला सांगितलं. [ मागें पाहून ] अझून! अझून, दिसतो आहे तो मला!

**लक्ष्मीपाल:**—[ वावरून ] खरं! अगदीं खरं दिसतं आहे हें! आतांच दिवाणखान्याकडे एक अस्पष्ट आकृति गेली खरी! असेल, हा

पिशाच्च माझा बापच असेल! होता खरा अगदीं दरिद्री! आतां मी हें घर सोडून कुठेंही जायाचा नाहीं! तिजोरीजवळ सदां पडून राहीन.

[ जातो ]

**बडबड्याः**—[ मागें पाहून स्वगत ] गेला म्हातारा निघून! ठीक झालं! [ उघड ] शान्तशील, गेलं तें पिशाच्च! आतां माझ्या जिवांत जीव आला!

**शान्तशीलः**—अरे, पिशाच्चें आतां कुठेंच राहिलीं नाहींत. कांहीं तरी तुला तो भ्रम झाला.

**बडबड्याः**—असूं दे कीं, तें आतां, भ्रम कां होईना मला झाला खरा. बरें, मालिनीताईनीं हें पत्र आपणांला दिलं आहे. [ पत्र देतो ]

**शान्तशीलः**—[ पत्र वाचून ] काय ही ह्या कोमल कुमारिकेची दुःस्थिती! बडबड्या! हा सदानंद आतां कुठें आहे?

**बडबड्याः**—अहो, तो त्या स्वामी बरोबर नुक्ताच निघून गेल्याचें समजतें. आमचे बाबासाहेबही त्यांच्या सहवासाचं सुख घेण्याकरितां ह्मणून जाणार होते, पण आह्मी सर्वांनीं विनवणी करून तो त्यांचा बेत राहित केला. शिवाय ह्या दोघा लबाडांनींही संचार करून आह्मी लवकरच परत येतों ह्मणून त्यांस कळविल्यामुळें ते जरा स्वस्थ राहिले.

**शान्तशीलः**—पण, कायरे बडबड्या, सुशीलरावांच्या मनावर असा भलता परिणाम व्हावयाला ह्या लोकांनीं चमत्कृति तरी काय करून दाखविल्या?

**बडबड्याः**—ऐका. त्या चिदानंदानें भूतकाळच्या गोष्टी तंतोतंत सांगून कांहीं भविष्य सांगितलं; कोणा बाईला मूल होत नव्हतं, तिला तें प्राप्त करून दिलं; कोणा जरठ तरुणीच्या जोडप्याचा संसार सुखाचा करून दिला! कुठें काय अन् कुठें काय पुष्कळ चमत्कार केले ह्मणतात! बाबासाहेबांना तर प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या चतुर्भुज मूर्तीचें दर्शन घडवलें असेंही ह्मणतात!

**शान्तशील**:—ह्मणतात? तूं कांहीं पाहिलं नाहींस काय?

**बडबड्या**:—अहो, मी पाहिलं तेंही एक अद्भूतच होतं! अगदीं अद्भूत बेघा!!

**शान्तशील**:—तें रे काय?

**बडबड्या**:—अहो, संन्याशाचं प्रेममीलन!

**शान्तशील**:—संन्याशाचं? आणि प्रेममीलन? पण, तें कसं? कुठं? सांग तरी पाहूं!

**बडबड्या**:—एका नायाकिणीच्या ठायीं महाराज!

**शान्तशील**:—मला नाहीं कळलं बुवा!

**बडबड्या**:—तुह्मांला कसं कळावं? संन्याशांना बायका असत नाहींत आणि नायाकिणींना नवरे असत नाहींत! मग काय, दोघे समसुखी ह्मणा किंवा समदुःखी ह्मणा, एके ठिकाणीं जमल्यावर प्रेममीलनाला कितीसा अवकाश लागणार?

**शान्तशील**:—काय? त्या स्वामीचा असला कांहीं घाणेरडा प्रकार आहे कां रे?

**बडबड्या**:—होय. मी प्रत्यक्ष तो पाहिला!

**शान्तशील**:—अरे, अरे! किती नीच लोक रे हे!

**बडबड्या**:—आपणाला पटलं ना माझं सांगणं?

**शान्तशील**:—अरे, तूं कां कांहीं खोटं सांगशील! मला खरं वाटलं! ह्या दांभिक लोकांवर माझा केव्हांच विश्वास बसला नव्हता व पुढें मागें बसणारही पण नाहीं.

**बडबड्या**:—पण, शान्तशील, आतांचं सर्व जग कुठं आहे तसं? मी प्रत्यक्ष पाहिलेली गोष्ट आपणाला सांगितली आणि आपण ती खरी मानलीत; पण बाबासाहेबांना माल जें अप्रत्यक्ष कळलं तें खरं वाटलं, आणि मी जें प्रत्यक्ष पाहिलं तें खोटं वाटलं! अहो, दुनयेचा रंगच कांहीं

विचित्र झाला आहे! आगगाडीच्या डब्यांत मेंढरासारखं खेंचून घेणं आवडतं, पण राम्या गाडीवानाची स्वतंत्रतेची बैलगाडी नकोशी होते; तोडाच्या वाफेसरसी फाटणारा चिटाचा खमीस पुरवतो, पण खादीची धनधकट बंडी नकोशी होते; दीडदिमडीची नकली इअररिंग सुंदर वाटते, पण लाखो रुपयांची हिरकणी तुच्छ दिसूं लागते! सत्य बोलण्याची चोरी! सत्य आचरण्याची चोरी! सत्याला लाथाडलं, आणि नकलेवर विश्वासून बसलों! साधु कोण, भोंदू कोण, मित्र कोण, शत्रु कोण, चोर कोण, सावकोण हें न कळण्याइतके आह्मी दिङ्मूढ झालों; आणि आह्मी दिङ्मूढ झालों, ह्मणूनच सदानंदासारखे तिन्हाईत लोक गबर झाले! शान्तशील, तुह्मी तरी सावध रहा, आणि सत्य शोधण्याच्या मार्गाला लागा.

**शान्तशील**:—बस्. मला पटली ही गोष्ट! बडबड्या, आज तूं माझे चांगले कान उपटलेस! आहे खरी आपली तशी स्थिति! बरं तूं जा आतां. मालिनीच्या पत्रासंबंधानं काय करायचं तें मी ठरवितों, आणि मागाहून तिला कळवतों. आतां तिला इतकंच सांग कीं, कोणत्याही गोष्टीची काळजी करण्याचं कारण नाहीं.

**बडबड्या**:—बरं तर; जातों मी. [ जातो ]

**शान्तशील**:—[ स्वगत ] काय करावं बरं? [ विचार करून ] करा-यचं काय? मालिनीच पाणीग्रहण करून तिला तिच्या कष्टमय कौमार्य स्थितींतून सोडवणं ह्मणजेच सदानंदा सारख्या दुष्टांचा सूड घेणं होय तेव्हां अशीच गोष्ट मला आधीं केली पाहिजे. ह्या सदानंदाचा सूड घ्यायचा मी जर मनांतच आणीन तर ह्याचे राई राई एवढ तुकडे क्षणार्धांत करून मी मोकळा होईन.

[ पद १५ वें. ]

नच वाटिका लागे लोटण्याला ॥ कालधामा पापकामा ह्या रिपूला॥ ध्रु०॥
कांति गमेही अनार्या मना ॥ सुशीलता खरी ना ॥
परि वरीन जरि, प्रिय साध्वीला ॥ खास मुक्ति या खला ॥ १ ॥

कदाचित्, बाबा ह्या कामीं हरकत घेतील, पण पाहीन त्याला सुद्धां काय उपाय करायचा तो! [ जातो ]

——:o:——

## प्रवेश २ रा.

[ **स्थळः**—जुनी धर्मशाळा; एक प्रवाशी प्रवेश करितो. ]

**प्रवासीः**- ( स्वगत ) सोबतीशिवाय प्रवास करणं खरोखरच बिकट काम! ह्या धर्मशाळेला दार नाहीं, बंदोबस्त नाहीं; भिंती तर पडक्या आहेत! आतां इथें एकटं पडायचं कसं? शिवाय ही जडजवाहिराची जोखम संभाळायाची तरी कशी? ह्या धर्मशाळेंत तर चिटपांखरूं दिसत नाहीं. परमेश्वरा, ह्या प्रसंगाला सोबती ह्मणून कोणी तरी प्रवाशी येईल तर फार बरें होईल! मला ही जोखम जालीम विष वाटते आहे. ऐवज जायाचा जाऊन प्राण जायाचा प्रसंग येईल! ( बसतो. )

[ वंचक बाजूला प्रवेश करतो. ]

**वंचक** :—[ स्वगत ] स्वामीच्या मुक्कामाची व्यवस्था करायला त्या सदानंदाने मला एकटा पुढें लोटला! हे दोघे बाजीराव आतां मागाहून आयतोबा ह्मणून येतील! रात्र तर आतां बरीच झाली! उतरायला जागा शोधीत शोधीत एथवर आलों, पण कुठें कांहीं थारा दिसत नाहीं. ( पुढें पाहून ) ह्या अंधरांत दिसतं आहे कुठं काय? हो! कांहीं पांढरेसें दिसतें खरें! एखादा पडक्या इमारतीची ही भिंत असावी ( काडी ओढून पहातो ) अरे, ही तर धर्मशाळा! व्हावं आतां पुढें?

**प्रवासीः**—( स्वगत ) आतां उगीच तिष्ठत किती वेळ बसायचं? पडावं झालं! परमेश्वर रक्षण करणारा समर्थ आहे. ( वळकटी सोडतो व गांठोडें उशाखाली ठेवतो ) ( उघड ) अस्तिक, आस्तिक, आस्तिक! काळभैरव! ( पुटपुटत निजतो )

**वंचकः**—(स्वगत) कोणा माणसाचा स्वर ऐकूं येतो आहे! ह्म कोणी तरी प्रवासी असावा! (मेणबत्ती पेटवून पाहतो) हो! खास! स्वारी एकटीच दिसतें आहे! निजली आहे, झोंकात! (हासून) गांठोडं ही दिसतं आहे उशाला! बावळट प्रवाशा! तुझी गांठोडं संभाळायाची काळजी तुझ्या ह्या प्रेमळ दोस्तावर आतां येऊन पडणार! नीज, अगदीं स्वस्थ नीज! उचलावं कां हें गांठोडं? छे, पण तसं नको. ह्याच्या बरोबर आपण अगोदर थोडा दोस्तीचा धंदा करावा! चोरी जरी करायची तरी ती थोडी संभावीतपणानं केल्यानें कांहीं बिघडत नाहीं. (पाय आपटतो, प्रवासी दचकून उठून बसतो.)

**प्रवासीः**—(एकदम) अरे देवा, देवा! भूत! भूत!!

**वंचकः**—अहो, ओरडतां काय असे? चांगले जागे व्हा.

**प्रवासीः**—(डोळे चोळून) अरे हो! तुह्मी तर सभ्यगृहस्थ दिसतां! कोण हो तुह्मी, आणि कुठं निघाला आहांत?

**वंचकः**—आह्मी चोर!

**प्रवासीः**—छे, छे!

**वंचकः**—छे, छे, काय?

**प्रवासीः**—चोर कां कुठं आपण चोर ह्मणून सांगत असतो! ठीक, मी सोबतीची वाट पहातच निजलों होतों. आलात, ठीक झालं!

**वंचकः**—अहो! मी खराच चोर आहे!

**प्रवासीः**—पुरे विनोद राव! बसा खालीं आतां. आपली सज्जनाची गांठ पडली, म्हणून मला मोठा आनंद होतो आहे! बरं आपणाला जायाचं कुणीकडं?

**वंचकः**—आम्हांला जायाचं त्या धनपुरीकडं!

**प्रवासीः**—कामकाज कोणतं?

**वंचकः**—चोरीचं?

**प्रवासीः**—पुरे हो राव! खरं सांगा, नेहमीचा आपला धंदा कोणता?

**वंचकः**—चोरीचा!

**प्रवासीः**—तुम्ही फारच विनोदप्रिय दिसतांबुवा! (स्वगत) हा चोर तर खास नव्हे,. पण उगीच आपला एक गमत्या माणूस दिसतो! (उघड) कांहो, तुमचं नांव चोर, कां आडनांव चोर? खरं सांगा हं! आतां, विनोदाला फांटा द्या, कारण अति विनोद म्हणजे प्राणनाशच होय.

**वंचकः**—तसाच अतिशहाणपणा सुद्धां प्राणनाशालाच कारण होतो, हो! शेट आम्ही आपले खरेच चोर आहोंत हो!

**प्रवासीः**—असाना; मी कांहीं तसं समजत नाहीं! प्रवासांत पहा नेहमीं अशीच गंमत उडत असते, असेच दोस्तीचे प्रसंग येतात! निजतांना मी ह्या जड जोखमीबद्दल अती काळजींत होतों. कोणी सोबती भेटेल कां म्हणून देवाचं चिंतन करीत होतों. देवानंच तुम्हांला धाडलं कीं हो!

**वंचकः**— (स्वगत) तुला तुझ्या देवानं धाडलं, आणि मला माझ्या दैवानं धाडलं! ( उघड ) खरोखरच हा दोस्तीचा प्रसंग अपूर्व आहे खरा! बरं, आतां आपण निजूंया. रात्र बरीच झाली.

**प्रवासीः**—ठीक! आपण आतां जवळ असल्यावर निर्धास्त झोंप यायला तरी कोणती हरकत? आतां खरा जर चोर आला तर त्याला पुरूनउरायला आम्ही दोघे झालों. पसरा, राव! तुमची वळकटी. आणि पडा स्वस्थ.

**वंचकः**—हो, हो! पडूंयाच तर आतां.

**प्रवासीः**—बरं! निजा राव. ( दोघे निजतात )

**वंचकः**—आतां तुम्हांला स्वस्थ झोंप यायला कांहीं हरकत नाहीं.

**प्रवासीः**—हो खरं; पण मला पहा निजतांना कुणी तरी कांहीं गोष्ट

सांगत राहावं आणि ती ऐकत पडावं अशी संवय आहे. सांगतां कां एखादी गोष्ट ?

**वंचकः**—हो, अवश्य! ऐका. माझ्या प्रत्येक वाक्याच्या शेवटीं हूं म्हणत राहा, आणि तुमचं हूं म्हणायचं बंद झालं कीं, तुम्हांला झोंप लागली, म्हणून मी गोष्ट सांगायची बंद करीन.

**प्रवासीः**—ठीक, ठीक! चालूं दे.

**वंचकः**—हें पहा, एक होता बावळट माणूस! ( एक एक वाक्य दोन वेळां उच्चारतो )

**प्रवासीः**—हूं!

**वंचकः**—त्यानं केला सट्याचा व्यापार!

**प्रवासीः**—हूं!

**वंचकः**—त्यांत त्याला मिळाले दहा हजार!

**प्रवासीः**—काय! दहा हजार! हूं!

**वंचकः**—मग आणखी त्यानं खरेदी केलं जडजवाहीर!

**प्रवासीः**—हूं!

**वंचकः**—मग तो निघाला आपल्या गांवाला!

**प्रवासीः**—हूं!

**वंचकः**—रस्ता लांबचा पडला!

**प्रवासीः**—हूं!

**वंचकः**—वाटेंत दिवस मावळला!

**प्रवासीः**—हूं

**वंचकः**—अंधार मोठा पडला!

**प्रवासीः**—हूं

**वंचकः**—मग तो एका पडक्या धर्मशाळेंत निजला!

**प्रवासीः**—हूं! ( प्रवाशाला झोंप लागते )

**वंचकः**—मग त्याला एक सोबती भेटला! ( प्रवासी उत्तर देत नाहींसें पाहून ) मग त्याला एक सोबती भेटला, आणि त्यानें त्याला असा लुटला! ( त्याचें गांठोडें घेऊन पळून जातो )

**प्रवासीः**—मिला, पुढें काय झालें रे! ( कांहीं वेळानें जागा होतो व उशाखालचें गांठोडें नाहींसे पाहून ) अरे चोर! हा खराच चोर! ( धांवत निघून जातो )

———:0:———

# प्रवेश ३ रा.

[ **स्थळ**–रस्ता, कलाधर भगव्या वेषांत प्रवेश करतो ]

**कलाधरः**—( स्वगत ) घर सोडल्यापासून माझ्या मनाला स्वस्थता कसलीच वाटेनाशी झाली होती, आणि ह्मणूनच मुंबई सोडून मी इकडे आलों. ह्या तोतया स्वामीचें आणि सदानंदाचें कांहीं कारस्थान सुरू आहे असें मला बडबड्याकडून पत्र आल्यापासून तर माझ्या काळजाचा ठावच सुटला होता; आणि ह्मणूनच मुंबई सोडून वेष बदलून इकडे आलों, आणि सदानंदाची भेट घेतली. बाबांना हे लोक फसवून मोकळे होतील, इतकेंच नव्हे तर मालिनीच्या कुंवारपणाची माती करून तिचा सारा जन्म मातीमोल करून टाकायला ते मागें पुढें पाहणार नाहींत. मालिनी,

[ पद १६ वें. ]

नीच हा खल धरि वासना ॥ तुज छळण्या ॥ निर्मल जना
जरी ॥ ध्रु० ॥ मम मनिं सुख तिळ न हो कदा ॥
ताता मोही अधम सर्वदा ॥ घाता सिद्ध क्षणाक्षणा॥ १ ॥

मालिनी, तुझ्या हाडामासाचा हा भाऊ जिवंत असतां तुझ्यावर कांहीं प्रसंग यावेत, आणि त्यानें हात पाय बांधून स्वस्थ राहावें? छे! ही गोष्ट कदापि होणार नाहीं! मी उघड ह्या फटिंगांचा अपमान केला असल्यामुळें हे माझ्या घराचा नाश करायाच्या खटपटींत खास असणार! ह्या सदानंदा सारख्या सर्पाला आधीं दुखवूं नये, आणि दुखवल्यावर पुरा ठेंचल्या शिवाय सोडूं नये. अर्धवट ठेंचलेला सर्प, किंवा मर्मीं गोळी न लागतां पळून गेलेलं श्वापद हीं परिणामीं फार भयंकर होतात! आपणही आतां ठरल्याप्रमाणें ह्या भगव्या वेषांत ह्या अट्टल भोंदूंच्या सहवासांत राहून, त्यांच्या कारस्थानांवर नजर ठेवून, प्रसंग येईल तेव्हां जगाच्या उघड्या वेशीवर त्यांचीं दुष्कृत्यें चांगलीं टांगून टाकावीं! ठोंशाला ठोंसा, आणि सुडाला सूड असं केल्याशिवाय पापकृत्यांत खैरगतीनें वावरण्याऱ्या दुष्टांची खोड मोडणार नाहीं! (सदानंद येतो त्यास पाहून) आलाच हा भामट्या इकडे!

**सदानंदः**—एकूण, बायको मिळावी ह्मणून बावा बनलात ह्मणायचें! हें शास्त्र इतकें सोंपें आहे असें समजतां कीं काय? अहो, बावा बनायचं सोपं असतं, पण बावापण टिकवायचं कठीण असतं!

**कलाधरः**—होय, होय!

**सदानंदः**—होय, होय, काय?

**कलाधरः**—आपण ह्मणतां तें होय; आणि मी ह्मणतों तें नाहीं; ह्मणजे आपले विचार बरोबर आणि माझे चुकीचे असाच माझ्या ह्मणण्याचा भावार्थ! (स्वगत) बावाचं बावापण पारखायलाच मी हा कावा केला आहे!

**सदानंदः**—बायको मिळावी ह्मणून बावा बनलात, पण हें बुवा मला जरा चमत्कारिकच वाटतं! संसाराला त्रासून बायकोच्या कटकटींतून सुटावं ह्मणून कित्येक साधु बनतात, तर तुह्मी आपले बायकोचा विळखा गळ्याला बसावा ह्मणून साधु बनला आहांत! ठीक! पण, पैशाशिवाय

बायको मिळत नसते हो! आधीं कनक मिळवावं लागतं, मग कान्ता शोधावी लागते! आधीं आपली पेढी स्थापावी लागते, मग लोकांची तिजोरी चांचपावी लागते! बायको पाहिजे ह्मणे बायको! पैशाशिवाय आणि स्वतःचा खिसा गरम झाल्याशिवाय कांहीं तुह्मांला बायको मिळ-णार नाहीं.

**कलाधरः**—पण तो पैसा मिळवायचा कसा, सांगा तरी!.

**सदानंदः**—पैसा मिळवायचा कसा! अहो, बंटु संन्याशी, पैसा मिळवायचा प्रश्न ज्याचा त्यानेंच सोडवावा लागतो. बाकी, आमच्या पैसा मिळविण्याच्या नावांच्या धंद्यांत तुह्मी येऊं इच्छितां, ही गोष्ट ठीक आहे. पण, तुह्मांला एक गोष्ट सांगतों कीं, आमच्या संस्थेंत येण्यापूर्वी अगो-दर आपलं गुपित कोठेंही सांगायचें नांहीं अशी शपथ घ्यावी लागते. घ्या तर तशी शपथ.

**कलाधरः**—शपथपूर्वक मी ह्या धंद्याचं गुपित बाहेर फोडणार नाहीं.

**सदानंदः**—ऐका; आमचं विश्वविद्यालय जरी अजून निश्चित झालं नाहीं, तरी प्राथमिक संस्था, मध्यवर्ती संस्था, उच्च संस्था, ह्यांत मिळणारं सारं शिक्षण तूर्त तुह्मांला आमच्या चिदानंद आणि गडबडेराव ह्या दोन प्रोफेसरांकडून प्रत्यक्ष मिळूं लागेल. आह्मी खास प्रयोगांनाच आमच्या कार्यक्रमांत मुख्य स्थान दिलं आहे. आमच्या प्रयोगशाळा आह्मांला कायमच्या अशा बांधण्याचं कांहीं कारण नाहीं! नियमितपणा, वेळापत्रकं, हजऱ्या वगैरे नसत्या गोष्टींचीं आह्मी थोतांडें माजविलीं नाहींत! गीतेंतल्या "या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी" ह्या वच-नाच्या आधारें जरुरीचें काम आह्मी रात्रींच उरकून टाकीत असतों!

**कलाधरः**—थांबा, हें मला नीटसं कळलं नाहीं.

**सदानंद:**—अहो, रात्रीं जागायचं, दिवसा निजायचं असा त्याचा थोडक्यांत अर्थ घ्या! कारण, रात्रीचे प्रयोग जितके यशस्वी होतात तितके दिवसाचे होत नाहींत, असा माझा स्वतःचा समज आहे; पण आमचे चिदानंद आणि गडबडेराव हे ह्या सिद्धांतांतही नवे नवे शोध करूं लागले आहेत. संस्थेंत शिकून तयार होत असतांनाच द्रव्यप्राप्ति होत असते! ह्मणून स्कालरशिपासारख्या सवलती आह्मी कुणालाही ठेवल्या नाहींत.

**कलाधर:**—ठीक! मोठा मजेचा आणि सोपा असा हा शिक्षण-क्रम दिसतो. आपण मला ह्या संस्थेंत घेतलत, हा मोठा माझ्यावर उपकारच झाला ह्मणायचा!

**सदानंद:**—उपकार! आभार!!–वगैरे शद्ब आतां विसरा. ज्याचें द्रव्य आह्मी घेऊं, तोच आमचे एखादे वेळीं उपकार मानूं लागेल!

**कलाधर:**—[ साश्चर्य ] काय ह्मणतां! मग तर मोठी बहारच झाली! धन्य झालों, तर मग मी! कारण ह्या तुमच्या संस्थांतून शिकतां शिकतांच ह्मणे, पैसा मिळतो! कोणाचे उपकार मानायचे नाहींत, आभार मानायचे नाहींत; ठीक! परमेश्वरा, ह्या बाबांच्या संस्था आणि त्यांच्या ह्या पोटाला पैसा देणाऱ्या पोट शाखा ह्यांचा चिरकाल जयजयकार असो!

**सदानंद:**—जा तर, आतां अगोदर आंत. त्या चिदानंदांचे पाय धरा आणि बना शिष्य. पण लक्ष्यांत ठेवा हो, ह्या धंद्याचं रहस्य कुणाला प्राण गेला तरी सांगायचं नाहीं अशी पुन्हा शपथ घ्या!

**कलाधर.**—हो, अगदीं तुमच्या गळ्या शपथ मी धंद्याचं रहस्य बाहेर फोडणार नाही! [ स्वगत हंसत जातो ]

**सदानंद:**—[ स्वगत ] ही चीज मी कां जवळ करतों आहे ह्याचं कारण अगदीं निराळं आहे. आमच्या विलास ऊर्फ चिदानंद स्वामींच्या चमत्काराचे प्रकार ह्या गांवांत मोठे बहारीचे होऊं लागले आहेत, असें मी नुक्तेच सुशीलरावाला पत्रानें कळवलें आहे, आणि हें पत्र पोंचतांच

सातारा ह्या कुंडिणपुराला धांवत निघून येईल. आतां आपण विलास पूरला जाऊन मालिनीवर हल्ला करून पहावा. तिच्या कौमार्याचा आस्वाद मिळाला तर ठीकच, नाहींतर तिच्या सौभाग्यावर हल्ला करून आपली कामवासना हा निश्चयी सदानंद केव्हांही पुरी केल्याशिवाय राहणार नाहीं!

[ जातो ]

———:o:———

# प्रवेश ४ था.

[ **स्थळ**—आमराई. गडबड्या प्रविष्ट. ]

**गडबड्या**:—[ स्वगत ] श्वास कोंडून मेल्यासारखं पडायची कला तर आपणाला बरीच साधली! आतां ठरल्याप्रमाणें झाडावरून खालीं पडायची बतावणी करून कांहीं वेळ प्रेत होऊन पडायचं हा प्रयोग येथल्या भोळ्या नंदींना करून दाखविण्याचं काम अस्मादिकांकडे आलें आहे! प्रयोग तर बिकट खरा! सर्वच गोष्टी साधल्या तर ठीक, नाहीं तर प्रेताचें सोंग आणतांना खरोखरच मी मेलों असें समजून लोक मला जाळून सुद्धां मोकळे होतील! ह्या साहसाच्या कामांत ह्मणे रगडून पैसा येथल्या लोकांकडून मिळेल! पैसा मिळेल खरा पण माझा जीव जाईल, त्याला जबाबदार कोण? [ विचार करून ] छे! असं भिऊन काय होणार? ( एका झाडाकडे पाहून ) हो, बरं दिसतें आहे हें झाड. फार कांहीं उंच नाहीं. टाकूं या आतां एक उडी! उडी हलकीच झाली तरी हरकत नाहीं, पण पडल्याचा आवाज मोठा झाला पाहिजे! चला, गडबडेराव, घ्या देवाचें नांव! हे परमेश्वरा, हे दिगंबरा, हे द्रौपदीच्या पित्या, अरे रावणपिता रामचंद्रा, सारे धांवा ह्या वेळीं आणि करा माझें रक्षण! ( उडी टाकतो व पडण्यांत आवाज होतो. ) अहो मेलों, मेलों! धांवा, लोकहो धांवा!! [ मेल्यासारखा पडतो, लोक जमतात ]

**म्हातारा मनुष्य:**—(गडबड्यास पाहून) अरे, अरे, अरे! बिचारा झाडावरून पडला वाटत!! कोण अभागी मनुष्य हा? बिचाऱ्या कशाला चढला होतास वर? (त्याला चांचपून पाहतो)

**दुसरा मनुष्य:**—अहो थांबा, दुगदुगी दिसते आहे अजून. अरे, पाणी आणा, पाणी!

[एक मनुष्य पाणी आणतो व शिंपडतो]

**पहिला मनुष्य:**—अहो कशाला शिंपडतां पाणी? मुळांतच जो गार पडत चालला त्याला आणखी गार कशाला करता? राहूं दे; नका पाणी उगीच शिंपडूं!

**तिसरा मनुष्य:**—मेला बुवा, हा मनुष्य खास मेला, आतां.

**चौथा मनुष्य:**—थांबा. उपाय करायला अजून एक जागा आहे.

**तिसरा मनुष्य:**—अहो, काय उपाय राहिला आहे आतां? चला, उचला हें प्रेत! टाकूं या एकदां फुंकून! आतां, काय त्यांत राहिलं आहे? अगदीं बर्फाप्रमाणें थंड झालं आहे! उचला, लवकर.

**चौथा मनुष्य:**—अहो, नका अशी गडबड करूं! मला उपाय सुचला आहे. (जवळच्या एका मुलास) जारे पळत, त्या सिद्धेश्वराच्या देवळांत. तिथें नुकतेच एक स्वामी आले आहेत. त्यांना सांग ही सारी हकीगत. संजीवनी मंत्र त्यांना अवगत आहे असं कालच मला कोणसा बोलला! जा लवकर, त्यांना सांग ही हकीगत, आणि घेऊन ये इकडे. [विलास स्वामीच्या वेषांत कलाधरासह प्रवेश करतो]

**विलास:**—हा मी आलोंच! कोणी माणूस झाडावरून पडून मृत झाल्याचें मला अन्तर्ज्ञानानें कळलें! (गडबड्यास पाहून) हाच कां तो?

**तिसरा मनुष्य:**—होय हाच! काय महाराज, आपली योग्यता ही! आणि केवढें आपलें अन्तर्ज्ञान हें!

**एक तरुण:**—(पुढें येऊन) काय मूर्ख लोक आहेत हे! कावळा बसायला आणि फांदी मोडायला गांठ पडते. असे कांहीं प्रकार होतात केव्हां तरी! अन्तर्ज्ञान ह्मणे! कसचें मातीचें अन्तर्ज्ञान आहे ह्याला? नुसता भगवा पोशाक घातला अंगावर, कीं झाला स्वामी! आणि झाला महाराज! पहातों कीं आतां! हा महाराज ह्या मेलेल्या माणसाचें काय करता तें! (मंडळींत जाऊन सर्वांस) अहो लोक हो, जर हे स्वामी महाराज ह्या मृत माणसाला जिवंत करतील, तर मी ह्यांना हीं माझीं सलकडीं आतांच्या आतां देऊन टाकीन!

**विलास:**—थांबा, थांबा! मला सांगा, हा केव्हांसा मेला?

**एक मुलगा:**—बरोबर! जीव गेला तेव्हां!

**ह्मातारा मनुष्य:**—(मुलास) अरे चूप बैस. (विलासास) महाराज, अगदीं नुकताच; ह्मणजे एक अर्धी घटका झाली असेल ह्याला मरून!

**विलास:**—ह्या वृक्षावरूनच पडला काय?

**मुलगा:**—नाहीं, छपरावरून खालीं उतरला!

**ह्मातारा मनुष्य:**—(मुलास) अरे चूप! बोलूं नको उगीच मध्यें! (विलासास) होय महाराज, ह्या वृक्षावरूनच पडलेला दिसत आहे!

**विलास:**—ह्या आम्राईंत कधीं कुणाच्या नजरेला पिशाच्च्यांच्या आकृति पडल्या होत्या काय?

**मुलगा:**—होय; इथें मूर्ख आणि जिवंत भुतें आतांच उभीं राहिलेलीं दिसत आहेत!

**ह्मातारा मनुष्य:**—(मुलास रागावून) कुणाचें हें टारगट कार्टें मध्यें मध्यें बोलतें आहे? चलरे, येथून चालता हो! (सोटगा उगारतो, मुलगा

पळून जातो ) ( विलासास ) महाराज, लोकांना ह्या बागेंतल्या भूतबाधे बद्दल शंका आहे खरी. बरोबर आहे महाराज, पुष्कळ लोकांना ही शंका आहे इतकंच नव्हे पण तसे अनुभवही आले आहेत. अमावास्येच्या रात्रीं इथें भुताखेतांची बाधा होते ह्मणून कोणी इकडे फिरकत सुद्धां नाहीं.

**विलासः**—पुरे! इतकी माहिती बस्स झाली. [आपल्या झारींतल्या पाण्यांत मंत्र पुटपुटून एक फूंड टाकतो व गडबड्याजवळ येतो व त्यास उद्देशून] उत्तिष्ठ! उत्तिष्ठ! ( पाणी त्याच्या अंगावर शिंपडतो )

**एक मनुष्यः**—करा, त्याला पाणी घालून आणखी गार करा! तो जास्तच गारठेल मात्र! उठण्याची तर आशाच नको!

[ सुशीलराव आणि इंदुमती प्रवेश करतात ]

**सुशीलरावः**—[ बाजूला ] सदानंदांच्या पत्राप्रमाणें आपण येथवर आलोंच. चिदानंदांच्या चमत्कृति इकडे लोकांना फारच दिसूं लागल्या आहेत असें सदानंदानें लिहिलें ह्मणून गडबडीनें निघून आलों [ पुढें पाहून ] अरे पण, हे लोक कां इतके येथें जमले आहेत? [ जास्त पुढें होऊन ] आणि हा काय योगायोग पहा! आमच्या चिदानंदाची ही स्वारी इथंच उभी आहे. ( इन्दुमतीस ) चल, इथेंच आपले स्वामी महाराज आलेले दिसत आहेत. लोकांची गर्दी बरीच झाली आहे, तेव्हां कांहीं तरी लोकोत्तर चमत्काराची कृति झाली असावीसें मला वाटतें.

**इन्दुमतीः**—व्हायचें आपण पुढें.

**विलासः**—( जमलेल्या लोकांस ) कायहो, ह्याचं नांव काय?

**पहिला मनुष्यः**—हा परगांवचा गृहस्थ दिसतो; नांव कांहीं कुणाला माहीत नाहीं.

**विलासः**—( गडबड्यास ) बरें, हे मृतपुरुषा! मंत्र सामर्थ्यानें थोडेसे चैतन्य ह्या तुझ्या देहांत येत आहेसें दिसतें आहे; तर स्मृतीवर आला असल्यास बोल एखादा शब्द पाहूं!

**गडबड्या:**—(पाय हलवून हलक्या आवाजांत) कोण मला बोलवीत आहे बरं?

**तरुण मनुष्यः**—हरलो बुवा आपण खास! आहे खरा हा एक मोठा चमत्कार!

**विलासः**—लोकहो, हा आतां कांहीं बोलतांना तुह्मी ऐकलें काय?

**पहिला मनुष्यः**—होय, होय बोलला! तो अगदीं स्पष्ट बोलला! झाला, हा मेलेला माणूस जिवंत झाला, महाराज, केवढा हा चमत्कार!

( सर्व विलासाचे पायावर डोकें ठेवतात )

**तरुण मनुष्यः**—महाराज, माझ्या वचनाप्रमाणें मी ही सलकडी आपल्याला अर्पण करतों. हा माणूस जिवंत झाला खरा!

**विलासः**—आह्मांला सलकडी घेऊन काय करायचें आहे! आपली इच्छाच असली तर आमच्या मठाच्या जीर्णोद्धाराकडे खर्च करा. ( कलाधरास ) कुंडीण, पहा हे काय ह्मणतात तें!

**कलाधरः**—काय! आपण आमच्या मठाच्या कार्याला कांहीं देणार आहांत? बरं, द्या तर.

**तरुण मनुष्यः**—हीं घ्या. ( सलकडी देतो )

( सुशीलराव व इंदुमती पुढें होऊन नमन करतात )

**सुशीलरावः**—मला ओळखलें काय महाराज?

**विलासः**—अरे हो! सुशीलराव, आपण केव्हांसे आलां इकडे?

**सुशीलरावः**—हा नुकताच आलों. इथं यायला आणि ही चमत्कृति नजरेला पडायला गांठ पडली! मी धन्य झालों! महाराज, आतां संचार पुरा करून चलायचं परत विलासपुरला लवकर.

**विलासः**—हा देह काय करणार आहे! तो श्रीहरीच्या शक्तीचा प्रभाव.

इन्दुमती:—महाराज, पण विलासपुरला आपण आतां लवकर यायचं करावं, अशी माझी हात जोडून आपणाला विनंति आहे. आह्मी ह्या प्रपंचाच्या उठाठेवींनीं अगदीं गांजून गेलेलों आहों, हें आपणाला दिसतेंच आहे.

विलास:—आपण उभयतां निर्धास्त असा. श्रीहरी आपणाला सर्व संकटांतून आतां अगदीं लवकर मुक्त करील. काळजी करायचं कांहीं कारण नाहीं. (सुशीलराव व इंदुमती नमन करून जातात) शान्तिरस्तु! नारायण, नारायण! (लोकांस) लोकहो, आतां हा माणूस उठून तर बसला! झालें माझें काय. ह्याला कांहीं वेळानें घरीं पोंचता करा ह्मणजे झालें. नारायण! (जातो, पडदा पडतो)

कलाधर:—(जातांना स्वगत) हा खराच मेलेला माणूस खराच जिवंत झाला! जिवंताला मारायचा आणि मेलेल्याला जिवंत करायचा हा पहिला धडा तर, शिकलों बुवा ह्यांच्या ह्या बावांच्या संस्थेंत! आमचे बावाही आज येथें सहज भेटले! भोळ्या हिंदुस्थाना! आमच्या बावांसारखीं रत्नें तुझ्या उदरांत आजवर सांचवून ठेवलीस, ह्मणूनच परकीय व्यापाऱ्यांचा जवाहिऱ्याचा धंदा ऊर्जित अवस्थेला आला! सुवर्णाची खाण, रत्नांचा खजीना, धान्य समृद्धीचें आगर, असा हा आमचा देश बावांसारख्या भोळसर माणसांनीं भरून गेला ह्मणूनच जादूगारांच्या पोतड्या गरम झाल्या आणि घरधनी भिकेला लागले! बा हिंदुस्थाना!

[पद १७ वें.]

गरजत तव हा महिमा ॥ जन विपुलहि ह्मणुनि येती,
गुल्कती प्रियनामा ॥ ध्रु० ॥ असति सुहृद सारे,
मोहण्या बहु तत्पर ॥ सहज नेति धन भरभर ॥ कैसें
उमजेना ॥ १ ॥

[जातो]

---

## प्रवेश ५ वा.

[ **स्थळः**-सुशीलरावांचा दिवाणखाना; मालिनी सचिंत बसलेली प्रविष्ट ]

**मालिनीः**—[ स्वगत ] आज मला हें घर अगदीं शून्य भासतं आहे! अनेक वेळां ह्या घरांतील सर्व माणसें कारणानिमित्त बाहेर गेली असतील, आणि मी एकटी राहिल्यें असेन, पण मला भीति अशी कधींच वाटली नाहीं. पण, सदानंदाच्या त्या दिवसाच्या कृतीपासून मी कधीं अशी एकटी राहिल्यें कीं, माझ्या पोटांत सारखी कालवाकालव सुरू होते! हें तारुण्य आणि त्यांत हें कौमार्य! देवा, केवढ्यारे ह्या जबरदस्त शृंखळा आमच्या पायांत अडकविल्या आहेस! त्यामुळें,

[ पद १८ वें. ]

चिंताहि वाटे आतां ॥ एकटी गृहीं राहतां ॥ ध्रु० ॥
नीच कपटी अरी, येई कीं जरी ॥ गांजावया दुःखिता ॥१॥
काल वदनीं अहा, पडते कीं पहा ॥ भ्रांती तया पाहतां ॥२॥

[ सदानंद प्रवेश करतो ]

**सदानंदः**—( बाजूला ) आहे! आतां ही अगदीं एकटी आहे! साम, दाम, दंड, ह्या प्रकारांचे प्रयोग करून पाहायला आतां उत्तम संधि आहे. ( पुढें होऊन मालिनीस ) मालिनी, (मालिनी दचकते) नको, अशीदचकूं नको! मी राक्षस नव्हे! किंवा काळ नव्हे! तुझ्या प्रेमाचं सदैव चिंतन करणारा मी एक रसिक पुरुष आहे! दारिद्र्यानं तुला गांजलेली पाहून त्याकरितां अंतःकरणपूर्वक कळवळणारा मी एक प्रेमळ प्राणी आहे!

**मालिनीः**—( स्वगत ) शाबास रे मानभाव्या! मला एकटी गांठून अशा रितीनें मायावी भाषणें करण्याचा प्रसंग साधलास काय? मनांत येतें

तेंच पुढें उभें राहतें असें झालें खरें आतां. देवा, मला ह्या प्रसंगाला पुरें धैर्य दे! (उघड) सदानंद काका—!

**सदानंदः**—(स्वगत) काका! ह्या शब्दानें माझी रचलेली इमारत ढांसळणार, अशी मला भीति वाटूं लागली आहे.

**मालिनीः**—सदानंद काका! (सदानंद तोंड काळवंडतो) माझ्या दारिद्र्याबद्दल मला तर मुळींच वाईट वाटत नाहीं!

**सदानंदः**—मग, तूं काय अगदीं सुखी आहेस?

**मालिनीः**—होय, मी अगदीं सुखी आहे. कोणीही दुसऱ्याकडे ज्या चष्म्यानें पाहत असतो त्या चष्म्याचे रंगच त्याच्या दृष्टीला भुरळ घालीत असतात!

**सदानंदः**—(स्वगत) पहिला सामाचा डाव अंगाशीं आला. आतां दुसरा काढून पाहूंया. (उघड) मालिनी, तूं चुकते आहेस. द्रव्य नाहींसें झालें कीं जगांतल्या सुखांना मनुष्य मुकलाच! माझीच स्थिति पहा! दारिद्र्याच्या गांजणुकींत मला कधीं सुखाचा दिवस दिसला नाहीं, पण आतां मी माझ्या लल्लाटाचें दारिद्र्य हांकून लाविलें. द्रव्य गांठीं असल्यावर तुझ्या सारख्या कुमारिकेला माझ्या सारख्याच्या सहवासांत सुख कां होणार नाहीं?

**मालिनीः**—होय, काका! (सदानंद तोंड काळवंडतो) द्रव्याला भुलणारी आणि ऐश्वर्याला कवटाळणारी अशी एखादी कुमारिका ह्या जगाच्या उघड्या बाजारांत आपणाला मिळायला कांहीं हरकत दिसत नाहीं!

**सदानंदः**—तुला द्रव्य नको? ऐश्वर्य नको? मीही नको? मालिनी, तुझ्या उत्तराची मी अगदीं आशेनें वाट पहात आहे. नको, नको; अशी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन मनांतला पीळ कायम नको ठेवूं! द्रव्याचा ज्याच्या जवळ मुबलक संग्रह आहे, त्याच्यापासून वाटेल तीं सुखें प्राप्त

होतील; ह्मणून, मालिनी, विचार कर आणि माझ्या प्रेमळ मागणीला मान दे.

**मालिनीः**—सदानंद काका! ( सदानंद चिडतो ) द्रव्यापासून सुख प्राप्त होत असेल, पण सुखासुखांत सुद्धां प्रकार आहेत. द्रव्याच्या सहाय्यानं वाटेल तें सुख प्राप्त होतें, असं मात्र नाहीं. सद्गुणी मनुष्याच्या सहवासांत उत्पन्न होणारें सुख दुर्गुणी द्रव्यवानापासून प्राप्त होणं शक्यच नाहीं! एखादा चोर संपत्तीवान असेल, पण चोरीच्या दुर्गुणामुळं त्याची समाजाला येणारी दुर्गंधी केव्हांही लपून राहणार नाहीं! दारूबाजाचें ऐश्वर्य बाजार बसवीला सुखकारक होईल, पण त्याच्या श्वासाबरोबर बाहेर पडणाऱ्या घाणीला भिऊन नीतिमान स्त्रिया दूर होतील! सदानंद, द्रव्यापेक्षां सद्गुणाला मान देणारी ही मालिनी दुर्गुणी पुरुषाला केव्हांही माळ घालणार नाहीं!

[पद १९ वें.]

कधिं ना वरिन व्यसनिं रत सधना ॥ ध्रु० ॥ धन सुख सकल न माना ॥ सुजन असुख हरि सुगुण मुदित करि अधना ॥ १ ॥ वरि दिसत मनोहार मद्यपी ॥ असत सधन जरि वदन छान ॥ परि मल न लपत जन जाणति त्या ॥ प्रकृति करुनि दुरि ललना ॥ २ ॥

**सदानंद**—( स्वगत ) मला दुर्गुणी ठरवून अशा तऱ्हेनें माझी बोळवण करते काय? ( उघड ) मालिनी, सरळपणानं आतां तूं जर वळणार नाहींस तर मला जबरदस्ती करावी लागेल. ( आवेशानें ) कशाच्या जिवावर तुझ्या ह्या उड्या? तुला द्रव्याचा मोह नाहीं ह्मणावं, तर शान्तशीलाला तुझीं चोरटीं पत्रं गेल्याची मला बातमी कळलेली आहे. मालिनी, सरळपणानं माझ्या शब्दाला मान दे; नाहींतर हा पहा! ( सुरा दाखविते )

**मालिनी:**—( संतापानें ) कापा! ही माझी मान कापा!! पण, लक्ष्यांत ठेवा, माझी जिवंत मान तुमच्या हातीं पडेपर्यंत सद्गुणाला मान देणाऱ्या ह्या मालिनीच्या हृदयाचे ठोके आपोआप बंद पडतील!

**सदानंद:**—(त्वेषानें) काय करशील? माझ्या पुढें प्राण देशील? निर्दय कुमारिके! ज्याचा प्राण तुझ्यासाठीं तिळतिळ तुटतो आहे त्याच्या पुढें प्राण देऊन काय मिळवणार!

**मालिनी:**—काय मिळवणार! सजीव देहांतला आत्मा शुद्ध संस्कारांच्या तेजानें स्वर्ग गांठील! ही कमाई थोडी कां होईल? सदानंद, बलात्कारानें ओढल्या जाणाऱ्या प्रेमाच्या तंतूंची खरी गती त्यांच्या नाशांतच असते!

**सदानंद:**—( पुढें सरसावून ) मग मीच नाश करतो त्या प्रेमाचा! जें प्रेम सरळपणानं वळत नाहीं तें भ्रष्ट करण्यांत किंवा त्याचा नाश करण्यांतच मला आनंद वाटतो. ( तिला स्पर्श करावयास जातो )

**मालिनी:**—तुमचा स्पर्श होण्यापूर्वीच हा पहा मी अशी डोकें आपटून प्राण देतें ( तसें करूं लागतें, सदानंद मागें सरतो )

**सदानंद:**—बस्स्! पुरे कर!! मी स्पर्श करून तुला आत्महत्येची संधि देत नाहीं. तुझ्या शरीराचा नाश मला करायचा नाहीं, तर तें जिवंत ठेवून त्याचा उपभोग घेण्याचा डाव मला साधायचा आहे. तुला अजून विपत्तीनें पुरे गांजलें नाहीं, आणि सांप्रतचा दारिद्र्याचा कोरडा तुझ्या मनाचा पीळ नष्ट करण्या इतका कठोर झाला नाहीं! मालिनी, आतां शेवटीं तुला इतकंच सांगतों कीं, मला टाळून तूं दुसऱ्या कोणाही पुरुषाच्या गळ्यांत कदाकाळीं माळ घातलीस तर हा सदानंदाचा राहू तुझ्या सौभाग्याचें खग्रास ग्रहण केल्याशिवाय राहणार नाहीं! [ संतापानें जातो ]

ग्रंथालय
नं. ३९७



**मालिनी** :—कापा ! ही माझी मान कापा !!

Dnyan-Sagar Press, Kolhapur.

[अंक २, प्रवेश ५]

**मालिनी:**—[ निराशेनें स्वगत ] माझ्या सौभाग्याचें खग्रास ग्रहण! देवा, कौमार्यांतून कधीं सुटेन, असं ज्या मला झालं होतं, तिच्या सौभाग्याचा पडदा अशा काळ्याकुट्ट रंगानें आतांच सारवण्याचा क्रम सुरू केलास ना? मालिनी, कौमार्याचे धिंडवडे आणि सौभाग्याचे कोळसे हेच तुझ्या फुटक्या नशिबांत आहेत कां गे!

**( पडदा पडतो )**

अंक दुसरा समाप्त. ]

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थळ:**–रस्ता. वंचक [ गडबड्या प्रविष्ट ]

**गडबड्याः**—[ स्वगत ] कां! आहे कीं नाहीं ह्या दोस्तीच्या धंद्यांत मजा! त्या कुंडिणपुरच्या लोकांची कशी केली गंमत? ह्या विलासपुरला परत येऊन आह्मांला दोन दिवस तर झाले! त्या प्रवाशाच्या गांठोड्यांत एका बायकोला भरगच्च सजविण्याइतके दागिने निघाले! आतां त्यांच्या जोरावर शालिनीला आपण वश केल्याशिवाय राहणार नाहीं! बायकांना भुलविण्याला नुसत्या दागिन्यानें भागत नाहीं; त्यांना अलंकारिक भाषाही आवडत असते ह्मणून थोडेंसें कवित्वहि तयार केलें आहे. पण, आतां ती शालिनी कुठं एकदाशी भेटेल असं मला झालें आहे! [ पुढें पाहून ] आं! कोण ती लगबगीनें चटक चटक पाय उडवीत चालली आहे? अरे हो! तीच! आतां तिला मागून गांठावी कां पुढून? [ पुढें होऊन तिला गांठतो ] शालिनी! माफकर, ह्या विरही जनाला! तुझ्या प्रेमाचं चिंतन करीत होतो, पण त्याचं उद्घाटन करण्याचा प्रसंग मला आजवर आलाच नाहीं. आतां पहा, तें चिंतन, उद्घाटन आणि ह्या पेटीचें दंभस्फोटनें हीं एकदम करून तुला हा प्रेमीजन प्रणाम करतों आहे त्याचा स्वीकार कर.

**शालिनीः**—[ स्वगत ] ह्या हलकट माणसाच्या तावडींतून आतां निसटणं फार कठीण आहे. ( उघड ) कसलं हो प्रेम आणि कसलं उद्घाटन? मला नाहींत ह्या गोष्टी समजत!

**गडबड्या**:—बरं! न समजूं देत त्या गोष्टी. (पेटी उघडून) हें दिसतं तरी कां तुला? (जवळच्या पेटींतला एक जिन्नस काढून) हं! हें काय? हा साज! नवरा मिळतांच बायकांचा गळा हा साजवतो ह्मणून ह्याला साज ह्मणतात ज्याहित्ते! (शालिनी दृष्टी फिरविते) काय? तुला तो आवडत नाहीं! ठीक; पण ही सरी तरी पहा! इंद्राच्या परी सुद्धां हिच्या साठीं तळमळ करितात, पण तुला ही दोरी सारखी सहज गुरुफटून टाकील! अग पहा, पहा तरी एकदां! आतां पहा ही माळ; रानोमाळ हिंडणारा संन्याशी सुद्धां जिच्या गळ्यांत ही दिसेल, तिची लाळ घोटायला कमी करणार नाहीं! शालिनी, मी इतका जीव तोडून तुला प्रत्येक जिन्नस दाखवितों आहें आणि तूं त्याकडे पहात सुद्धां नाहींस? (सांखळ्या दाखवून) बरं, ह्या सांखळ्या एकदां पहां! ह्यांचा तर प्रताप असा आहे कीं, तुझ्या पायाला कमळाच्या पाकळ्या सारख्या शोभतील आणि आमच्या सारख्यांना मोहांत पाडून मोकळ्या होतील!

**शालिनी**:—[स्वगत] ही शब्दरचना कोणाची तरी उसनी घेऊन स्वारी आली आहे. (उघड) अहो, तुह्मी कशाला मला दाखवतां हे जिन्नस?

**गडबड्या**:—तूं ते घालशील आणि खुलशील ह्मणून! शालिनी, ह्या जगांत अलंकाराशिवाय कशाला शोभा आहे सांग. एवढा गजराज! धिप्पाड आणि सुंदर प्राणी! पण राजे लोकांच्या मिरवणुकींत त्याला शेपटीपासून सोंडेपर्यंत रंगवावा लागतो! त्याचे पाठीवरून, त्याचप्रमाणें नंदीबैलांच्या गळ्यांतून मोठाल्या घंटा सोडतात, पण ह्या मनुष्य जातीच्या सुंदर प्राण्याला असला जिन्नस अझून घालण्याची वहिवाट सुरूं केली नाहीं ही आमच्या अलंकारशास्त्राची मोठी उणीव आहे! तूं माझी पत्नी होशील, तर ही उणीव मी प्रत्यक्ष कृतीनें सुधारणा करून काढून टाकीन! नूपुरांचा नाद अगदीं क्षुद्र असतो, पण हा घण–घण–घण–घण–घण घंटानाद कोणाही स्त्रीच्या आगमनाची वार्ता जगभर दुमदुमून सोडील!

**शालिनीः**—अहो! ही टकळी आतां पुरे करा! स्त्रियांची अशी हेटाळणी करतांना कुणालाही थोडी तरी लाज असावी लागते!

**गडबड्याः**—शालिनी, प्रीतीपासून प्रीति उत्पन्न होते, आणि लाजेपासून लाज उत्पन्न होते! मी जर तुला लाजूं लागलों, तर तूंही मला लाजलें पाहिजेस! हा पहा, मी लाजलो तुला पाहून! आतां तूं लाज मला पाहून. (हंसत लाजल्या सारखे करतो)

**शालिनीः**—लाजायला मी काय कुणाची बायको झालें आहें?

**गडबड्याः**—मी तरी काय कुणाचा नवरा झालों आहें?

**शालिनीः**—(रागानें) मला असलं बोलणं खपायचं नाहीं!

**गडबड्याः**—मला असलं वागणं खपायचं नाहीं! शालिनी, आतां विनोद राहूं दे! मी तुला क्षमा करतों, तूं मला माफी कर! सांग एकदां, हे मोलाचे दागिने, हा मोलाचा सुंदर देह, हे माझे मोलाचे सद्‌गुण, इतकीं सारीं पाहून तुला हा हिरा जवळ असावासा वाटतो कीं नाहीं? खरें सांग हं! भीडभाड काहीं नको!

**शालिनीः**—हे मोलाचे दागिने तुमचे स्वतःचे दिसत नाहींत!

**गडबड्याः**—(मध्येंच) आणि ते चोरीचेही पण नाहींत!

**शालिनीः**—हा देह तुमचा नव्हे!

**गडबड्याः**—(आश्चर्यानें) काय? हा देह माझा नव्हे! हा साडेतीन हाताचा देह माझा नव्हे!

**शालिनीः**—हो! हा देह तुमचा नव्हे! दारू, गांजा, भांग, माजूम, अफू वगैरे व्यसनांनीं त्याचा मालकी हक्क कधींच बळकावला आहे!

**गडबड्याः**—(स्वगत) हिला कसें समजलें हें सारें! त्या बडबड्यानेंच सांगितलेलें दिसतें. [उघड] शालिनी, बडबड्या खोटें बोलणारा माणूस आहे!

[बडबड्या येतो]

**बडबड्या**:—आणि आपण राजरोस व्यसनांची तारीफ करणारे आहां! काय चालविलं आहेत रस्त्याळ हें? जाऊंदे तिला आपल्या घरीं.

**गडबड्या**:—अहो राव! हा किल्ला मी फार प्रयासानें सर केला आहे. शालिनी आतां माझी आहे, नाहीं सोडीत मी तिला! चला, होऊं देत दोन हात!

**बडबड्या**:—दोन हात! दोन हात कशाला? अन्यायी माणसाबरोबर हात कारायचे काय कारण? ( गडबड्याचा कान पिळकतो )

**गडबड्या**:—ओय, ओय, ओय, ओय! सोडा बुवा मला! हा पहा पाया पडतों. ( तसें करतो )

**बडबड्या**:—( धिक्कारानें ) चल निघ, मूर्खा!

( गडबड्या जाऊं लागतांना पेटींतली माळ खालीं टाकतो )

**गडबड्या**:—( बाजूला ) इतक्यांत दाखवतों शहाणा कोण आणि मूर्ख कोण तो! ( जातो )

**बडबड्या**:—( शालिनीस ) तूं कशी सांपडलीस ह्या धटिंगणाच्या तावडींत?

**शालिनी**:—मी घराकडे जायला निघालें होतें. नेहमीच्या रस्त्यानें जायला उशीर लागेल ह्मणून बखळींतून देवळाजवळून जाऊं लागलें. इतक्यांत हा मेला आलाच पुढें!

**बडबड्या**:—( सहज खालीं पाहून ) अग, पण हें काय चकाकतें आहे? हा तर सोन्याचा दागिना दिसतो! कुठला ग हा?

**शालिनी**:—( जिन्नस पाहून ) अगबाई! ही त्याच्या त्या पेटींतलीच माळ होय! आतां तो इथं दागिन्यांनीं भरलेली एक पेटी घेऊन आला होता, आणि तिच्यांतला एक एक दागिना मला काढून दाखवीत होता. मी कांहीं त्यांकडे पहात सुद्धां नव्हतें. तरी पण, आपली कांहीं तरी

टकळी त्यानें चालविलीच होती, इतक्यांत आपण आलां. मला वाटतें, त्यानें ते दागिने कोठूनतरी चोरी करून आणले असावे!

**बडबड्या:**—अगदीं बरोबर आहे, तुझा तर्क! हा जिन्नस आतां इथंच पडूं दे. आपण कांहीं त्याला हात सुद्धां लावणार नाहीं. अरे, हराम-खोरा! चोरी करून आणिलेले दागिने दाखवून ह्या गरीब अबलेला फस-वीत होतास!

**शालिनीः**—पण कांहो, मघां मला फार भीति वाटली! तो जेव्हां तुमच्याबरोबर दोन हात करायला पुढें आला, तेव्हां मला वाटलें, त्यानें आपल्याला चांगली इजा केली असती! पण, एका कानाला चिमटा घेऊन आपण त्याला स्वस्थ बसवलात!

**बडबड्या:**—शालिनी, हीं व्यसनी माणसें शक्तीनें अगदीं क्षीण झालेलीं असतात. कांहीं तरी शकला लढवाव्या, कपटकारस्थानें करावीं, लबाड्या कराव्या, ह्यांशिवाय त्यांना अधिक कांहीं साधत नाहीं. मनग-टाच्या जोरावर दोन हात करून आपला पराक्रम दाखवून युद्धांत विरश्री मिळविण्याची ताकद नसल्यामुळें फुसक्या मुत्सद्दिगिरीचे डाव खेळण्यांत त्यांचा हातखंडा असतो; आणि त्यांतच ते स्वतःला धन्य समजत असतात. पण, शालिनी, असल्या लोकांची मुत्सद्दिगिरीच आतां यशस्वी होऊं लागली आहे! तरवारीचा आणि मनगटाच्या जोराचा काळ गेला निघून आतां!

**शालिनीः**—तें कांहो? राज्येंच्या राज्यें आपल्या पूर्वजांनीं पादाक्रांत केलीं, तीं कां मुत्सद्दिगिरीच्या जोरावर?

**बडबड्या:**—अग, त्यांनीं राज्यें घेतलीं असतील तरवारीच्या जोरा-वर, पण तीं चालवतांना मात्र तरवारीच्या जोरापेक्षां मुत्सद्दीगिरीचा जो जोर त्यांना पाहिजे होता, तो त्यांच्यांत नव्हता म्हण, किंवा त्याचा त्यांना

उपयोग करतां आला नाहीं ह्मण! ह्या मुत्सद्दीगिरीच्या डावांत मनुष्य पुष्कळ वेळां फसतो सुद्धां!

[ गडबड्या पूर्वीच्या प्रवाशाला बरोबर घेऊन येतो ]

**गडबड्या**:—[ प्रवाशास बडबड्यास दाखवून ] हा पहा चोर! तुमच्या पेटींत एखादी सोन्याची माळ होती काय? ही पहा, ह्यानें आपणाला पहातांच ती खालीं टाकून दिली. असला मोलाचा जिन्नस ह्या लफंग्याच्या हातांत दिसतांच मला शंका आली, आणि ह्याला मी फरासखान्याकडे चल ह्मणूं लागलों, तो हा मलाच उलट मारूं लागला!

**प्रवासी**:—[ खालील माळ घेऊन ] हो! ही माझीच माळ! सांपडला चोर! चलरे, माझ्या बरोबर आतां तुला दाखवतों कसं काय तें!

**बडबड्या**:—कुभांड! निव्वळ कुभांड, हा माझ्यावर घेतो आहे! अहो सद्गृहस्थ, खरा चोर कोण ह्याचा विचार तरी जरा करा. हा चोर आहे!

**गडबड्या**:—[ बडबड्याकडे बोट करून ] नव्हे! हा चोर! रावसाहेब, आपण व्यवहारिक दृष्टया विचार करून पहा! ज्याच्याजवळ मुद्देमाल, तोच चोर नव्हे काय?

**प्रवासी**:—[ स्वगत ] मोठी पंचाईत आली आहे, खरें! हा त्याला चोर ह्मणतो, तो ह्याला चोर ह्मणतो! आहे काय हा प्रकार? हा चोर, कां तो चोर, कां दोघेही चोर? पण, ह्या मुलीला थोडें आतां विचारून पाहूंया. [ उघड ] मुली, तुला काय ह्यांतलें माहीत आहे काय?

**शालिनी**:—होय, मी सांगतें खरा—

**गडबड्या**:—[ मध्येंच ] अहो सद्गृहस्थ, तुह्मी कितीहो दुधखुळे आहां? अहो, हा चोर ही माळ तिला बहाल करून लग्नाबद्दल मागणी घालीत होता; आणि तिनें ती कबूलही केली होती. अशा परिस्थितींत ती तुह्मांला खरं काय सांगणार कपाळ!

**प्रवासीः**—होय, होय. ही गोष्ट मला अगदीं पटते! हीं दोघेंही बोलत होतीं, खरें मौजे मौजेनें! अरे लबाडानो! चोरीच्या जिनसावर चोरट्या लग्नाचा समारंभ चोरून उरकावा ह्मणत होतां काय? [बडबड्यास] अरे पाजी मनुष्या! चल माझ्याबरोबर फरासखान्याकडे!

**शालिनीः**—[ प्रवाशास ] अहो, नका करूं अशी घाई!

**गडबड्याः**—अहो तिच्या लग्न घाईंत तुमची नको ह्मणते, धरपकडीची घाई! घाईंत घाई, लग्नाची घाई उडवून सोडत आहे, ती! अहो सद्‌गृहस्थ, धरा ह्याला आधीं, नाहींतर हा पळून जाईल! बाकी, तो मला एकट्याला जरी शिरजोर होता, तरी आतां आह्मी दोघे असल्यासवर कसचा पळतो?

**बडबड्याः**—पळतो? कुठें पळतों मी? चला हो सद्‌गृहस्थ, मी मुकाट्यानें येतों तुमच्या बरोबर.

**गडबड्याः**—मुकाट्यानें कसचा! आह्मी तुला कैद्यासारखा धरून नेणार! [ प्रवाशास ] अहो धरा त्याला!

**प्रवासीः**—[ बडबड्याला धरून ] चलरे चल!

[ दोघे बडबड्याला नेतात ]

**शालिनीः**—[ स्वगत ] काय हा भलताच प्रकार झाला बरं? मला मेली ह्या जवळच्या वाटेनें जायाची बुद्धि झाली तरी कशी! आतां मी काय करूं? माझ्या बडबडेरावांना आतां मारतील, आणि त्यांचे हालहाल करतील. [ स्फुंदत उभी राहते, सुशीलराव येतात ]

**सुशीलरावः**—कोण, शालिनी? तूं ह्या वेळीं इथं? आणि अशी दुःखी कां?

**शालिनीः**—काय सांगूं, बाबासाहेब! आपल्या बडबडेरावांना धरून किहो नेलं!

**सुशीलराव**:—अग, कुणी आणि कशाकरतां?

**शालिनी**:—तो वंचक लबाड माणून, आणि दुसरा एक गृहस्थ, ह्या दोघांनीं चोरीचा आळ त्यांच्यावर घालून, आतां असंच, त्यांना फरासखान्याकडे ओढीत नेलं! [रडते]

**सुशीलराव**:—[स्वगत] काय ह्या दुर्दैवाचा फेरा! मालिनीच्या लग्नाकरता लक्ष्मीपालाकडे गेलों, तिथें त्यानें माझ्या विनवणीचा धिक्कार केला, ह्मणून सदानंदाला दुसरा एखादा गरीब वर शोधण्याकरतां सांगावं, ह्मणून निघालों, तों वाटेंत हें दुसरें किटाळ उपस्थित झालें. [उघड शालिनीस] शालिनी, काळजी करूं नको! मी असाच फरासखान्याकडे जाऊन त्याला सोडवून घेऊन येतों. [सुशीलराव जातात]

**शालिनी**:—[स्वगत] माझी आई मेली, पण ह्या बडबडेरावांच्या सहवासांत मला तिची आठवण सुद्धां झाली नाहीं. एक आधार तुटला, आणि दुसरा जोडला, असं मला वाटत होतं! देवा, दया कर, आणि त्यांची लवकर मुक्तता कर! [जाते]

———:o:———

# प्रवेश २ रा.

[**स्थळ**:-फरासखाना; पोलीस कामगार व सुशीलराव प्रविष्ट.]

**पोलीस कामगार**:—आपलं नांव काय?

**सुशीलराव**:—मला सुशीलराव ह्मणतात.

**पो० का०**:—वा:! नांव तर मोठं गंभीर, संभावितपणाचं धारण केलं आहे! बरं, कां येणं केलं होतत?

**सुशीलराव**:—बडबड्या नांवाचा माझा एक आश्रित चोरीच्या नुसत्या आळावरून आपण नुकताच पकडला आहे, असें मला समजलें.

तेव्हां त्याच्याबद्दल दोन गोष्टी सांगून पहाव्या ह्मणून आलों आहे. चोरी सारखा गुन्हा तो कधीं करणार नाहीं असं मी खात्रीनें सांगतों!

**पोलीस कामगारः**—गुन्हा करणार नाहीं? मग, गुन्हा झाला कसा? गुन्हा झाला, तर तो केला नाहीं कसा? गुन्हा केला ह्मणूनच झाला; आणि झाला, ह्मणूनच केला, असेंच समजायचें! अहो, सुशीलराव, चोराकरतां रदबदली करीत आहां, पण रदबदलीकरतां तुह्मांला मात्र चोर व्हावें लागेल, समजलात? तुह्मी ही रदबदली करितां आहां, एवढ्यावरूनच तुमच्या संबंधीं सुद्धां मला शंका येऊं लागली आहे.

**सुशीलरावः**—काय? माझ्या संबंधानें शंका? गृहस्थहो, मला नीट पाहिलंत का, आणि ओळखलंत का?

**पोलीस कामगारः**—तुमची ओळख? तुह्मांला कुठं बरं पाहिलं होतं? [विचार करून] हो, हो, आठवलं. एकदां कुठेसें ब्राह्मण भोजनांत वाढण्याचें काम करीत असतांना तुह्माला पाहिलं होतं खरं!

**सुशीलरावः**—[स्वगत] भवितव्यता बलीयसी! [उघड] तुह्मी मला ओळखत नाहीं?

**पोलीस कामगारः**—ओळख किंवा मैत्री हीं लक्ष्यांत न घेणें हाच आमच्या पोलिशी कायद्याचा पहिला नियम आहे, आणि तो कडक रितीनें अंमलांत आणण्याचें माझें कर्तव्य आहे.

**सुशीलरावः**—तें राहूं दे आतां. बडबड्याला अटक करण्यापूर्वी आपण पुरी चौकशी केली आहे काय? आणि तशी केली असल्यास त्यानेंच हा गुन्हा केला, अशी तुमची खात्री झाली आहे काय?

**पोलीस का०ः**—अहो, खात्री कसची आणि चौकशी कसची! मुद्देमालासुद्धां चोर सांपडल्यावर ह्या दोन्ही गोष्टींचें फारसें कारणच पडत नाहीं.

**सुशीलराव:**—काय, मुद्देमालासुद्धां आपण हा चोर धरला आहे? मग माझी मति खुंटली! तरी पण, आपण शांतपणानें व्यारकाईनें पुन्हा चौकशी करून पहावी, अशी माझी नम्र विनंति आहे.

**पोलीस का०:**—[दरडावून] कां? केलेल्या चौकशीबद्दल शंका येते कीं काय तुह्मांला? सुशीलराव, ही शंका ह्मणजे आह्मांला पर्यायानें दूषण देण्याचा तुमचा उपक्रम दिसतो. कोणाही गुन्हेगाराला अटकेंत ठेवण्यापूर्वीच पूर्ण चौकशी केलेली असते. पोलिसांच्या चौकशीबद्दल अविश्वास दाखवणें, ह्मणजे प्रत्यक्ष परमेश्वराचें अस्तित्व नाकबूल करण्यासारखें होय! सुशीलराव, आमच्या चौकशीबद्दल शंका दाखवून आपला मूर्खपणा मात्र तुह्मी वेशीवर टांगून ठेवला! थोडक्यांत बोलायचं ह्मणजे तुमच्या सारखे मूर्ख तुह्मीच आहां!

**सुशीलराव:**—[स्वगत] आतां ह्याच्याशीं अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं. न्यायाचें काम केलेल्या माणसाला हा आपला पोलिसी न्याय शिकवूं लागला आहे! [उघड] तुह्मी ह्मणतां तें अगदीं बरोबर आहे! अधिकारावर असलेल्या माणसाच्या तोंडांतून निघालेले शब्द, बरोबर नाहींत ह्मणण्याची कोणाची छाती आहे? जो अशी छाती करील, त्याची छाती लवकरच फुटल्या शिवाय राहाणार नाहीं! पण, कामगार साहेब, एक गोष्ट लक्ष्यांत ठेवा कीं, हा अधिकार कायम टिकणार नव्हे. आह्मी जसे सरकारी अधिकाराचीं कवचकुंडलें उतरून पेन्शन घेऊन बसलों आहों, तसें तुह्मांलाही एक दिवस बसावें लागेलच. नका, तोरा करूं नका!

**पोलीस का०:**—सुशीलराव, तुह्मी शुद्धीवर खास नाहीं. अहो, उद्यां आपणाला मृत्यु येणार, ह्मणून आजच मृतासारखी शरीरयष्टि शिथिल करून पडावं ह्मणतां कीं काय? जोंपर्यंत शरीरांत प्राणवायु खेळतो आहे, तोंवर शरीराचीं सर्व कार्यें जोरांत चाललींच पाहिजेत! अधिकारसूत्रें जोंवर

आमच्या हातांत आहेत, तोंवर त्यांचा उपयोग करायचा तितका आम्ही करणारच!

**सुशीलराव:**—करा. पण, तो सरळपणानें करा. गुन्हेगाराला सोडूं-नका, आणि निरपराध्याला फोडूं नका! दुर्जनांवर दया करूं नका, आणि सज्जनावर आग पाखडूं नका! इतकेंच माझें तुम्हांला सांगणें आहे. मनाची समता ठेवून सरकारी अधिकार चालविण्यांतच खरें वैभव आहे. अधिकार काय, दोन दिवसांचा असतो!

**पोलीस का०:**—दोन दिवसांचा? मला अजून पेन्शनींत जायाला दोन वर्षांचा अवकाश आहे! तितक्यांत—

[ एक शिपाई लखोटा घेऊन येतो त्यास ]

काय आहेरे टपाल? [ शिपाई लखोटा देतो तो वाचून स्वगत ] अरे, हें काय? हा म्हातारा खराच पांढऱ्या पायाचा दिसतो! मला नोकरीची दोन वर्षांची वाढ मिळाली असतां पेन्शनीचा हुकूम आजच माझ्या हातांत! [ उघड ] अहो, शुभ शकुनी गृहस्थ, चालते व्हा आधीं येथून नाहींतर, त्या वडवड्याचा सोबती होऊन बसावें लागेल!

**सुशीलराव:**—भल्या माणसा! हे दिवस असेच राहायाचे नाहींत!

[ जातो ]

**पोलीस का०:**—हे दिवस असेच राहायाचे नाहींत! मोठा आला आहे मला सांगायला! कांहीं हरकत नाहीं! उद्यां पेन्शनींत जाईन, पण आज सरकारी अधिकाराचा पुरा अंमल गाजविल्या शिवाय राहणार नाहीं! [मिशां-वर ताव देऊन जातो ]

———:0:———

# प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—रस्ता; विलास, सदानंद, गडबड्या आणि कलाधर प्रवेश करतात]

**सदानंदः**—शिणलेल्या देहाला विश्रांति आणि त्रासलेल्या मनाला आराम, आतां कुठें मिळेल, विलास?

**विलासः**—असें स्थान एकच. आमच्या सुंदराजींचा विलासखाना!

**सदानंदः**—हुषार खरा माझा दोस्त! अरे, पण तिथं करायचं काय?

**गडबड्याः**—सुंदराजींच्या घरांत करायचं काय! गाणं बजावणं ऐकायचं! आनंदी आनंद करायचा! दुसरें काय?

**सदानंदः**—बरोबर बोललास. जन्माचं रडगाणं गात बसण्यापेक्षां कलावंतीचं सुंदर गाणं कुणाला प्रिय वाटणार नाहीं? प्रेमाचे विसंगत तालसूर ऐकत बसण्यापेक्षां संगीताचे संगतवार तालसूर ऐकतांना कोणाला मौज वाटणार नाहीं? झिडकारलेल्या विरही जनाला कुरवाळणारें वेगळें प्रेम आतां क्षणभर पाहिजे आहे. विलास, चल तर त्या विलासखान्याकडे.

**गडबड्याः**—(स्वगत] मालिनीवरचा हल्ला उलटा अंगाशीं आलेला दिसतो, ह्मणून स्वारी आज नेहमींप्रमाणें रंगेल दिसत नाहीं! [उघड] सदानंद, चलाच तिकडे. [सदानंदाच्या चेहऱ्याकडे पाहून] काय झालें हो दोस्त? असा हा चेहरा कां काळवंडला? नका, नका असे काळवंडूं! अहो, मी रडतों तुमच्याकरतां, पण तुह्मी नका रडूं! [रडतो]

**सदानंदः**—अरे, रडतोस कां उगीच?

**गडबड्याः**—[अधीकच रडून] आपल्या दोस्तीच्या तहनाम्याची मला आठवण झाली हो! तुह्मांला मालिनी माळ घालीना, मला शालिनी हार जाईना! [रडतो]

**सदानंदः**—किती दुघखुळा रे तूं? रडतोस काय बायकासारखा? चल त्या सुंदराजीकडे. घटकाभर करमणूक करून मग बोलूं ह्या गोष्टी.

**गडबड्या**—[हर्षानें] काय, तुह्मी करमणूक करणार? चला तर माझी ही त्याला तयारी आहे. [निघतांना स्वगत] दोस्तीच्या अटी बरोबर अमलांत आणल्याच पाहिजेत! [सर्व जातात]

—— :o: ——

## प्रवेश ४ था.

[**स्थळ**-सुंदराजीचा विलासखाना; सुंदराजी बसली आहे, जवळ मुलींचा नाच सुरू आहे आणि उस्मानखां, शास्त्रीबुवा, सोनार, शिंपी, पहिलवान वगैरे बसले आहेत अशांत पडदा उघडतो. सदानंद, विलास, कलाधर व गडबड्या प्रवेश करतात]

**सुंदराजीः**—[मुलींचा नाच संपल्यावर कलाधर व विलास यांना नमन करून] महाराज, हे दुसरे स्वामी कुठले?

**विलासः**—सुंदराजी, आह्मांला शिष्यांचा आणि अनुयायांचा कधींच तुटवडा पडत नाहीं. हें बाळ मी कुंडिनपुराहून आणलें.

**गडबड्याः**—[मध्येंच] सुंदराजी, आह्मा सर्वांना प्रवासाचा फार त्रास झाला आहे, आणि प्रेमाच्या लढाईत पहिले तलवारीचे वार लागून आमच्या मनोवृत्ति घायाळ झाल्या आहेत! खरोखर आह्मी दवाखान्याकडे जायाचे! पण, आमच्या स्वामी महाराजांनीं तुमच्या ह्या विलासखान्याची जवळची वाट आह्मांला दाखविली! ह्मणून आह्मी फार धन्य झालों! तर आतां उशीर न लावतां तुह्मी स्वतः एक गाण्याची चीज

छद्रून आह्मांला अगोदर भूल द्या! आमच्या मनाच्या जखमा छाटाछाट करून सरळ करा! आणि दारूच्या रसात पट्या भिजवून त्या त्यांवर बांधून टाका! आटपा, उशीर नको!

**सुंदराजी:**—एवढंच ना? त्यांत काय आहे? करतें मीं सारी तयारी. [ आपल्या सुंद नांवाच्या नोकरास बोलावते ], सुंद, अरे सुंद! [ सुंद येतो त्यास बाटल्या आणण्याबद्दल खुणावते, पण सुंद आळस देत उभा राहतो ]

**सदानंद:**—[ बाजूला ] हा सुंद हिला चांगला नोकर मिळालेला दिसतो! बेटयाचें नांव ऐकूनच सारे सुंद व्हायचे!

**उस्मानखां:**—सुंद, अरे लाव पेला जलदी. [ सुंद जांभई देतो ]

**विलास:**—[ सुंदराजीस ] सुंदराजी, आतां हे खां साहेब भांडत बिंडत नाहींत ना?

**उस्मानखां:**—अरे तंटेका क्या कारन है? उसको हम दाम दिया औरबी देते है! [ पुढील ताटांत रुपये टाकतो ]

**विलास:**—[ शास्त्रीबुवास ] काय शास्त्री बुवा, तुमचं कसं काय चाललं आहे?

**शास्त्रीबुवा:**—संसारत्रस्त ज्याहैत्ति होतांच हा पवित्र आश्रम स्वीकारण केला! चिरःशान्ती प्राप्ती झाली! संसाराचे चटके बसतांच मदिरेचे घुटके ज्याहैत्ते घेऊं लागलो! आनंदोस्ति! शान्तिरास्ति! सुकर कार्यम्! बहुत धन्यम्!

**विलास:**—पण, ह्यांच्या पोटाकडे पाहतां कीं नाहीं?

**शास्त्रीबुवा:**—बहुत धन दिधलें, आणखी आतां देतों. ( रुपये पुढील ताटांत टाकतो व सुंदास ) अरे सुंद, आण ज्याहैत्ति बाटली आणि पेले! [ सुंद पुन्हा जांभई देतो ]

**सोनार:**—आह्मी आपले आज हा एक दागिना सुंदरला देतों. [ दागिना ताटांत टाकतो ]

**शिंपी:**—आह्मी हें पोलकें अर्पण करतों. ( पोलकें देतो. )

**पहिलवान:**—आह्मी काय द्यायचं? ( गळयांत बांधलेली घंटा पुढें ठेवून ) हा घंटा देतों आह्मी! ( सर्व हंसताल )

**गडबडया:**—( बाजूला ) ह्यानें केली सुधारणा माझ्या मनासारखी. घण, घण, घण, घण, घंटाच देऊन टाकली! ( उघड ) हं, सुंदराजी आतां होऊं दे सुरवात. ( सुंदास ) अरे, सुंद, तूं उभा तो उभा! आण बाटल्या लवकर. ( सुंद जांभई देऊन तसाच उभा राहतो. ) ह्या सुंदराजीनं असला हा सुंद नोकर कशाला ठेवला? मी ह्या वेळीं दहा कोस पळत जाऊन बाटल्या आणल्या असत्या! पण, हा सुंद उभा तो उभाच! ( पुन्हा सुंदास ) अरे, सुंद, आणतोस बाटली, कां उचलूं तुलाच? ( त्याला उचलूं लागतो व तो कोलमडून पडतो ) अरे, हा अगदींच सुंद झाला!

**सदानंद:**—( गडबड्यास बाजूला ) अरे, नको त्याच्यावर बळजबरी करूं. ह्या वारांगना मुद्दाम असल्या चेष्टा करीत असतात. नोकरांनीं कोणाला कांहीं देऊं नये अशा यांच्या अगोदरच ताकिदी असतात.

**विलास:**—( सुंदराजीस ) बरें सुंदराजी, गाणें तर चालूं दे.

**सुंदराजी:**—हो, करते सुरवात. ( तंबोऱ्याच्या खुंटया पिळकीत वेळ घालवते )

**सदानंद:**—( बाजूला ) आतां आपल्याला नाहीं धीर निघत! हिच्या तंबोऱ्याच्या खुंटया पिरकळतांना माझ्या हृदयाच्या तारा तुटण्याची वेळ आली! नशिबाचा तंबोरा लागला, तर बरोबर लागतो. नाहींतर एकदां कां तो बेसूर होऊं लागला तर त्याच्या खुंटया कितीही पिरकळल्या तरी तो सुरांत केव्हांही वाजायचा नाहीं! तंबोरा लागला तरच गाण्याला मौज! ( सुंदराजीच्या तंबोऱ्याची तार तुटते ) पहा, हिच्या तंबोऱ्याची तार फार पिळल्यामुळें तुटली!

**सुंदराजी**:--(सुंदास) अरे सुंद, जा तार घेऊन ये.

**सदानंद**:---(उठून) सुंदराजी, नको आतां तो व्याप. आह्मी आतां जातों. आणखी केव्हां तरी येऊं.

**गडबड्या**---ह्या सुंदानें आमच्या मनाचा सारा विरस केला! (सुंदावर दांत ओंठ खाऊन) कायरे सुंद, मोडूं कां तुझें पेकट? (सुंदराजीस) अहो, सुंदराजी ह्याला एक चार दिवस माझ्या स्वाधीन करा; ह्मणजे झाडून ह्याचा सुंदपणा काढून टाकतों!

**सुंदराजी**:---जातोस कांरे सुंद, त्यांच्याबरोबर?

**सुंद**:---(जांभई देत) इंही! न्हीई! (नाहीं असा अभिर्भाव करतो)

**सुंदराजी**:---अहो, तो नाहीं जायचा दुसरीकडे. माझ्या नशिबाला तो अगदीं खिळून राहिला आहे!

**सोनार**:---(गडबडीनें उठून) मी आटवूं कां ह्याची चांदी?

**शिंपी**:---(उठून) मी कापूं कां ह्याचा गळा?

**पहिलवान**:---(उठून) मी भरूं कां ह्याला स्वारी?

**सुंद**:--अयोयो यो! अयोयो यो! (कोलमंडल्या सारखें करतो)

**सदानंद**:---(स्वगत) हा विनोद आणि ही विनोदी चीज, नको मला आतां क्षणभर सुद्धां डोळ्यासमोर! (गडबड्यास) गडबड्या, चला आतां.

[ विलास, कलाधर, गडबड्या, व सदानंद जातात. पडदा पडतो ]

... सं ... ग्रंथालय शाळा.
क्र. ... नों दि ...
दि. ...

# प्रवेश ९ वा.

[ **स्थळ**:–लक्ष्मीपालाची ओसरी. पद्मिनी आणि शान्तशील प्रविष्ट ]

**पद्मिनी**:—[ शान्तशीलास ] दादा, बाबांनीं काल धनदात्यांच्याकडून कांहीं द्रव्य घेऊन त्यांना काय वचन दिलं, तें तुला कळलं काय?

**शान्तशील**:—वचन? कसलं वचन पद्मिनी?

**पद्मिनी**:—अरे, दुसरं कसलं वचन! त्यांची मुलगी तुला करून घ्यायची!

**शान्तशील**:—पद्मिनी, इच्छेविरुद्ध घडवून आणलेल्या लग्नाचे सुखसोहाळे काय असतात, ह्याची बाबांना काय कल्पना! बाबा करूं देत काय वाटेल तें. माझ्या मनाला ती गोष्ट मुळींच रुचत नाहीं.

**पद्मिनी**:—दादा, ह्या पिशाच्याच्या वेडांत तरी बाबा असले भलते सलते प्रकार करीत नसतील ना? ती धनदात्यांची मुलगी ह्मणजे साऱ्या गांवाला माहीत आहे, कसल्या चालीची आहे ती! तिला करून घ्यायची ह्मणजे तुझ्या साऱ्या आयुष्याचा खेळ खंडोबाच होय!

**शान्तशील**:—पद्मिनी, लग्न ह्मणजे निर्जीव रंगांचें मिश्रण नव्हे, किंवा लांकडाच्या बाहुल्यांच्या खेळांतली गंमत नव्हे! धनदात्यांच्या द्रव्याला भुलून असली अवदसा लक्ष्मी ह्मणून घरांत आणायची, आणि गृहलक्ष्मीचे धिंडवडे काढायचे, ह्यापेक्षां संन्यास घेतलेला काय वाईट? पद्मिनी, सुस्वरूप आणि कुरूप हीं एखादे वेळीं आनंदानें नांदतील; मनोहर मदन आणि काळी कुब्जा सुखानें संसार थाटतील; पण, नीति आणि अनीति ह्यांची दुकल कधींही टिकायची नाहीं! ललाटाच्या ब्रह्मसूत्राच्या गांठीं आपल्या हातानें तोडणें अशक्य आहे, पण योग्यायोग्य विचारानें वागणें मनुष्याचें कर्तव्य आहे.

**पद्मिनी:**—दादा, मला आतां दुसरं कांहीं वाटत नाहीं बघ! बाबांची ती पिशाच्च बाधा आधीं दूर केली पाहिजे. विश्वेश्वराच्या देवळांत कोणी एक बालसन्यासी आले आहेत, आणि ते भुताखेतांची बाधा तावडतोब नाहींशी करतात, असं मला कळलं आहे. दादा, जाऊं कांरे मी त्यांच्याकडे? आणि विचारूं कां बाबांच्या बाधेबद्दल?

**शान्तशील:**—पद्मिनी, तुला काय वाटेल तें कर. माझ्या आयुष्याची जितकी तुला काळजी आहे, तितकीच मला तुझ्या आयुष्याची आहे. माझा संसार जितका सुंदर व्हावा असं तुला वाटतं, तितकाच तुझ्या आयुष्याचा गाडा सरळ असावा असं मला वाटतं. अधोगतीला जात चाललेल्या माझ्या मनाला तूं धैर्य देते आहेस, ह्याबद्दल मला धन्यता वाटते! पद्मिनी, माझ्या भावी आयुष्यांत मला आतां सुखाचा एक लेशही दिसत नाहीं! [ खिन्न होतो ]

**पद्मिनी:**—अरे, तूं पुरुषासारखा पुरुष असून दैवापुढें असे हात टेंकून निराश कसला होतोस? भगवद्गीता काय सांगते? गीतारहस्यानें कोणतें रहस्य बाहेर काढलें आहे? दादा! दादा! विचार कर. संकटाला न भितां आपणाला जें करणें युक्त असेल, तेंच तूं कर.

**शान्तशील:**—[ उल्हासानें ] गीतारहस्य! देवाची दिव्य वाणी! कोणाला स्फूर्ति देणार नाहीं? पद्मिनी, ह्या तुझ्या आठवणीमुळें मी शुद्धीवर आलों! कर्म न करितां दैवावर हवाला ठेवून स्वतःच्या इच्छेविरुद्ध एका द्रव्यवानाची पोरटी गळ्यांत पडत असता मी भित्र्या भागूबाई सारखें वागावें? मुलानें पित्याच्या आज्ञेप्रमाणें वागावें हें मुलाचें कर्तव्य होय, पण बुद्धिभ्रंश होऊन जाणून बुजून वेडगळ मार्गाचें अवलंबन करणाऱ्या पित्याची आज्ञा कितपत मानावी, हा मुद्दा प्रश्नच आहे. पद्मिनी, प्रेमाचा अहेर प्रेमानें करणाऱ्या प्रेमळ मालिनीचें पाणिग्रहण करण्याचें कर्म मला आतां करायचें आहे!

**पद्मिनीः**—दादा, आतां मी जातें त्या बालसंन्याशाकडे आणि विचारतें त्यांना कांहीं तरी उपाय!

**शान्तशीलः**—बरें, जा तूं ताई. [ पद्मिनी जाते ] ठीक आहे, बाबा मला कळूं न देतां परभारें धनदात्यांचें द्रव्य घेऊन माझें लग्न ठरवलेंत काय? लक्ष्यांत ठेवा, लग्न लावून देणारे जरी तुह्मी गुमास्ते असला तरी करणारा मी आहे. जिच्या अनीतीचा डंका गांवभर माजून राहिला आहे, तिच्याशीं माझें लग्न लावून माझ्या साऱ्या आयुष्याचा लंकाजाळ तुह्मांला पहायाचा आहे काय? बाबा, ही माझ्या नशिबाची परीक्षा नसून मालिनी-वरच्या माझ्या निष्कलंक प्रेमाचा हा कस आहे! कांहीं झालें तरी:—

[ पद २० वें ]

नाहिं नाहिं अशी कांता वरित ॥ ध्रु० ॥ विनयहीन ती
करिल घात ॥ प्रिया सुशिल मम मनासी हरित ॥
सुखवि तीच सखि मज नितांत ॥ १ ॥

—:0:—

# प्रवेश ६ वा.

[ **स्थळः**-मठ; कलाधर संन्याशाच्या वेषांत बसलेला आहे अशांत पडदा उघडतो ]

**कलाधरः**—[ स्वगत ] सोंगाड्यांचें सोंग बाहेर आणण्याकरितां मीही सोंगाड्या बनलों! पण, माझें सोंग रंगण्यापूर्वी ह्या कपट पटूंचें सोंग काळें पडलें पाहिजे. मठाच्या जरूरीच्या कार्यासाठीं श्रींची स्वारी लगबगीनें चित्रदुर्गाला गेली, अशी ह्या सदानंदानें गप्प उठवून त्या चिदानंदाचा विलासराव कालच बनविला! त्यांत हेतू काय, तें अजून कळत नाहीं. पण,

काल ते कांहीं कुजबुज करीत होते, त्यावरून असें दिसतें कीं, ह्या विलासरावाला आमच्या बाबांकडे नेऊन भेटवायचा आणि हे एका लक्षाधीशाचे चिरंजिव आहेत, ह्मणून बतावणी करायची! मधून मधून लग्न, संसार वगैरे शब्द त्यांच्या भाषणांतून ऐकूं येत होते; ह्यावरून आणि विलासाच्या आतांच्या भपकेदार पोषाखावरून हें लग्न ठरवण्याकरितांच ते गेले असावेत ह्यांत शंका नाहीं. ठीक आहे! ठरवूं देत! ह्या लग्नाला विघ्न कसं उत्पन्न करायचं, तें पाहतों मी! [ पुढें पाहून ] अरे, पण हें काय? हो तर पद्मिनी इकडे येत आहे! अहाहाः—

[ पद २१ वें. ]

हो मम प्रियसखी पद्मिनी ॥ मनिं निवसत नित येत
रमणी ॥ ध्रु० ॥ चंद्रचकोरी, भृंग मृणालिनी ॥
खुलत मिळे जैसी बघुनि ॥ तशि होहि गमे मज
ऱ्हदय मोहिनी ॥ १ ॥

हें बावापण माल आतां नीट सांभाळलें पाहिजे, नाहींतर फजिती व्हायची! [ सरळ व ध्यानस्थ बसतो; पद्मिनी येऊन नमस्कार करते ] नारायण, नारायण!

**पद्मिनीः**—यतिराज, रिक्त हस्तानं वंदन केलं ह्याबद्दल क्षमा असावी.

**कलाधरः**—रिक्त हस्तानं वंदन करणाऱ्या माणसांतच खरा भक्तिभाव असतो. बालिके, आह्मी ह्या भौतिक जगाकडे निरिच्छपणानेंच पाहत असतों!

**पद्मिनीः**—[ स्वगत ] ह्यांनाच ह्मणावें खरे योगी! [ उघड ] महाराज, आह्मी ह्या नश्वर जगाच्या नानाप्रकारच्या दुःखांनीं गांजून गेलेलीं आहोंत. ऐहिक विषयांच्या उपभोगांसाठीं आमचे जीव तडफडत असतात, त्यामुळें

आपल्याप्रमाणंच इतरांच्या मनोवृत्ति असतील असं आम्हांला वाटणं साहजीकच आहे.

**कलाधर:**—विषयी जनांना इतकें तरी आत्मज्ञान होतें आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय! बरें, शरीरव्यथा, कां मानसीक पीडा, कां पिशाच्चबाधा–ह्यापैकीं कोणत्या कारणाकरितां ह्या देशाकडे येणें केलें?

**पद्मिनी:**—[ स्वगत ] काय अगोदर विचारावें बरें? बाबांबद्दल किंवा स्वत:बद्दल? कलाधर क्षेम आहेत कां विचारावं, कां बाबांची पिशाच्च-बाधा कशी दूर होईल ह्मणून विचारावं? पण, आपलं घोडं नको इतक्यांत पुढं ढकलायला! बाबांबद्दलच आधीं विचारावं. [ उघड ] आमच्या बाबांना अलीकडे कुठल्या कीं पिशाच्चाची बाधा झाली आहे!

**कलाधर:**—[ स्वगत ] हां! सदानंदाची बातमी अगदीं खरी आहे. ( उघड ) काय ह्मटलंत?

**पद्मिनी:**—आमच्या बाबांना पिशाच्च बाधा झाली आहे. तेव्हां ती कशी दूर होईल, ह्याबद्दल चरणांपाशीं याचना आहे. ह्या बाधेमुळें ते कांहीं तरी भलभलतेच प्रकार करूं लागले आहेत.

**कलाधर:**—काय करतात? असे भलभलते काय प्रकार करतात ते?

**पद्मिनी:**—अमूकच करतात ह्मणून सांगावं तरी कसं? घटकेंत शुद्धींत बोलतात, घटकेंत बरळूं लागतात; घटकेंत निजतात, घटकेंत जागतात; घटकेंत हंसतात, घटकेंत रडतात!

**कलाधर:**—ह्या बाबतींत त्यांच्या हातून दानधर्म, गरिबांस भोजन, देवतापूजन वगैरे गोष्टी झाल्या पाहिजेत.

**पद्मिनी:**—ते एखादे वेळीं स्वत: उपवास करतील, पण दुसऱ्यांना कांहीं भोजन घालणार नाहींत! यतिराज, बिन खर्चाचा कांहीं इलाज असला तर सांगाना!

संग्रहालय



कलाधर :— हां ! गडबड नका करूं अशा !

Dnyan-Sagar Press, Kolhapur.

[ अंक ३, प्रवेश ६ ]

**कलाधरः**—बरं, मी आतां सांगतों त्या गोष्टी पटतात कां पहा. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी अशीं अपत्यें आहेत. त्यांचें कुटुंब वारून आठ वर्षें झालीं. ते सावकारीचा धंदा करतात. ते फार कंजूष आहेत.

**पद्मिनी**—( घाईनें ) बरोबर! बरोबर!! बरोबर!!!

**कलाधरः**—हां! गडबड नका करूं अशी!!

**पद्मिनीः**—[ उत्सुकतेनें ] यतिराज, आपण तंतोतंत खऱ्या गोष्टी सांगितल्या, ह्मणून मला एकदां बोलून राहवेना.

**कलाधरः**—त्यांचा मुलगा अजून अविवाहित आहे, व मुलगीही तशीच असावी. कां! आपला विवाह झाला नाहीं ना अजून?

**पद्मिनीः**—( लाजून ) ज्यांना अन्तर्ज्ञानानें सर्व समजतें, त्यांना सांगायचें तें काय? ( स्वगत ) कसा कां होईना, ह्यांनीं माझ्या लग्नाबद्दल थोडा उल्लेख केला खरा. आतां आपलें घोडें दकलावें पुढें! ( उघड ) बरं पण, आपण प्रत्येकाचें हृद्गत जाणतां आहांच; माझ्या मनाला एक हुरहुर आहे ती कशी जाईल बरें?

**कलाधरः**—( स्वगत ) हिची हुरहुर कोणती आहे ती मला समजायला कठीण नाहीं. ( उघड ) पद्मिनी!—( चपापतो )

**पद्मिनीः**—( स्वगत ) अगबाई! ह्यांनीं माझं नांव सुद्धां चटदिशीं सांगितलं! योगाभ्यासानें पहा कशा सर्व गोष्टी कळतात त्या! ( उघड ) महाशय, आपण माझें नांव सुद्धां सांगितलेंत! खरोखर आपण परमेश्वरच आहांत. काय दैविक चमत्कार हा!

**कलाधरः**—( स्वगत ) महाशयाची घोडचूक दैविक चमत्काराच्या सदरांत गेली! ठीक झालं; नाहींतर ही अगदीं खरी फजितीची वेळ होती! ( उघड ) बालिके, ह्या गोष्टी योगानें साध्य होतात, आणि त्या साध्य करण्याला अगोदर चित्तशुद्धि व्हावी लागते!

**पद्मिनी**:—खरं आहे महाराज. आतां ज्याअर्थी आपण सर्व गोष्टी जाणतांच आहां, त्याअर्थी माझी काळजी कोणती ती लक्ष्यांत आणून, ती केव्हां आणि कशी दूर होईल तें कृपा करून सांगा.

**कलाधर**:—तुझं प्रेमस्थान, किंवा जिवाचा जिवलग फारसा दूर नाहीं. तो लवकरच भेटेल. तो अगदीं सुरक्षित आहे!

**पद्मिनी**:—(स्वगत) ह्यांच्या आश्वासनानें माझी काळजी तरी दूर झाली. (उघड) कलाधर—कुठें कां—

**कलाधर**:—ओ! (जीभ चावतो) काय ह्मणतां?

**पद्मिनी**:—कलाधर कुठें कां असेनात, सुखरूप असोत ह्मणजे झालें.

**कलाधर**:—हे कलाधरच कां आपलं प्रेमस्थान? छान, छान! अगदीं सुरेख प्रेमस्थान आहे खरं! पण, मला वाटतं, हा पौर्णिमेचा आणि अमावास्येचा एकत्र योग जमणं जरा कठीण दिसतें आहे. कलाधर असावा द्रव्यहीन, गरीबमाणूस; आणि आपण आहां श्रीमंतांच्या छबेल्या! कसा जमावा हा योग?

**पद्मिनी**:—कोणाची श्रीमंती महाराज? माझे बाबा असतील श्रीमंत, पण मी कांहीं श्रीमंत नाहीं. बाबांच्या श्रीमंतीशीं मला काय करायचं आहे?

**कलाधर**:—पद्मिनी, श्रीमंतांच्या घरांत उपजलेला श्रीमंती पिंड गरीब घराण्यांत जन्मलेल्या कलाधराची घडोघडी धिंड काढायला कमी करणार नाहीं! मलातर वाटतं, तुझी जरी तशी इच्छा असली, तरी कलाधरानें ह्या विवाहसंबंधापासून अलिप्त राहावें.

**पद्मिनी**:—(डोळ्यांत पाणी आणून) नका महाराज असं बोलूं! बापाच्या उसन्या श्रीमंतीनं चढून जाऊन फुकाचा गर्व मानणारी मी नाहीं. कलाधरांचें कलाज्ञान आणि सगुद्ण हीं मला सोन्याच्या दागिन्यांच्या

राशींहून अधिक प्रिय वाटतात. कलाधरांना सोडून बाबा जर मला दुसरी कडे देऊं पाहतील तर मी सत्यानास करून प्राण देईन!

**कलाधरः**—नकोरे बाबा मला असलं बोलणं ऐकायला! कुमारिके, तुझा कलाधर तुला लवकर प्राप्त होवो! तुमचा उभयतांचा ब्रह्मसूत्रांचा योगायोगच असला, तर मी कशाला नसती पंचाईत करूं? तुमचा संसाराचा वृक्ष जोरानें वाढावा आणि तो चांगला फलद्रूप व्हावा, अशीच माझी इच्छा आहे.

**पद्मिनीः**—इच्छा कां महाराज? द्या तसा मला आशिर्वाद.

**कलाधरः**—(स्वगत) अरे हो, पूर्वाश्रमाची इच्छा कशाला ह्या माझ्या संन्यासाच्या स्थितींत आडवी पडती आहे? (उघड) सुभागिनी, ही माझी इच्छा जरी आहे, तरी त्याप्रमाणें तुला आशिर्वाद देण्याचें माझें कर्तव्य झालें आहे. हा घे माझा आशिर्वादः—

[पद २२ वें]

अनुरूप या स्वकुला, सुशीला ॥ सुगुण वर तो लाभो
तुला ॥ ध्रु० ॥ सदनीं सदा सुख व्हावया ॥ प्रेम वृष्टी ती
वितरो रमाया ॥ १ ॥

**पद्मिनीः**—तसा नाहीं आशिर्वाद मी घेणार!

**कलाधर**—बरें, कलाधर वर प्राप्तिरस्तु! बालिके, ह्यावेळीं जर तुझा कलाधर हा आशिर्वाद ऐकायला हजर असता, तर त्यानें माझ्या पुढें बहुत द्रव्य ठेवून प्रसाद घेतला असता! पण, तूं आपली फुकटात आशिर्वाद घेऊन मोकळी झालीस!

**पद्मिनीः**—माझ्या मनासारखं होऊंदे, मग मी महाशयांना द्रव्य सागरांत बुडवून सोडीन!

**कलाधर:**—एकदां संसारसागरांत मग्न झालीस ह्मणजे कुठला महाशय आणि कुठलें काय! (स्वगत) हिची आतां इथून लवकर रवानगी केली पाहिजे, नाहींतर आमच्या बावापणाचें भांडें ह्या बोलण्याच्या रंगांत सहज फुटून जायाचें! (उघड) बरं, आपण आपल्या विवाहचिंतनांत वडिलांची पिशाचबाधा अगदींच विसरून गेला! तेव्हां, हा घ्या अंगारा, आणि लावा त्यांच्या कपाळाला; (अंगारा देतो) ह्मणजे त्याची पिशाच बाधा जाईल, आणि आपणही लावलात तर आपलीही विवाह चिंता दूर होईल. (पद्मिनी अंगारा घेऊन कपाळाला लावते)

**पद्मिनी:**—(वंदन करून) मग मी येतें तर आतां.

**कलाधर:**—यावं! नारायण, नारायण. (पद्मिनी जाते; स्वगत) कां, आहे कां नाहीं मौज? हिनें माझें स्वरूप ओळखलें नाहीं, स्वर जाणला नाहीं, आणि हिच्याबरोबर बोलतांना माझ्या चेहऱ्याची साशंक झालेली स्थितिही हिला दिसून आली नाहीं. मी तिला पद्मिनी ह्मणून हाक मारली आणि तिनें कलाधर ह्मणतांच मी ओ सुद्धां दिली! पण, कुणाची दाद कुणाला नाहीं! ती ज्या भावनेनें इकडे आली होती ती भावनाच इतकी भाबडी, निःशंक, आणि शुद्ध होती कीं, तिला कपटकारस्थानाचा वास सुद्धां येणें दुर्धर झालें! दुनिया झुकती है, तें ह्यालाच ह्मणतात.

[ पडदा पडतो ]

———:0———

# प्रवेश ७ वा.

[ **स्थळ**:-रस्ता; पकडलेला गडबड्या आणि बदललेला पोलीस कामगार प्रवेश करतात ]

**पोलीस कामगार:**—हरामखोरा, स्वतः चोरी करून त्या गरीब माण-

साला गोत्यांत आणावें ह्मणतोस काय? (पेटी दाखवून) सांग, हे दागिने कोठून आणलेस?

**गडबड्या:**—[स्वगत] आपण खरें बोलायचें. [उघड] हे एका गृहस्थानें विश्वासानें ह्मणून मला संभाळायला दिले आहेत. [स्वगत] हो, हें खरंच आहे. त्या प्रवाशाचा नव्हता कां माझ्यावर विश्वास?

**पोलीस कामगार:**—मोठं विश्वासाचं कुळच कीं नाहीं? मला नाहीं ही गोष्ट पटत!

**गडबड्या:**—अहो, मग मी कां ही चोरी केली ह्मणतां? चोरी ह्मणतात तरी कशाला? कोणालाही न कळत, लपून छपून, एखाद्याचा जिन्नस लांबविणें ह्मणजे चोरी होय. पोलीससाहेब, मी लपलों नाहीं, छपलों नाहीं, पळालों नाहीं, कांहीं केलं नाहीं. अगदीं सभ्य माणसाप्रमाणें विश्वासाचे हें एक काम केलें आहे. ही चोरी मुळींच नव्हे!

**पोलीस कामगार:**—विश्वासाचें, कां विश्वासघाताचें काम, तें तुला आतां सांगतों चल.

**गडबड्या:**—आपणाला ही गोष्ट पटत नाहीं, तर नाइलाज आहे माझा. पण, पुराव्याला ह्मणून मी एक कागद गुदरणार आहे, तो तरी पाहतां काय?

**पोलीस कामगार:**—कसला कागद?

**गडबड्या:**—अहो, माझी जन्मपत्रिका! तिच्यांत ज्या कांहीं गोष्टी माझ्या आयुष्यांत व्हावयाच्या, त्या बरोबर झाल्या आहेत. आमच्या बारशाचा योग, तोच आमच्या मातोश्रींच्या मृत्यूचा योग! पुढें तीन महिन्यांत बापाची नोकरी जाणें! वयाच्या दहाव्या वर्षी वडील भावाला कैद! पुढचें पाल्हाळ विशेष सांगत नाहीं. पण, मला ह्या वर्षी अगडबंब डबोलें आणि फटाकडी बायको मिळण्याचे योग आहेत हो! आणूं कां ती अस्सल पत्रिका? अहो, तीच माझा महत्वाचा पुराव्याचा कागद आहे!

**पोलीस कामगार:**—हाच काय तुझा पुरावा?

**गडबड्या:**—अहो, हा लेखी पुरावा झाला. आतां, ज्या नक्षत्रावर मी जन्मलों, तेंच माझा साक्षीदार असल्यानें माझा खटला स्वर्गांत चालावा, अशी माझी अर्जी आहे!

**पोलीस कामगार:**—[ हासून ] एखादा खून जर केला असतास, तर तुला तुझ्या पुराव्यासह विनशर्त स्वर्गांत पाठवला असता!

**गडबड्या:**—मला जर, ह्या आरोपांतून कोणी मुक्त करील, तर सच्च्या कर्ममार्गानें स्वर्गांचें सुख पाहण्यासाठीं मी खून सुद्धां करीन! पोलीससाहेब, मी करारी आणि निधड्या छातीचा माणूस आहे. स्वर्ग प्राप्तीसाठींच जगांतल्या साऱ्या माणसांची धडपड असते! आतां, निर-निराळ्या लोकांचे निरनिराळे मार्ग! माझा आपला हा निराळाच एक धोपट मार्ग समजाना!

**पोलीस कामगार:**—[ स्वगत ] वेड्याला कैदेंत जायची पाळी आली, तरी भीति कसली ती वाटत नाहीं! [ उघड ] राजेश्री! एकंदरींत आपण चांगले बनलेले दिसतां आहां! प्रथम ह्या मृत्युलोकाची शिक्षा भोगा, आणि जा मग, स्वर्गाच्या मौजा पहायला! चला आतां, नको वटवट उगीच!

**गडबड्या:**—कैदेंत जाईन, तरी निधड्या छातीनें जाईन! कामगार साहेब, मला माझ्या एका दोस्ताकडून दोस्तीचा तहनामा पुरा करून घ्यायचा आहे, तेव्हां मला थोडीशी सवड द्याल, तर फार बरें होईल!

**पोलीस कामगार:**—[ दराडावून ] सवड वगैरे कांहीं नाहीं! चल, आतां आधीं माझ्या बरोबर.

**गडबड्या:**—[ जातांना स्वगत ] संपल्या आमच्या साऱ्या गडबडी आतां! आतां सदानंद माझ्याकरितां रडतो, कां कैदेंत जातो, हें पहायाचें आहे? विचारा कैदेंत पडला, तर गांठी पडतीलच! पण, त्याचा आतां वियोग तरी झाला खरा. वियोगाच्या वेळचं रडण्याचं माझं कर्तव्य दोस्तीच्या

कराराप्रमाणं, मला थोडं तरी वजावलं पाहिजे! [ एकदम हंबरडा फोडून ] दोस्ता, सदानंदा! केव्हांरे आतां भेटशील मला?

**पोलीस कामगारः**—अरे, चूप! रडतोस काय! [त्याला घेऊन जातो]

—————:0:—————

## प्रवेश ८ वा.

[ **स्थळ**:-सुशीलरावांचा दिवाणखाना; सुशीलराव, विलास, सदानंद, इन्दुमती वगैरे बसलेलीं आहेत ]

**सुशीलरावः**—[विलासाकडे बोट करून] ह्यांचं शिक्षण कुठवर झालं आहे?

**सदानंदः**—शिक्षण आपलं बेताचंच आहे. वडिलार्जित सराफीचा धंदा असल्यानें शिक्षणाकडे कोणी विशेष लक्ष्य पुरविलंच नाहीं. वडील लहानपणींच वारल्यानें आपल्या मातुलगृहांत ह्यांना आपलें लहानपण घालवावें लागलें. मामांनीं व्यापार वगैरे व्यवस्थित करून ह्यांच्या संपत्तींत बरीच भर घातली. पण, हे जरा वयांत येऊं लागतात, तोंवर मामाही स्वर्गवासी झाले. तेव्हांपासून आपला व्यापार हे स्वतःच पाहूं लागले, झालं.

**सुशीलरावः**—ठीक आहे. तरीपण, शिक्षण थोडं झालं असेलच. ही आपली पहा, आमच्या बायकांची नवी हौस! इंग्रजी शिकलेला ह्मणे नवरा पाहिजे! बाकी, माझे स्वतःचे कांहीं तसे विचार मुळींच नाहींत. शरीरसंपत्ति, आणि थोडीशी निर्वाहापुरती जिंदगी असली, कीं मला कांहीं अधिक नको!

**सदानंदः**—अहो, ह्यांना इंग्रजी येत नाहीं, असं समजतां कीं काय? हे तीन वेळां प्रवेश परिक्षेच्या मंडपांत प्रवेश करून आले आहेत! शाळेंतून गॅदरिंगांच्या वेळीं तयार केलेल्या इंग्रजी नाटकांचे प्रवेश तर ह्यांना मुखोद्गत आहेत! साधे इंग्रजी कोणीही बोलेल, पण हे जसें इंग्रजी बोलतात, तसें साहेबाला सुद्धां बोलतां येणार नाहीं!

**विलास**:—[ स्वगत ] किती खोटें बोलूं लागला आहे हा! बाकी, ह्याचेंही ह्मणणें खरेंच आहे! साहेब जसें बोलतो, तसें मला बोलतां येणार नाहीं! आणि मी जसें बोलतों, तसें साहेबाला बोलतां येणार नाहीं!

**सुशीलराव**:—बरें, राहूं दे शिक्षणाचें आतां. व्यापाराशिवाय जमीन जुमला वगैरे स्थावर इस्टेट किती आहे?

**सदानंद**:—स्थावर इस्टेट? आहे थोडी! एका स्वामीचा जुना मठ चालूवहिवाटीच्या हक्कानें ह्यांना मिळालेला आहे, आणि कोंकणांत माझ्या जमिनीलगत ह्यांचे वडिलार्जित तीन काळे डाग आहेत. मठ जरी वादांत पडलेला आहे—,

**सुशीलराव**:—काय, पडलेला आहे?

**सदानंद**:—अहो, पडलेला नाहीं, शाबूद आहे; पण, वादांत आहे!

**सुशीलराव**:—हां, हां! तंट्यांत आहे ह्मणायचा!

**सदानंद**:—मठ जरी वादांत आहे, तरी हे काळे डाग कुणीं कांहीं केलें, तरी जायाचे नाहींत! आणि त्याबद्दल वादही उपस्थित व्हावयाचा नाहीं!

**विलास**:—[ स्वगत ] हा वाटेल तसा बरळूं लागला आहे! एक काठी आणि फाटकी लंगोटी ह्या शिवाय माझी स्थावर इस्टेट कांहीं नसतां, मारतो आहे थापा, झालं!

**सुशीलराव**:—एकंदरींत ह्यांचा व्यापार चांगला आहे ह्मणतां?

**सदानंद**:—चांगला कां, उत्तम आहे! व्यापार असा तसा नाहीं! सट्ट्याचा व्यापार, बरं कां सुशीलराव! क्षणांत लक्षावधि मिळायचे!

**विलास**:—[स्वगत] लक्षावधि! ह्यानें आतां खोटें बोलण्याची कमाल केली!

**सुशीलराव**:—मग, मला आतां अधिक कांहीं विचारायाचें नाहीं. पण, कांहो सदानंद, वरपक्षानें वधूपक्षाला प्रश्न विचारायचा व्यवहार जरा मी सोडूनच आतां वागलों; नाहीं!

**विलास**:—[ स्वगत ] वरपक्षच तितका खंबरि आहे!

**सदानंद**:—कांहीं नाहीं, सुशीलराव, तसं कांहीं नाहीं. मी ह्मणतों, झालं, तें अगदीं बरोबर झालं. लग्नाच्या कामांत सर्व स्पष्ट कारभार झालेला

बरा. नाहींतर, तुह्मी ह्मणावें, तुमच्या सांगण्यावर मुलगी दिली; आणि असें झालें—न्—तसें झालें! मला उजेडांतला उघडा कारभार आवडतो. आपणाला वाटल्यास, ह्यांना सुद्धां काय वाटेल ते प्रश्न विचारा; आणि आपली खात्री करून घ्या.

**विलास:**—[ स्वगत ] आतां आली खरी फजितीची वेळ! ह्यातारा माझी इंग्रजीची परीक्षा घेऊं लागला, तर उत्तर काय देऊं, कपाळ!

**सुशीलराव:**—त्याचं मला आतां मुळींच कारण नाहीं. मी काय त्यांना प्रश्न विचारणार!

**विलास:**—[ स्वगत ] देव पावला!

**सदानंद**—बरं, सुशीलराव, ह्यांना आतां इथं फार दिवस रहायला सवड नाहीं, शिवाय मुली पाहण्याकरितां दुसरीकडचीं पत्रेंही आलीं आहेत. तेव्हां ह्या गोष्टीचा निर्णय लवकर लागूं दे, असं यांचं ह्मणणं आहे.

**सुशीलराव:**—अहोपण, आमची मुलगी तरी पाहूं दे ह्यांना. [ इन्दुमतीस ] जा, मालिनीला बाहेर घेऊन ये. [ इन्दुमती जाते; सदानंदास ] सदानंद, तुह्मांला आमच्याकरितां फार तकलीफ पडली.

**सदानंद:**—कशाची, कशाची! हें स्नेह्याचें कर्तव्यच आहे!

**विलास:**—[ स्वगत ] वधू पहायला मिळणार, ह्मणून कोणाला आनंद होतो, पण माझ्या पोटांत तर अगदीं धडकी भरली आहे? [ मालिनी येते ]

**मालिनी:**—[ बाजूला ] माझ्याकरितां हा वर आणून भेदाचा डाव साधायची ह्या नीचाची ही कृति दिसते!

**सुशीलराव:**—वधू प्रौढ आहे, वर समवयस्क आहेत, मग आतां [ विलासाकडे बोट दाखवून ] हेच विचारूं देत तिला कांहीं प्रश्न.

**सदानंद:**—[ विलासास ] कांहो, तुह्माला कांहीं विचारायचें आहे कां तिला? हो, खात्री करून घ्या आपली! नाहींतर, मला ह्मणाल माझ्या पदरांत मुकीच मुलगी बांधली!

**विलास**:—[ म्याल्या सारखें करून सदानंदाला तुह्मीच विचारा ह्मणून खुणावतो ] हं! आपणच विचारा.

**सदानंद**:—पाहिलेंत, सुशीलराव, किती भिडस्त आहेत हे गृहस्थ. अहो, मलाच तिला कांहीं विचारा, असें हे ह्मणत आहेत. पण, सुशीलराव, राहूंदे आतां ही सारीच भानगड. कांहीं विचारायाला नको. आणि सवरायला नको. मला सर्व माहीत आहे. फक्त, यांच्या नजरेखालून हिला एकदां घालायची होती, तें काम झालें.

**इंदुमती**:—[ स्वगत ] सदानंदांनीं कसें थोडक्यांत सारें आटपलें! धन्य आहे बाई त्यांची! हें लग्न आतां बहुतेक जमल्यासारखें झालेंच! स्थळ तर उत्तम दिसतें आहे? [ आंत जाते ]

**सुशीलराव**:—मग आतां आणखी काय व्हावयाचें राहिलें आहे?

**सदानंद**:—हो, सारें झालेंच. [ विलासास ] जरा बाजूला याहो तुह्मी. [ विलास व सदानंद बाजूला जाऊन येतात ]

**सुशीलराव**:—[ सदानंदास ] आमची स्थिति आहेच माहीत तुह्मांला.

**विलास**:—[ स्वगत ] आमची स्थिति नाहींच माहीत तुह्मांला!

**सदानंद**:—तें सारं जाणूनच मी ह्यांच्याशीं बोललों. मुलगी पसंत पडल्यावर एका कपर्दिकेची सुद्धां आपण मागणी करणार नाहीं, ह्या अटीवरच त्यांना मी आणलें होतें. शिवाय, आजपर्यंत ह्यांच्या लग्नाचा योग आला नाहीं, त्याचें कारण यांना कोणतीही मुलगी पसंत पडेना!

**विलास**:—[ स्वगत ] आणि प्रत्येक पसंत मुलीला मुलगा पसंत पडेना! ठीक!

**इन्दुमती**:—[ बाजूला येऊन ] आतां काय होतें, देव जाणे! [ जाते ]

**सुशीलराव**:—होय. ज्यांना सर्व गोष्टींची अनुकूलता आहे, ते एका मुलीवरच सारी भिस्त ठेवणार.

**सदानंद**:—बरें सुशीलराव, ह्यांना मुलगी पसंत आहे; पण ह्यांची अट.

अशी आहे कीं, ज्या दिवशीं विवाह त्याच दिवशीं रात्रीं नव्या वधूसह येथून आपल्या गांवीं जाणार.

**सुशीलराव:**—त्या गोष्टीला माझी मुळींच हरकत नाहीं. विवाह होतांच ती त्यांची झाली!

**सदानंद:**—मग हें लग्न ठरलें तर?

**सुशीलराव:**—जरा थांबा. आंतला विचार काय आहे तो पहातों. [ मालिनीसह आंत जातो ]

**सदानंद:**—[ विलासास ] आतां काय विलास, आपण चतुर्भुज खास होणार!

**विलास:**—राहूं दे ही थट्टा! अरे, मला सारखी भीति वाटूं लागली आहे! खोटेंनाटें बोलून चतुर्भुज व्हावयाचें ह्मणजे चोरी करून चतुर्भुज होण्यासारखेंच आहे! चोरीचें निर्जिव गाठोडें गुपचुप ठेवतां येतें, पण ही लग्नाची जिवंत घोरपड गळ्यांत वागतांना नेहमींच गळ्यावर सुरीचा प्रसंग! सदानंद, माझें मन आतां मला फार खाऊं लागलें आहे! राहूं दे रे हें लग्न! जाऊंया आपण इथून!

**सदानंद:**—तुला काय त्याचें? मी आहे जबाबदार प्रत्येक गोष्टीबद्दल!

**विलास:**—पहा हं! मी नुसता बोहल्यावर उभा राहीन!

**सदानंद:**—ठीक, तूं आपला एक दुय्यम दर्जाचा कलपट्टु माणूस आहेस. माझ्याशिवाय तुला कोणताही कार्यांत चैतन्य उत्पन्न व्हायचेंच नाहीं. अरे, नुसता बोहल्यावर तरी उभा रहा! लग्नकार्य आणि भावी संसार कार्य हीं दोन्हीं पहातों माझा मी. [ सुशीलराव आंतून येतो ]

**सुशीलराव:**—तिला ही गोष्ट मान्य आहे.

**सदानंद:**—मग, हें कार्य ठरलें तर?

**सुशीलराव:**—होय, ठरलें.

**सदानंद:**—मग आतां आह्मी पुढच्या तयारीला लागतों. [ विलासास ] चला विलासराव.

**विलास:**—[ उठून ] चला.

**सुशीलराव**:—सदानंद, आपले फार उपकार झाले आह्मांवर.

**सदानंद**:—तें कांहीं बोलायचें नाहीं आतां. हें कार्य निर्विघ्न पार पडूं द्या. मग आपण बोलूं. [ सदानंद व विलास जातात ]

**सुशीलराव**:—[ स्वगत ] आतां एका कटकटींतून सुटलों ह्मणायचा. ह्या विवाह प्रसंगाला कलावरही येथें नाहीं, आणि माझा वडबड्या आहे सरकारी अटकेंत; त्यानें मनाला उत्साह वाटत नाहीं. असो, श्रीहरीची इच्छा! [ आंत जातो व मालिनी प्रवेश करते ]

**मालिनी**:—[ स्वगत ] वैऱ्यानें वैर साधलें! तळमळणाऱ्या जिवाची तडफड झाली! आतां मनाची समता रहावी कशी? जळफळणाऱ्या जिवाची आहुति निराशेच्या डोहांत टाकून शरीर शांत करावें, कां शरीराला पेट देऊन त्याची तेथल्या तेथें राख करावी? "कर्पुर अग्निसी भेटो आला, अग्निच होउनी ठायीं मुराला" हें कडवें काय बरें सुचवितें? शान्ती! आतां शान्ती कसची! संपलें माझें आतां सारें कर्म! आपली कर्मकटकट सारायला बाबांनीं माझ्या जिवाची मोट बांधून विहिरींत लोटण्यासाठीं तयार केली! बाबा! बाबा!! काय हो, हें केलंत!

[ पद २३ वें ]

मम धर्म पाहि ताता ॥ परिपाळिला सदा ॥
तव कन्यका ह्मणोनी ॥ भोगोनि आपदा ॥ ध्रु० ॥
हृदयातले उमाळे ॥ सहसा न दाविले ॥
नयनींच सांचवीलें ॥ जळ तें अनेकदा ॥ १ ॥
छळ फार सोसुनीया ॥ कुलनाम राखिलें ॥
बलि देह आज द्यावा ॥ अनलासि तापदा ॥ २ ॥

**( पडदा पडतो )**

**[ अंक तिसरा समाप्त. ]**

# अंक चौथा

## प्रवेश पहिला.

[ **स्थळः**-विश्वेश्वराचे देऊळ; कलाधर, सदानंद, विलास प्रविष्ट ]

**सदानंदः**—[ कलाधरास ] अहो वटुसंन्यासी, आतां आपण आपली वृत्ति आणि हा बावाचा धंदा स्वतःच्या अकलेवर चालवा. धंद्याचे सारे डावपेंच तुह्मांला कळलेच आहेत. चांगलें डबोलें जमलें, ह्मणजे द्या टाकून ही भगवीं फडकीं! आणि मग फडका, नवरदेव होऊन! हा आमचा विलास पहा. आज बायको करून घेऊन एका रंगाचा पालट करून दुसऱ्या रंगांत कसा रंगलाल होऊन जाणार आहे! काय, विलास, असंच ना?

**विलासः**—रंग रंगतो, कां त्याचा बेरंग होतो, ही काळजी कांहीं केल्या मला सोडीत नाहीं! सदानंद, कठीण आहे हें काम बरं!

**सदानंदः**—गांठीं द्रव्य मुबलक असल्यावर कोणत्याही रंगाचा बेरंग हा व्हायचाच नाहीं. जर कां आजचा लक्ष्मीपालाचा सट्टा साधला, तर विलास, काय सांगूं! दोन भव्य बंगले उठवून देईन, बंगले! पाहतो आहेस काय माझ्या तोंडाकडे?

**विलासः**—पण, कायरे सदानंद, तूं स्वतः कां रे एखादी बायको काढीत नाहींस? दोन हातांचे चार हात करतांना चारांचे आठ करणें तुला अवघड आहे काय?

**कलाधरः**—पहा सदानंद, विलास ह्मणतात तें कांहीं तुह्मांला अशक्य नाहीं!

**सदानंदः**—अशक्य नाहीं हें खरें, पण—

**विलास**:—पण नाहीं, आणि कांहीं नाहीं! त्या धनदात्यांची मुलगी सुस्वरूप आहे आणि बापाजवळ डबोलेंही चांगलें आहे! तेव्हां पहा; घाल तिला उघडपणें मागणी.

**सदानंद**:—[ स्वगत ] मागणी घालायची आणि ती कशाला? पण, मला निर्भेळ संसाराच्या यातायाती नकोच आहेत! [ उघड ] विलास, मी संसारसुखाचा अनुभव एकदां घेतलेला आहे. अरे, विवाह करून प्रपंच थाटायचा, हीं आतां तुमचीं मूल मंडळींचीं कामें! मला कशाला घालतां त्या पेंचांत?

**विलास**:—सदानंद, दुसऱ्याला पेंचांत घालून आपण मोकळें रहायाचें हा तुझा पेंच खरोखरच विलक्षण होय! बस्स्! तुझाही आतां विवाह झालाच पाहिजे!

**सदानंद**:—बरें, मग पाहूं त्याचा विचार. [ कलाधरास ] अरे, कुंडिण, आज रात्रीं संभाळून रहा. कुठें बाहेर जाऊं नको. आह्मांला कांहीं महत्वाची कामगिरी आहे, ती उरकून उद्यां याचा विवाह करून टाकायचा आहे.

**कलाधर**:—मी कुठेंही जात नाहीं! सर्व सांभाळून ठेवतों! आपण अगदीं निर्धास्त असा.

**सदानंद**:—चल, विलास. तुला मघां सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून जाऊंया तिकडे. [ विलासासह जातो ]

**कलाधर**:—[ स्वगत ] आतां मात्र आपणही आपल्या तयारींत राहिलं पाहिजे. हे कोठें जाणार तें मला माहीत आहे. ह्यांच्या कपट नाटकाचा आतां स्फोट लवकर केला, तर ठीक; नाहींतर भयंकर परिणाम होतील! वेष पालटून मी यांच्या सहवासांत राहिलों, ह्मणूनच धोक्याची सूचना मला सहज मिळाली. ठीक आहे, सदानंद! आतां मात्र तुझीं शंभर पुरीं भरलीं! [ जातो ]

———:0:———

# प्रवेश २ रा.

[ **स्थळः**–सुशीलरावांचें घर; सुशीलराव प्रवेश करतात ]

**सुशीलरावः**—[ स्वगत ] मालिनीच्या लग्नाकारितां निराळी ठेवलेली रकमेची पेटी त्रिखंड शोधलें तरी सांपडेना! काय दुर्दैव हें! उद्यां मुलीचें लग्न, पण आज माझ्या हातांत एक कवडी सुद्धां नाहीं! कोणीं बरें हीं चोरी केली असावी? आतां मात्र माझ्या विपत्तीचा कळस झाला! दयाघना परमेश्वरा, तुजकडे मनोभावानें धांव घेणाऱ्या मनुष्याच्या भक्तीच्या क्षेत्रांत असेच कां रे विघ्नांचे कंटक पेरून ठेवतोस! हा कंटकमय संसार कोणाला सुखाचा वाटत असेल, तो वाटो; पण मला तर तो पराकाष्टेनें गांजीतच आहे. [ शालिनी येते ]

**शालिनीः**—[ गडबडीनें ] बाबासाहेब, आपले बडबडेराव सुटून आले!

**सुशीलरावः**—काय म्हणतेस? कुठें आहे तो? [ बडबड्या येतो ]

**बडबड्याः**—[ सुशीलरावाचे पाय धरून ] हा आतांच आलों, बाबासाहेब! मी कच्च्या अटकेंत फारच हाल सोसले! पक्का तुरुंग पतकरला, पण ही कच्ची शिक्षा नको, असें मला होऊन गेलें! पूर्वीचा पोलीस कामगार बदलून नवा आल्यानें माझी खरी हकीगत त्यानें चटदिशी लक्ष्यांत घेतली आणि ताबडतोब गडबड्याच्या घराचा झाडा घेतला. सर्व चोरीचें जिन्नस त्याचे घरीं सांपडतांच त्यानें त्याला ताबडतोब पकडून आणलें. अर्थात् माझी सुटका लागलीच झाली.

**सुशीलरावः**—'सत्यमेव जयते.' बडबड्या, सत्य तें सत्यच. सत्याला कोंडून ठेवा, पाताळांत गाडा, किंवा सागरांत लोटा, सत्य तें सत्यच बरें! अरे, मला खात्री होती कीं, तूं सत्यनिष्ठ मनुष्य केव्हांही तुरुंगांत जाणार नाहींस. अरे, मला तुला पाहून आनंद होतो आहे, पण आज मला दुसरीच एक विवंचना लागून राहिली आहे!

**बडबड्या**:—काय तो? बाबासाहेब, मला सांगा.

**सुशीलराव**:—अरे आपल्या मालिनीचं लग्न उद्यां व्हायचें ठरलें आहे, पण तिच्या नांवाची तिजकरितां ठेवलेली पैशाची पेटी जागच्या जागीं नाहींसी झाली!

**बडबड्या**:—काय? पेटीच नाहींशी झाली? बाबासाहेब, आपणाला मी कित्येक वेळां त्या सदानंदाच्या वर्तनाबद्दल बोललों, पण आपण तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. मालिनीताई सुद्धां आंतल्या आंत चरफडत असत. पण आपल्या त्याच्यावरल्या भलत्या विश्वासामुळें आम्ही कोणीही कांहीं करूं शकलों नाहीं. माझातर पक्का संशय त्याच्यावर आहे! त्याला तुम्ही कधीं पेटी दाखविली होती कां?

**सुशीलराव**:—अरे छे! तो माणूस तसा मुळींच नाहीं! बाकी, मी त्याला ती पेटी दाखविली खरी.

**बडबड्या**:—बाबासाहेब, आपणाला अनुभवाशीवाय कांहीं खरें कळणार नाहीं. बरें आहे! मी काढतों चोर हुडकून! मला आतां जाऊं द्या त्याच कामाला.

**सुशीलराव**:—बरं बुवा; जातोस तर जा. पोलीसांना वर्दी दे आणि कर तुला काय करायचें असेल तें. [ बडबड्या जातो ] [ शालिनीस ] शालिनी, तूं मालिनीला ही हकीगत सांगूं नको. फार तर लक्ष्मीपालाच्या घरीं जाऊन तुझी मैत्रीण पद्मिनी हिला ही गोष्ट सांग; ह्मणजे ती कदाचित् आपल्या बापाला दोन गोष्टी सांगून थोडी कर्जाऊ रकम तरी देवविण्याची व्यवस्था करील. मीही लक्ष्मीपालाकडे जातो, आणि त्याच्या हातापाया पडून पाहतों, देतो कां थोडी रक्कम ती.

**शालिनी**:—बरं आहे, बाबासाहेब. मी जाते पद्मिनीताईकडे. ती फार दयाळू आहे. करील कांहीं तरी आमच्यासाठीं खटपट. [ जाते ]

**सुशीलराव:**—[ स्वगत ] कांहीं झालं तरी हें ठरलेलं लग्न राहतां कामा नये! [ जातो ]

—————o:—————

## प्रवेश ३ रा.

[ **स्थळ:**-रस्ता; शान्तशील प्रवेश करतो ]

**शान्तशील:**—( स्वगत ) आमची ताई तर फारच देवभोळी! त्या विश्वेश्वराच्या देवळांतल्या संन्याशानें ह्मणे तिला अगदीं भूत, भविष्य, बरोबर सांगितलें! वेडी कुठली! परवांच बडबड्यानें त्या चिदानंदाचीं गुप्त कृत्यें सांगितलीं, त्यावरून ह्या साधुलोकांवर विश्वास कितपत ठेवावा हें एक गूढच होऊन गेलें आहे. आतां ह्या नवीन आलेल्या संन्याशाकडेही सदानंदाचें जाणें येणें सुरू झालें आहे, ह्यावरून इथेंही कांहीं दगलबाजीचा प्रकार असावा, अशी मलातर बुवा शंकाच येऊं लागली आहे. स्त्रियांची जात भोळी खरी; आणि आमची ताई तरी ह्या गोष्टीला अपवाद कशी होईल? मला ह्या लोकांकडे ढुंकून सुद्धां पहावेसें वाटत नाहीं; पण ताईनें त्या साधूची कालपासून फारच प्रशंसा चालविली आहे, तेव्हां आहे तरी काय हा प्रकार? आतां ही रात्रीची वेळ बरी आहे, तेव्हां आपण विश्वेश्वराच्या देवळाकडून सहज जाऊन यावं, ह्मणजे ताईच्या सांगण्याप्रमाणें ह्या तरुण सन्याशाचं खरं तत्व काय आहे, तें कळून येईल! जावंच आपण आतां तिकडे. [ जातो ]

—————:o:—————

# प्रवेश ४ था.

[ **स्थळ:**–शहराबाहेरील बाग; मालिनी हातांत पेटविलेली दिवटी घेऊन प्रवेश करते ]

**मालिनी:**—( स्वगत ) निश्चय आणि कृति ह्यांत फार वेळ घालवणें चांगलें नसतें. ( दिवटीकडे पाहून ) ही दीपिका मला किती रम्य वाटते आहे! माझा स्वर्गाचा रस्ता प्रकाशित करून ह्या कष्टमय देहाची कष्टी वाट सुलभ करण्याचें काम हिनें आज आपल्याकडे घेतलें आहे! हिच माझी भरल्या घटकेची प्रेमळ सखी आणि आणि जिवाची सोबतीण! आत्महत्त्या पातक मानिलें जातें; पण मला तर वाटतें, देहाची आणि आत्म्याची पवित्रता राखण्याकरितां करावें लागणारें हें एक शुद्ध कर्मच होय! झालें! देहानें भोगलें, आत्म्यानें पाहिलें, आणि केलें मर्म योग्य केलें! मातापितारांची आज्ञा मोडली नाहीं, कुलाचें नांव बुडाविलें नाहीं, कौमार्याचा भंग करूं दिला नाहीं; मग राहिलं काय ह्या जगांत व्हायचें? कांहीं नाहीं:—

[ पद २४ वें. ]

नाहीं राहिली जागें या आस मला ॥ ध्रु० ॥
हे देवा ॥ सदया देवा ॥ सदयाधि देवा ॥ १ ॥
तव पायीं पडुं दे ॥ तनु ही देवा ॥ २ ॥

जगण्यासारखें जीवित सोन्याच्या मोलाचें होऊन गेलें, आणि मरायचें शरीर रक्षेंत मिसळलें? असेंच ना लोक ह्मणतील? बाबा निर्दोषी आहेत, माता प्रेमळ भोळी आहे, मग संसाराची माती केली कोणी? कुटिल मित्र, लोभी मध्यस्थ, कुलांगार दिवटे, ह्यांच्या कृतींना एक कुमारिका बळी पडली! हाच शिलालेख कुणी तरी खरडावा आणि असेंच माझें वैभवी

स्मारक व्हावें? आतां उशीर कां? देवा! मला शेवटीं एकदां शान्तशीलांची आठवण करूं दे! शान्तशील, देहरूपांत राहूं दे, पण आत्मिकस्वरूपानें तरी मला एकदां भेटा. नको पण, ह्या नश्वर जगाचा मोहच नको! अग्निनारायणा, धांव! (*अंगाला दिवटी लावून घेऊं लागते इतक्यांत शान्तशील येऊन ती फेंकून देतो*)

**शान्तशील**:—कुमारिके, हें काय करते आहेस?

**मालिनी**:—(त्याकडे न पाहतां) अगबाई! एका निमिषमात्राचा ह्या नश्वर जगाचा मोह अखेर माझ्या नाशाला कारण झाला! (मूर्च्छित होते)

**शान्तशील**:—(तिला सांवरून) अरे, ही तर माझी मालिनी!

(पडदा पडतो)

——:o:——

# प्रवेश ५ वा.

[**स्थळ**--रस्ता; दोन पोलीस शिपाई प्रविष्ट]

**पहिला पोलीस**:—काय बुवा, आमची ही नोकरी ह्मणजे जगाच्या रहाटगाडग्याची सारी उलटी कृति! ह्या वेळेला जग खुशाल झोंप घेतें आहे, पण आह्मांला मात्र दिव्यांतलें जळतें तेल डोळ्यांत घालून चोरांना निरखून काढायची नसती खटाटोप! कंटाळा आला बुवा!

**दुसरा पोलीस**:—कंटाळा येउन काय करतां! नोकरी केल्या शिवाय पोटाला कुठें मिळतें आहे? चोरांच्या पोटावर पाय दिले नाहींत, तर आमचे पाय कसे चालणार? आणि पोट कसें ठिकाणावर रहाणार? पण, कांहो, तुह्मी ते परवाचे चंद्रगडचे चोर धरून आणले, त्याबद्दल तुह्मांला काय बक्षीस मिळालें?

**पहिला पोलीसः**—बक्षीस! काय राव बक्षीस घेऊन बसलात! आमच्या फौजदार साहेबांच्या चार लाथा! आणि काय दुसरं बक्षीस!

**दुसरा पोलीसः**—चोर धरल्याबद्दल बक्षीस चार लाथा!

**पहिला पोलीसः**—होय बाबा! आम्ही झक मारली, चोराऐवजी चार साव जर चोर म्हणून धरलें, तर लाथा कां मिळूं नयेत!

**दुसरा पोलीसः**—असें कसें चुकलें हो तुमचें काम?

**पहिला पोलीसः**—अहो राव, चुकलें कसचें म्हणतां, आम्ही तें मुद्दाम चुकविलं! काय करतां? मुद्देमाल सांपडला, पण चोर सांपडेनात म्हणून साहेबांनीं आम्हांला बदाड, बदाड बदाडलं! मग, धरले चार धटिंगण आणि केले साहेबापुढें उभे! नोकरीच बघा ही फार खराब!

(बडबड्या येतो)

**बडबड्याः**—(घाईनें) अहो पोलीस! चोरी, चोरी, चोरी!

**पहिला पोलीसः**—(दुसऱ्यास) धरा, धरा हा चोर आधीं!

**बडबड्याः**—अहो, चोरी झाली आहे; चला म्हणतो ना?

**पहिला पोलीसः**—अरे पण, चोराशिवाय चोरी कसची? आणि तूं कोण ह्या अपरात्रीं असा भटकतो आहेस? मला वाटतं, ही तुझी चोराचीच उलटी बोंब दिसते!

**बडबड्याः**—(स्वगत) काय पहा, माझं नशीब शिकंदर आहे! सदां मलाच आपले सारे चोर ठरवूं लागले आहेत! (उघड) अहो शिपाई बुवा, चोरीची वर्दी देणाऱ्या माणसाला चोर ठरवायचा हा कुठला न्याय?

**पहिला पोलीसः**—बरोबर वर्दी दे तर. कुठें झाली ही चोरी? केव्हां झाली? आणि कोणाची? चोर कुठें राहतात?

**बडबड्याः**—चोरी झाली! आमचे ते सदां न्यायानें वागणारे, सत्य भाषण करणारे, अगदीं सांभाचे अवतार हो! कधीं बिचाऱ्यांनीं हरामीचा पैसा कोणाकडून घेतला नाहीं हो! कधीं लांचलुचपत खाल्ली नाहीं हो! अहो, त्यांचें कर्म फार चांगलें! पण त्यांना भेटले मोठे पाजी दोस्त!

काय करतील विचारे, अगदीं त्यांना भुरळ घातली! एक स्वामी आणला!

**दुसरा पोलीसः**—अरे, हें चऱ्हाट कशाला लावलं आहेस? मुख्य मुद्याची गोष्ट सांग! चोरी केव्हां झाली?

**बडबड्याः**—झाली केव्हां तरी!

**पहिला पोलीसः**—केव्हां तरी! चोरी केव्हां तरी झाली! आणि तिची वर्दी आतां? खासा रोजगार!

**बडबड्याः**—अहो, पण ती उमगली आजच ना? तो मघां सांगितलेला तो स्वामी, आणि तो सदानंद, ह्यांच्यावर आमचा वहीम आहे. मोठे पाजी लोक आहेत पहा! एक पेटी त्यांनीं चोरली! आमच्या सुशिलरावांची!

**पहिला पोलीसः**—हं! चल तर. ही सारी हकीगत नीटपणें फौजदारांना सांग चल; ह्मणजे त्यांचा हुकूम होईल तसें आह्मी करूं. चल तर.

(पोलीस, बडबड्या वगैरे जाऊं लागतात)

**बडबड्याः**—(जातांना) तरी हे पोलीस लवकर वळणावर आले! नाहीं तर, चोरी न करतां चोर होण्याचा हा दुसरा प्रसंग येत होता!

[सर्व जातात]

---

# प्रवेश ६ वा.

[**स्थळ**—लक्ष्मीपालाची निजण्याची जागा; लक्ष्मीपाल पलंगावर बसला आहे अशांत पडदा उघडतो]

**लक्ष्मीपालः**—(स्वगत) आजची ही अमावास्येची रात्र! पिशाच्चाच्या भीतीनं मला झोंप कांहीं अझून येईना! आजवर कोणत्याही कारणानें मला

कधीं हृद्रोगही नव्हता, किंवा कसली भीतिही वाटत नव्हती; पण अलीकडच्या ह्या पिशाच्याच्या प्रकारानें माझी झोंप आजिबात जात चालली! (घड्याळाचे बारा ठोके पडतात) आतां हे बारा तर वाजले. अझून कांहीं झोप येत नाहीं, तरी पण थोडेसें आडवें होऊन पहावें (पलंगावर पडतो; पिशाच्या सारखे काळे वेष केलेले विलास व सदानंद येतात)

**विलास:**—(हळूस्वरानें) ह्यातार्‍याला झोंप लागलेली दिसते. सदानंद, तिजोरीच्या किल्ल्या कुठें असतील बरें?

**सदानंद:**—अरे, त्या त्याच्या उशा खालींच असतील. पहा पुढें होऊन.

**विलास:**—पण त्या पाहतांना तो जागा होईल.

**लक्ष्मीपाल:**—[उशाशीं चांचपून स्वगत] उशाखालच्या किल्ल्या, आहेत अझून उशालाच. जरा दाबून आंत ठेवल्या पाहिजेत. [तसें करतो]

**विलास:**—[दचकून] अरे, ह्यातारा जागा झाला!

**सदानंद:**—[हळू स्वरांत] होऊं दे! आह्मी दोघे असल्यावर त्याला कायमचा निजवायला कितीसा उशीं लागणार? [सुरा काढतो] हं! विलास हो पुढें आणि घे त्या किल्ल्या.

**विलास:**—[पुढें होऊन दचकून मागें येतो] अरे, त्याचे डोळे अर्धवट उघडे दिसतात.

**सदानंद:**—अरे, ह्यातारी माणसें तशींच निजत असतात! हो पुढें आतां! जलदी कर.

**विलास:**—डोळे उघडे असलेल्या माणसापुढें मी नाहीं जात बुवा!

**सदानंद:**—अरे, तो जागा झाला, तरी त्याला आह्मी भिण्याऐवजीं तोच आह्मांला भिईल!

**लक्ष्मीपाल:**—[स्वगत] आतां डोळे पुरे झांकल्या शिवाय कांहीं झोंप येणार नाहीं! [पांघरूण घेऊन निजतो]

**सदानंदः**—विलास, आतां हो पुढें. [ विलास पुढें होतो, इतक्यांत लक्ष्मीपाल पांघरुणांतून तोंड बाहेर काढतो, विलास परत येतो ]

**विलासः**—तो पहा, पुन्हा तो जागा झाला!

**सदानंदः**—काय भितो आहेस रे तूं?

**लक्ष्मीपालः**—[ स्वगत ] कोण कुचु कुचु बोलत आहेसें वाटते! [ उठून विलासाकडे पाहून ] अरे पिशाच्चा! केलास, माझा घात केलास! [ सदानंदास पाहून ] एक कां दोन पिशाच्चें हीं! धांवा, धांवा! पिशाच्चांनीं गांठलें! गांठ......लें, मे......लों, मे......लों, मेलों!

**सदानंदः**—ह्यातार्‍या स्वस्थ रहा, नाहींतर प्राण घेईन! [ सुरा दाखवतो ]

**लक्ष्मीपालः**—प्राण घ्या, पण द्रव्य नका नेऊं! अरे, शान्तशील! पद्मिनी! धांवा, धांवा!

[कलाधर, फौजदार, पेटी हातीं घेतलेले पोलीस, व बडबड्या प्रवेश करतात]

**कलाधरः**—फौजदार साहेब! पकडा ह्या दोघा हरामखोरांना!

**फौजदारः**—[ विलास व सदानंद यांना पकडतांना ते पळूं लागतांत त्यांस धरून ] अरे, चोरांनो, पळतां कोठें?

**लक्ष्मीपालः**—अहो, ते पिशाच्च आहेत!

**बडबड्याः**—[ बाजूला ] आमच्या पिशाचानें असा घोंटाळा केला काय?

**फौजदारः**—शेट, स्वस्थ रहा! पिशाच्च नाहीं आणि कांहीं नाहीं! हे अट्टल चोर आहेत! [ सदानंदाचा पिशाच्च वेष काढून टाकतो ]

**सदानंदः**—[ स्वगत ] ह्या बटुसंन्याशानें ही फितुरी केली! [ कलाधराचे अंगावर धांवतो ] अरे, हरामखोरा!

**फौजदारः**—[ सदानंदास आवरून ] चूप! माझ्यासमोर त्याचे अंगावर जातोस?

**विलास**:—फौजदारसाहेब, माझ्यावर कृपा करा आणि मला सोडा! ह्या सदानंदाच्या शिकवणुकीचा हा परिणाम! ही माझी स्वतःची कृति नव्हे!

[ शान्तशील व पद्मिनी येतात ]

**शान्तशील**:—कोण सदानंद? आणि आहे काय हा प्रकार?

**फौजदार**:—शान्तशील, आज तुमच्या वडिलांचा बळी घेऊन तुमचं सर्वस्व घेऊन जायला हें दोघे इथें आले होते.

**पद्मिनी**:—काय हा प्रकार? हे कोण आणि हे यतिराज इथें कां?

**शान्तशील**:—सुशिलरावांना फसवून त्यांच्या घराची राखरांगोळी करायला तयार झालेला हाच कां तो सदानंद?

**कलाधर**:—होय. हाच तो सदानंद!

**विलास**:—फौजदारसाहेब, माझ्याकडे पहा आणि मजवर दया करा! हा सारा ह्याच्या संगतीचा परिणाम! वास्तवीक मी अगदी निरपराधी मनुष्य आहे!

**फौजदार**:—अरे, चूप रहा! किती बडबडशील? [ शान्तशीलास ] शान्तशील, जर कां ह्या यतिराजांनीं मला ह्यांच्या हालचालींची आगाऊ सूचना दिली नसती, तर तुमच्यावर भयंकर प्रसंग गुदरला असता!

**शान्तशील**:—[ कलाधरास ] यतिराज, केवढा हा अनुग्रह!

**पद्मिनी**:—काय! ह्या यतिराजांनीं हा अनर्थ वांचविला? धन्य आहे यांची!

**कलाधर**:—कशाचा अनुग्रह! मानवजातीचीं संकटें निवारण करणें हें आमचें कर्तव्यच होय!

**फौजदार**:—[ सदानंदास ] कायरे पाजी माणसा! [ मालिनीची पेटी दाखवून ] ही पेटी कोणाची?

**सदानंद**:—कोणाची? माझ्या एका दोस्ताची विश्वासाची ती ठेव आहे.

**फौजदार**:—दोस्ताची ठेव? ठीक आहे. [ बडबड्यास ] सुशीलरावांना तुह्मी बोलवून आलांत ना?

**बडबड्या**:—[ पुढें पाहून ] हो. पण, हे सुशीलराव आलेच.

[ सुशीलराव, इंदुमती, व शालिनी येतात ]

**फौजदार**:—[ सुशीलरावांस ] काय हो सुशीलराव, आपण ठेव ह्मणून ही पेटी ह्या माणसाजवळ दिली होती?

**सुशीलराव**:—काय सांगू फौजदार साहेब! मी ठेव कसची ठेवतों! त्यानें तर ही जाणुन बुजून चोरीच केलेली आहे! [ सदानंदास ]सदानंद, काय हो केलें हें?

**सदानंद**:—बस्‌! जें केलें, तें बरोबरच केलें आहे!

**फौजदार**:—हरामखोरा! काय बोलतो आहेस हें?

**कलाधर**:—पाहिलतं! जित्याची खोड मेल्याशिवाय जायाची नाहीं! ह्या हरामखोरानें काय काय कृष्णकृत्यें केली आहेत तीं अजून कुठें कळलीं आहेत?

**विलास**:—अहो, त्यानें केलीं असतील, पण मी काय केलें?

**कलाधर**:—थांबा! आपण काय करीत होता आणि काय केलें, तें दाखवितों. [ त्याचा पिशाच वेष काढून टाकतो ] ह्या पिशाच वेषांत हा इथें चोरी करायला आला होता!

**सुशीलराव**:—[ आश्चर्यानें ] ऑं! हे तर विलासराव! आमच्या मालिनीचें नियोजित वर! खाशी केलंत राव! आपण इतके संभावित आहांत कां?

**विलासः**—अहो, मी नव्हतो लग्नाला तयार! ह्या सदानंदानें मला नवरदेव करून जुलमानें घोड्यावर बसवलं!

**फौजदारः**—घोड्यावर बसवलं! मूर्ख! पाजी! हरामखोर!

**शान्तशीलः**—सुशीलराव, ह्या संकल्प केलेल्या लग्नाचा परिणाम कोठवर गेला होता, तें आपणास कळलें आहे काय? [ मालिनीला घेऊन येतो ] हिची स्थिति पहा!

**सुशीलरावः**—[ मालिनीस पाहून ] ऑं, हें काय?

**शान्तशीलः**—ऐका. आपण सदानंदाच्या ह्या पाजी मित्राला हिला देऊं केलीत, ह्मणून विश्वेश्वराच्या देवळाजवळ ही आपला देह अग्नीला अर्पण करीत होती! ईश्वरी इच्छा बलवत्तर, ह्मणून माझी व हिची गांठ पडली आणि हिचे प्राण वांचविण्याचा मला योग मिळाला!

**इन्दुमतीः**—काय मालिनी, काय करीत होतीस हें? तुला ती गोष्ट पसंत नव्हती, तर आह्मांला तसं कां बोलली नाहींस?

**मालिनीः**—आई, त्या स्पष्ट बोलण्यानें कुमारिकेच्या मर्यादशील वर्तनाचा अतिक्रम झाला असता!

**फौजदारः**—[ विलासास ] काय हो शिष्ट! आज एका जिवाची सहज हत्या आपण करून मोकळे होणार होतां!

**विलासः**—अहो, ह्मणतोना! ह्या सदानंदानें मला घोड्यावर बसवलं!

~~**फौजदारः**~~—अजून जरा थांबा. ह्या सदानंदानें ह्याचे फेरफटके कसे आणि किती केले ते पहा! [ आपला संन्याशाचा वेष विलासाचे अंगावर घालतो ]

**सुशीलरावः**—[आश्चर्यानें] ऑं! तो चिदानंद स्वामी झालेला ह्राच कीं काय? आतां मात्र कमाल झाली! [ कलाधरास ओळखून ] आणि हें काय? कलाधरा, तूं कसा इकडे?




**कलाधर** :—ह्या सदानंदानें ह्याचे फेरफटके कसे आणि किती केले ते पहा!

Dnyan-Sagar Press, Kolhapur.

[अंक ४, प्रवेश ६]

ना. ३१.८

**पद्मिनीः**—[ हर्षानें स्वगत ] काय, हे माझे कलाधर!

**इन्दुमतीः**—काय, माझा कलाधर! कलाधरा, [ त्याला मिठी मारते ] कुठं होतास रे माझ्या बाळा, आणि करीत होतास काय?

**कलाधरः**—ऐका, सर्वच ऐका आतां. प्रथम जेव्हां हा सदानंद आमच्या घरांत दिसला, तेव्हांच हा कांहीं मला माणूस नसावा अशी माझी कल्पना झाली. पुढें ह्यानें ह्या टारगटाला [ विलासाकडे बोट दाखवून ] चिदानंद ह्मणून स्वामी बनवून आमच्या घरीं आणला; त्यावेळीं तर ह्या दोघांच्या स्वभावाबद्दल मला जास्तच संशय येऊं लागला. मी मुंबईला गेल्यानंतर बडबड्याचीं एक दोन पत्रें आल्यानें माझ्या काळजाचा ठावच सुटला! आमच्या घराची हे नीच लोक राखरांगोळी करतील ह्या भयानें मी स्वतः संन्याशाच्या वेषांत ह्यांच्या सहवासांत राहून सर्व कृत्यांवर नजर ठेवली. विलासाचा चिदानंद, चिदानंदाचा पुन्हा विलास असे फेर करून मालिनीचें लग्न ह्या दुष्टाशीं करून द्यावयाचा सदानंदाचा विचार मला कळतांच मी जास्त सावध राहिलों. लक्ष्मीपालांच्या घरांत आज हे पिशाच्च वेष घेऊन चोरी करायला गेले असा मागमूस मला लागतांच ह्यांच्या पाठोपाठ निघालों, तों वाटेंतच हे फौजदार, शिपाई, बडबड्या वगैरे मालिनीच्या नांवाची पेटी जप्त करून सदानंदाचा शोध करीत असलेले मला भेटल. आह्मी सर्वच इथें आलों आणि ह्या हरामखोरांना हें धाडसाचें कृत्य करीत असतां पकडलें!

**शान्तशीलः**—पिशाच्च वेषांत चोरी करणें ह्मणजे चोरीच्या धंद्यांत ह्यांनीं हा एक अजब शोधच लावला ह्मणायचा! [ सर्व हंसतात ]

**लक्ष्मीपालः**—हां! आतां माझ्या जिवांत जरा जीव आला! अहो, मी तर प्रथम हे पिशाच्च ह्मणूनच ओरडलों! स्वाशी सदानंद! चांगली तोंड काढली होतीस! सुशीलराव, आतां हा सारा उलगडा झाला, तेव्हांच मला दोन शब्द बोलण्याची तरी शक्ति आली. मी अगदींच गांगरून गेलो होतो. एकंदरींत आपल्या कलाधरानें आज भली मात केली, नाहीं तर

माझा जीव जायाचा जाऊन साऱ्या द्रव्याची लूट झाली असती! तरी आरंभीं ह्यांना मी ह्मटलेंच, माझा जीव घ्या, पण द्रव्य नका नेऊं! हे किती अट्टल! ह्यांची सर्व धाव पैशावर! [ फौजदारास ] हं! फौजदार साहेब, घ्या आतां ह्यांचा चांगला समाचार! सोडूं नका गुलामांना! कायद्यांत असेल, त्याच्या चौपट ह्यांना शिक्षा देववा!

**विलास**:—नको, नको, नको! मी कांहीं केलेलें नाहीं! ह्या सदानंदानें मला घोड्यावर ब—बसवलं! (बोबडी वळल्या सारखें करतो)

**फौजदार**:—अरे चूप!

**विलास**:—अहो, आह्मी जसे एका लंगोटीनिशी इकडे आलों, तसे जातों परत आमच्या प्रांताला! पण, आह्मांला त्या तुरुंगांतल्या यातना नकोत!

**सुशीलराव**:—पहा फौजदार, ह्यांना पश्चात्ताप झालेला दिसतो, तेव्हां उगीच खटला करून—

**फौजदार**:—(मध्येंच) हां, सुशीलराव, हा दयेचा मार्ग ह्यांना सोडण्याकरितां नका काढूं!

**लक्ष्मीपाल**:—दया? अहो कसची दया? मी ह्मणतोना, ह्यांना कायद्यांत असेल त्याच्या चौपट शिक्षा द्या.

**सदानंद**:—(स्वगत) प्राणावर बेतलें होतें, पण सुटलास. होऊंदे शिक्षा मला! कैदेंतून सुटतांच ह्या कार्ट्यांचा आणि तुझा एकदमच समाचार घेईन!

**सुशीलराव**:—एकंदरींत माझ्या मूर्खपणाची सीमा झाली खरी! आज केवढा नाश माझ्या एकट्याच्या कृतीनें होत होता बरें? फौजदारसाहेब, आतां झाल्या गोष्टी होऊन गेल्या! ह्यांना आतां—

**फौजदारः**—कांहीं बोलूं नका, सुशीलराव. करावें तसें भरावें असा जगाचा न्यायच आहे! [ सदानंद व विलास ह्यांसह जाऊं लागतो ] चलारे!

**विलासः**—[ शिपाई खेंचतांना ] नकोहो शिपाई बुवा! ह्या सदानंदानें मला घोड्यावर बसवलं हो!

**शिपाईः**—चूप रहा!

**विलास**—[ जातांना ] आतां मात्र आह्मी चांगले चतुर्भुज झालों!

[ सदानंद, विलास, शिपाई, व फौजदार जातात ]

**लक्ष्मीपालः**—[ जाणाऱ्या शिपायांस ] खेंचा! चांगले खेंचा गुलामांना!

**सुशीलराव**—बरें, लक्ष्मीपाल, इकडे पहा आतां! आज माझ्या कलाधरानें आह्मा सर्वांवरली केवढी आपत्ति टाळली, तें दिसतच आहे! अहो, तुमचा आमचा जुनास्नेह तर आहेच; पण आज तो स्नेह दृढ होण्यासारखीं पुष्कळ कारणें झालीं आहेत. आज आपणांवरलें संकट गेलें, आणि हा सोन्याचा दिवस सर्वांनीं पाहिला! तेव्हां, मी ह्मणतो, अशा शुभ प्रसंगीं आपणही कांहीं तरी शुभ गोष्ट करावी. मागें तुह्मांला मी त्याबद्दल बोललेंच आहे.

**लक्ष्मीपालः**—[ स्वगत ] ह्याचं गाठोडं ह्याला आतां परत मिळणार, तेव्हां आपण तरी कशाला पडा दुराग्रहांत? [ उघड ] अरे हो! मी तें विसरलोंच होतों! त्यांत काय मला अवघड आहे! [ शान्तशीलास ] अरे शान्तशील, ये असा; मालिनी तूं ही ये. [ तीं उभयतां येतात, त्यांच्या हातांत हात घालून ] झालं सुशीलराव, तुमच्या मनासारखं एकदां?

**सुशीलरावः**—हो. हा मोटा उपकार झाला!

**लक्ष्मीपालः**—हां, पण तुह्मीही असंच केलं पाहिजे. ( पद्मिनीस जवळ घेऊन ) ही माझी पद्मिनी. द्या हिचा हात कलाधराच्या हातांत.

**सुशीलरावः**—हो! त्यांतही मला आनंदच आहे! ( पद्मिनीचा हात

कलाधराच्या हातीं देऊन ) अरे, पण, आणखी एक गोष्ट राहिली. ( बडबड्यास उद्देशून ) ह्या आमच्या विद्वान् पंडिताचेंही कार्य मलाच केलं पाहिजे. शालिनी, ये इकडे अशी. ( तिचा हात बडबड्याचे हातीं देऊन ) आजवर मी तुह्मा उभयतांचा सांभाळ केला, आतां इथून पुढें तुह्मी आपला संसार आनंदानें करा. ( लक्ष्मीपालास ) लक्ष्मीपाल, तुमचें आमचें आतां संसारकार्य संपलें. आतां संसाराची सारी जबाबदारी ह्या तरुणांवर टाकून आपण खुशाल ईशस्मरणांत दिवस घालवूं या! ( पद्मिनीच्या खुणेवरून बडबड्या आंतून एक चित्र आणून इंदुमतीजवळ देतो )

**इंदुमती**:—( सर्वांस चित्र दाखवून ) पहा, माझ्या कलाधराची चित्रकला पहा! नुसत्या कल्पनेनें त्यानें आमच्या दोन्हीं कुटुंबांच्या माणसाचें हें चित्र कसें रंगविलें आहे पहा! ( सर्व पाहतात ) देवानें माझें कोड पुरविलें, आणि स्नेह भावानें वागत आलेलीं आमचीं दोन्ही घराणीं आज विवाह संबंधानें एक झालीं!

**सुशीलराव**:—मुहूर्तनिश्चय करून हें कार्य आतां लवकरच उरकून घेऊं.

**शान्तशील**:—सुशीलराव, एकंदरींत आज आपण सौख्याचा दिवस पाहिला खरा; पण एका गोष्टीबद्दल आपण सर्वांनी इथून तरी पुढें दक्षता ठेवली पाहिजे. ह्या दुनयेंत नानाप्रकारचे दोस्त आहेत. दोस्ती संपादन करण्याच्या हजारांच्या हजार तऱ्हा असतात. कुणी व्यापाराच्या निमित्तानें दोस्ती करतात, कुणी राज्यतृष्णेनें दोस्ती करतात, कुणी एखाद्याची संपत्ति उपटण्याकरितां दोस्ती करतात, कुणी कामवासनेनें स्त्रियांना फसवण्यासाठीं दोस्ती करतात! असे नानाप्रकारचे दोस्तीचे मासले ह्या जगांत दिसून येतात, ह्मणून असले लोक **आमचे दोस्त** नसून शत्रु होत, हें आह्मीं अतःपर लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

**सुशीलरावः**—शान्तशील, अगदीं बरोबर बोललात. इत:पर त्या जगन्नियंत्यानें आह्मांला सन्मित्रांचीच संगति घडूं द्यावी, असें आज त्याजपासून मागून घेऊं या.

सर्वः— [ पद २५ वें ]

सुगुण सागरा तारि ।। भवताप हारी ।। ध्रु० ।।
गृहिं सदा, दे संपदा, निरसोनि आपदा ।।
सुहृद जन ते, सदय बहुते, देई अमुते ।। हे मुरारी ।।१।।

———:0:———

**समाप्त.**

श्री गुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

FINIS

ग्रंथालय ... शाखा
ता. क. ५६८